# पुणे महानगरपालिका

## सन २०२२-२३

## महापालिका आयुक्त यांचे निवेदन

**स्थायी समितीचे माननीय अध्यक्ष व सभासद,**

मी महापालिका आयुक्त या पदाचा पदभार स्वीकारल्यानंतर पुणे महानगरपालिकेचे दुसरे अंदाजपत्रक आज सादर करीत आहे. संपूर्ण देश २०२० पासून कोविड महासाथीच्या परिणामांना सामोरे जात आहे. पहिली व दुसरी लाट ओसरते असतांना, मागील काही महिन्यांपासून कोविड या संसर्गजन्य श्रेणीतील आणखी एक विषाणू ओमिक्रोनची भीती गडद होत चालली होती. मात्र या सर्व प्रतिकूल परिस्थितीवर मात करीत आपणा सर्वांना शहराच्या विकासाची गती वाढवावी लागणार आहे व विकासाच्या अंतिम उद्दिष्टाकडे यशस्वीपणे वाटचाल करावयाची आहे.

कोणत्याही प्रशासकीय यंत्रणेस किंवा प्रत्येक मनुष्याच्या दैनंदिन जीवनातही अंदाजपत्रक किंवा जमा-खर्चाचे नियोजन करताना किंवा आर्थिक विवरणपत्राची तयार करण्याची प्रक्रिया राबवित असताना सर्व महत्वाच्या व अत्यंत बारीकसारीक गोष्टींचा अभ्यास करुन, नियोजन करुन व धोरणे निश्चित करुन उपलब्ध साधनसामुग्रीचा विचार करुन आर्थिक घडी बसवावी लागत असते आणि सर्वात महत्वाचे, अंदाजपत्रक मांडताना वास्तवाचे भान ठेऊन प्रत्यक्षात जमा होणारी रक्कम व खर्च यांच्यातील तफावत दूर करुन अंदाजपत्रक तयार करावे लागत असते आणि असे तयार करण्यात आलेले अंदाजपत्रक खऱ्याअर्थाने शहराच्या विकासासाठी वास्तव अंदाजपत्रक सादर केल्याने आपणासही समाधान मिळत असते.

## मागील चार वर्षाच्या महानगरपालिकेच्या अंदाजपत्रकाचा संक्षिप्त आढावा

**(संख्या कोटीमध्ये)**

| जमा बाजू | डिसेंबर २०१८ अखेर | डिसेंबर २०१९ अखेर | डिसेंबर २०२० अखेर | जानेवारी २०२२ अखेर |
|---|---|---|---|---|
| स्थानिक संस्था कर | ७३.४३ | १२४.१७ | २४.८४ | १३०.३६ |
| वस्तू आणि सेवा कर (GST) | ११७९.५४ | १२७६.९२ | १३७९.०७ | १७३१.५२ |
| मिळकतकर | ७५०.४१ | ८२६.६१ | ९९३.६२ | ११५४.२८ |
| पाणीपट्टी | १९७.४३ | १९७.४९ | २०५.३४ | २३५.६७ |
| बांधकाम परवानगी व विकास शुल्क | ५५९.८७ | ५८८.९७ | २७४.९३ | १५७१.५० |
| इतर जमा | १९४.४७ | २०५.९९ | १५७.७२ | ४२७.२९ |
| स्मार्ट सिटी व अमृत अभियान | ०.३० | – | २.०६ | – |
| शासकीय अनुदान | ९९.०२ | १२२.३६ | ६९.९० | १४७.९३ |
| कर्जरोखे | – | – | – | – |
| प्रधानमंत्री आवास योजना | ०.०३ | – | – | ४५.११ |
| **एकुण रक्कम रूपये** | **३०५४.५०** | **३३४२.५१** | **३१०७.४८** | **५४४३.६६** |

**(संख्या कोटीमध्ये)**

| खर्च बाजू | डिसेंबर २०१८ अखेर | डिसेंबर २०१९ अखेर | डिसेंबर २०२० अखेर | जानेवारी २०२२ अखेर |
|---|---|---|---|---|
| सेवकवर्ग खर्च | १०८१.०५ | ११२६.६८ | ११३१.४४ | १४९३.६४ |
| वीजखर्च व दुरूस्ती | १४९.८६ | १६९.७० | १६६.२१ | २१३.४४ |
| पाणी खर्च | ५६.९४ | ५१.३७ | ३४.५३ | ३८.१५ |
| कर्जपरत फेड, व्याज व घसारा | २१.०६ | २९.६१ | ३०.३४ | ३२.६४ |
| औषधे, पेट्रोल व डिझेल | ७४.४२ | १०१.८१ | १२०.४२ | १२६.६६ |
| देखभाल दुरूस्ती व इतर खर्च | ३७६.६५ | ४१५.६२ | ५२९.१८ | ७८२.८१ |
| वॉर्डस्तरीय कामे | ४.४२ | ३.६० | ३.६१ | १०.२६ |
| क्षेत्रीय कार्यालयाने करावयाची कामे (नॉन प्लॅन) | ५.८६ | १२.७० | २.०४ | ०.३३ |
| भांडवली व विकासाची कामे | ४३५.०१ | ५३७.८३ | ८०४.८२ | ५५२.२६ |
| स्मार्ट सिटी व अमृत अभियान | ३२.९१ | १५.६६ | २५.८० | ८०.५४ |
| **एकुण रक्कम रूपये** | **२२३८.१८** | **२४६४.५८** | **२८४८.३९** | **३३३०.७३** |

# विकास योजना प्रगती आढावा:-

## (१) पाणी पुरवठा (भांडवली तरतूद र. रु.७२१.२७ कोटी + महसूली तरतूद र.रु.६९४.६२ कोटी = र.रु.१४१५.८९ कोटी)

**<u>सन २०२१-२२ मधील महत्वाच्या पूर्णत्वास/सुरु असलेल्या नावीन्यपूर्ण योजना/प्रकल्पांची नावे ठळक बाबी</u>**

पुणे शहरासाठी सन २०४७ सालच्या गरजा लक्षात घेऊन पाणीपुरवठा करणेसाठी ८२ साठवण टाक्या उभारणे प्रस्तावित आहे. सध्या ३६ साठवण टाक्यांची कामे पूर्ण झाले असून, माहे मार्च २०२२ पर्यत किमान ५० साठवण टाक्यांची कामे पूर्ण होणे अपेक्षित आहे. या अंतर्गत सुमारे ७०० कि.मी. लांबीची जलवाहिनी माहे मार्च २०२२ पर्यत पूर्ण करणे व ७५ हजार मीटर बसविणेचे काम पूर्ण करण्यात येणार आहे. पाणीपुरवठा प्रकल्प अंतर्गत गणेशनगर तसेच भिमनगर, म्हस्केवस्ती, सिंहगड रोड, हिंगणे बुद्रूक, संचेती परिसर, कात्रज येथील राजस सोसायटी, सुखसागरनगर या भागामध्ये ७०% मीटर बसविण्याचे काम पुर्ण झालेले आहे. तसेच केदारेश्वर टाकीवरील केदारेश्वर पाणीपुरवठा झोन, महादेवनगर टाकीवरील पाणीपुरवठा झोन मधील काम पुर्ण करण्यात आले आहे. पुणे शहरामध्ये पाणीपुरवठा करणेसाठी नियोजित १४१ झोन पैकी मार्च २०२२ अखेर ४५ झोन कार्यान्वीत होणार आहेत. पुणे शहरासाठी महत्वाकांक्षी असलेला दुसरा प्रकल्प भामा आसखेड धरणातून पाणी आणण्याची योजना सन २०२०-२१ मध्ये कार्यान्वित करण्यात आला आहे, यामुळे पुणे शहराच्या पूर्व भागातील वडगांवशेरी, खराडी, चंदननगर, विमाननगर, कळस, धानोरी इत्यादी भागाची पाणी समस्या पूर्णपणे सोडविणे शक्य आहे. सदर योजनेसाठी मे.केंद्र शासनाचे जेएनएनयुआरएम टप्पा क्र. २ अन्वये मान्यता मिळालेली आहे.

मीटरव्दारे होणाऱ्या पाणीपुरवठयाची पाणीपट्टी दरवर्षी सरासरी अंदाजे ९९ ते १०५ कोटी इतकी जमा होते. सन २०२१-२२ या आर्थिक वर्षामध्ये दि. ३१.०१.२०२२ अखेर र.रु. ८७.८२ कोटी इतकी जमा झालेली आहे.

| अ.क्र | वर्ष | वसुली (कोटी मध्ये) |
|---|---|---|
| १ | २०१९-२० | ९९.७९ |
| २ | २०२०-२१ | ९७.६६ |
| ३ | २०२१-२२ | ८७.८२ (३१.०१.२०२२ अखेर) |

**पाणीपट्टी- सन २०२१-२२**

- मीटर वरील दि. ३१/०१/२०२२ अखेर एकुण नळजोड संख्या ३९६४८ इतकी असून, थकबाकी सुमारे र.रु. ६१९ कोटी आहे. दुबार पाणीपट्टी, नादुरुस्त मीटर, नळजोड बंद घोषित झोपडपट्टी मधील पाणीपट्टी, रस्ता रुंदीकरणामधील नळजोड इ. कारणांमुळे मीटर पाणीपट्टीची अवाजवी थकबाकी आलेली आहे. सध्याचे पाण्याचे मीटर बसविण्याची जबाबदारी संबंधित ग्राहकांची आहे. तसेच सदर मीटर मेकॅनिकल तंत्रज्ञानाचे असल्याने, वारंवार नादुरुस्त होत आहेत. सध्याचे सुमारे ४३.९०% मीटर नादुरुस्त आहेत व नादुरुस्तीच्या काळात सरासरी वापरापेक्षा जादा वापर गृहीत धरुन बिलाची आकारणी करण्यात येते व मीटर दुरुस्त केल्यानंतर नंतर वसुली होणारी रक्कम ही २०% ते २५% इतकी असून, अवाजवी थकबाकी निरस्त करण्याची कार्यवाही सुरु आहे.
- सन २०२१-२२ या आर्थिक वर्षामध्ये मे.कोर्ट मार्फत तीन वेळेस लोक अदालत राबविण्यात येऊन र.रु. १,३९,५५,७६०/- इतकी थकबाकी वसूल करण्यात आली आहे.

- **सन २०२२-२३ चे दृष्टीक्षेपातील अंदाजपत्रकातील संक्षिप्त माहिती.**
- सदर अंदाजपत्रकात पुणे शहरासाठी महत्वाकांक्षी समान पाणीपुरवठा योजना राबविण्याकरीता अनुषंगाने ६०० कि.मी. लांबीच्या जलवाहिन्या विकसित करण्यात आल्या आहेत व सुमारे ५४००० जलमापक बसविण्यात आले आहेत. सदर योजने अंतर्गत ८२ साठवण टाक्या बांधणे, १८०० कि.मी. लांबीची जलवाहिनी टाकणे व ३.१५ लक्ष जलमापक बसविणे अंतर्भूत आहे.
- **सन २०२२-२३ चे दृष्टीक्षेपातील जमा अंदाजपत्रक (उदिदष्ट र. रू. २१२ कोटी)**
- सन २०२१-२२ याकरीता टप्पेनिहाय (टेलास्कोपिक) पाणीपट्टी दरास मा.मुख्य सभेची मान्यता मिळालेली आहे. यामुळे पाण्याचा कमी वापर करणाऱ्या नळजोडधारकांना कमी दराने बिल व पाण्याचा जादा वापर करणाऱ्या नळजोडधारकांना जादा दराने बिलांची आकारणी करण्यात येत आहे. यामुळे पाणी वाया जाण्याचे प्रमाण कमी होणे अपेक्षित आहे. तसेच या वाढीव मीटर पाणीपट्टीमुळे पाणीपुरवठा करणेसाठी होणारा खर्च भरुन काढणे शक्य होणार आहे.
- सन २०२२-२३ या आर्थिक वर्षामध्ये शहरातील अनधिकृत नळजोड शोधून त्यावर कारवाई करण्याची मोहित हाती घेण्यात येणार आहे. त्याप्रमाणे वेळोवेळी लोक अदालतचे आयोजन करुन थकबाकीदारांकडून रक्कम वसुल करण्याबाबतची मोहिम सुध्दा राबविण्यात येणार आहे. समान पाणी वाटप योजनेमध्ये अल्ट्रासोनीक/ इलेक्ट्रामॅग्नेटीक मीटर बसविण्यात येणार असल्याने, मीटर नादुरुस्तीचे प्रमाण कमी होऊन थकबाकी कमी होण्यास मदत होणार आहे.
- **सन २०२२-२३ मध्ये करावयाचे प्रस्तावित महत्वाचे प्रकल्प/योजना.**
- पुणे शहरासाठी महत्वाकांक्षी पाणीपुरवठा प्रकल्प अंतर्गत सन २०२२-२३ मध्ये एकूण ६५ साठवण टाक्या कार्यान्वित करणे अपेक्षित आहे. या व्यतिरिक्त सुमारे ४०० कि.मी. लांबीची नवीन वितरण व्यवस्था विकसित करणे व अंदाजे १.५ लक्ष जलमापक बसविण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आलेले आहे. पुणे शहरामध्ये पाणीपुरवठा करणेसाठी नियोजित १४१ झोन पैकी ८० झोन मार्च २०२३ अखेर कार्यान्वित करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे.

**राष्ट्रीय नदी संवर्धन योजने अंतर्गत पुणे शहरातील मुळा-मुठा नदी प्रदुषण नियंत्रण करणे (जायकाचे आर्थिक सहाय्य प्राप्त प्रकल्प)**

## सन २०२१-२०२२ (तरतूद र.रु. १२० कोटी)

- राष्ट्रीय नदी संवर्धन योजने अंतर्गत पुणे शहरातील मुळा-मुठा नदीचे प्रदुषण नियंत्रण करणेकामी पुणे महानगरपालिकेमार्फत र. रु.९९०.२६ कोटींचा प्रकल्प आराखडा तयार करण्यात आलेला आहे. या प्रकल्पास मे. केंद्र शासनाकडून दि. १४/०१/२०१६ रोजी मंजुरी मिळाली असून जपान सरकारच्या (जायका) अर्थसहाय्याने प्रकल्प रकमेच्या ८५% रकमेचे अनुदान प्राप्त होणार आहे.
- या प्रकल्पांतर्गत बाणेर, बालेवाडी या ठिकाणी मैलापाणीवहन व्यवस्थेसाठी सुमारे १९.६० कि.मी. लांबीच्या मलवाहिन्या विकसित करण्यात आलेल्या आहेत.
- पॅकेज क्र. ३, ४, ५, ६ व ८ यांचे निविदा जादा दराने प्राप्त झाल्याने रद्द करण्यात आल्या आहेत. तसेच नव्याने एकच निविदा मागविण्यासाठी मे. केंद्र सरकारची मान्यता प्राप्त झाल्याने त्यानुसार निविदा मागविण्यात आलेल्या आहेत.
- या प्रकल्पांतर्गत पुणे शहरात विविध ११ ठिकाणी ३९६ एम.एल.डी. स्थापित क्षमतेची मैलापाणी शुद्धीकरण केंद्र बांधण्यात येणार असून सुमारे ५५ कि.मी. लांबीच्या मुख्य मलवाहिनी विकसित करण्यात येणार असून सदर कामाची निविदा प्रक्रिया पूर्ण झाल्यांनतर कामाचे कार्यादेश देण्यात येऊन प्रत्यक्ष कामास सुरुवात करण्यात येत आहे.
- सदर प्रकल्पासाठी आतापर्यंत र.रु. ३९.५७५ कोटी इतका खर्च झालेला आहे.

**सन २०२२-२३ (तरतूद र.रू. २९५ कोटी)**

- जायका प्रकल्पीय योजनेचे काम ३ वर्षात पूर्ण करण्याचे उद्दिष्ट आहे.
- सदरचे काम पूर्ण झाल्यानंतर मुळा-मुठा नदीचे प्रदूषण नियंत्रित करण्यासाठी मदत होणार आहे.

**पुणे महानगरपालिकेत नव्याने समाविष्ट ११ गावांसाठी मैलापाणीवहन व्यवस्था व मैलापाणी प्रक्रियेबाबतची योजना राबविणे.**

**सन २०२१-२२ (तरतूद रक्कम रु. ६३ कोटी)**

- पुणे महानगरपालिका हद्दीत दि. ०४/१०/२०१७ रोजी नव्याने समाविष्ट ११ गावांचा समावेश करण्यात आला आहे. यामध्ये - १) शिवणे २) शिवणे (संपूर्ण उत्तमनगर) ३) धायरी ४) आंबेगाव खु. ५) आंबेगाव बु. ६) उंड्री ७) उरूळी देवाची ८) फुरसुंगी ९) मुंढवा (उर्वरित केशवनगर) १०) हडपसर (संपूर्ण साडेसतरानळी) ११) लोहगाव (उर्वरित) या गावांचा समावेश आहे.
- नव्याने समाविष्ट ११ गावांची पुढील ३० वर्षांपर्यंत प्रक्षेपित लोकसंख्या १८.५८ लक्ष (सन २०४७ साठी) विचारात घेऊन सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्यात आला आहे.
- या नव्याने समाविष्ट गावांच्या सविस्तर प्रकल्प अहवालामध्ये र. रु. ३९२.९५ कोटीची कामे प्रस्तावित केलेली आहेत. सदरची कामे ४ वर्षांत राबविण्याचे नियोजन केले आहे. या अंतर्गत १८२ कि.मी. लांबीचे मलवाहिन्या विकसित करण्यात येणार असून मुंढवा केशवनगर, सर्व्हे नं. ९ ते १४ मध्ये (१२ MLD क्षमता) व मांजरी बु.।। सर्व्हे नं. २८ (९३.५ MLD क्षमता) या दोन ठिकाणी मैलापाणी शुद्धीकरण केंद्र बांधण्यात येणार आहेत.
- सदर कामाची निविदा मान्य झालेली असून ठेकेदारास कार्यादेश देण्यात आलेला आहे व प्रत्यक्ष जागेवर काम सुरू करण्यात आलेले आहे.
- सदर प्रकल्पासाठी आतापर्यंत र. रु. ७.७७ कोटी इतका खर्च झालेला आहे.

**सन २०२२-२३ (तरतूद रक्कम रु. २०० कोटी)**

- सदर प्रकल्पीय योजनेचे काम ४ वर्षात पूर्ण करण्याचे उद्दिष्ट आहे.
- सदर कामे केल्याने समाविष्ट ११ + २३ गावांमध्ये मैलापाणी वहन व्यवस्था व मैलापाणी शुद्धीकरण व्यवस्था निर्माण होऊन नदीचे प्रदूषण कमी होणार आहे.

## (२) <u>मलनि:सारण (भांडवली तरतुद र.रू. ६७२.९७ कोटी+ महसुली तरतुद र.रू २५२.३३ कोटी = एकूण र.रू ९२५.३० कोटी)</u>

**सन २०२१-२२**

- सन २०२१-२०२२ चे अंदाजपत्रकाद्वारे मलनि:सारण देखभाल दुरूस्ती विभागामार्फत तयार करण्यात आलेल्या सिव्हरेज मास्टरप्लॅननुसार सन २०१७ पर्यंत अपुऱ्या पडणाऱ्या अंदाजे १३५ कि.मी लांबीच्या विविध व्यासाच्या मलवाहिन्या बदलाव्या लागणार आहे. त्यापैकी ४० कि.मी लांबीच्या विविध व्यासाच्या मलवाहिन्या बदलण्यासाठी र.रू.१०० कोटी इतकी तरतुद करण्यात आली होती व सिव्हरेज डिस्ट्रीक्ट नुसार एकत्रित काम होत असल्याने मलवाहिन्या बदलण्याच्या कामात सुसुत्रता आली आहे.
- सन २०२१-२०२२ मध्ये मलनि:सारण देखभाल दुरूस्ती, नाले सफाई, पावसाळी लाईन साफसफाई करणे करीता र.रू.६८.७० कोटी ची तरतुद होती. सदर कामांपैकी पावसाळ्यापुर्वी करावायाची कामे पूर्ण झालेली असून इतर कामे प्रगती पथावर आहेत.

**सन २०२२–२३**

- सन २०२२-२०२३ चे अंदाजपत्रकाद्वारे मलनि:सारण देखभाल दुरूस्ती विभागामार्फत विविध व्यासाच्या मलवाहिन्या बदलणेसाठी र.रू.१५५ कोटी इतकी तरतुद करण्यात आली आहे, त्यामधून जवळपास ४० कि.मी लाबींच्या विविध व्यासाच्या मलवाहिनीचे काम होणार आहे.
- जागेवर सुरू असलेल्या मलवाहिन्या बदलण्याच्या/टाकणेच्या विविध प्रकल्पीय कामांसाठी तरतुद करण्यात आली आहे.
- पुणे मनपा हद्दीमध्ये समाविष्ट झालेल्या ११ +२३ गावांमध्ये मोठ्या व्यासाच्या ट्रंक लाईन विकसित करणे व मलवाहिन्यांचे नेटवर्क करणे करीता र.रू.२०० कोटी इतकी तरतुद करण्यात आली आहे.
- सन २०२२-२०२३ मध्ये मलनि:सारण देखभाल दुरूस्ती, नाले सफाई, पावसाळी लाईन साफसफाई करणे करीता र.रू.५०.७५ कोटी इतकी तरतुद करण्यात आली आहे.

**मैलापाणी शुध्दीकरण –**

- पुणे शहरातील मनपामार्फत चालविण्यात येणाऱ्या १० मैलापाणी शुध्दीकरण केंद्र असुन २००१ ते २०१४ या काळात उभारले असून त्याच्या देखभाल/दुरूस्ती व वीज वापरामुळे होणाऱ्या एकंदरीत सरासरी वार्षिक खर्च र.रू. २४ कोटी इतका येतो. सदर मैलापाणी शुध्दीकरण केंद्रांमधील विद्युत व यांत्रिकी मशिनरी जुन्या झाल्याने, प्राधान्य क्रमानुसार व तरतूदीनुसार देखभाल दुरूस्ती कामे करण्यात येतात. मे. केंद्रीय प्रदुषण नियत्रंण मंडळ (CPCB) व मे. महाराष्ट्र राज्य प्रदुषण मंडळ (MPCB) यांचे सुचनेनुसार सर्व मैलापाणी शुध्दीकरण केंद्र येथील इनलेट व आऊटलेट पाण्याचे नमुने तपासणीसाठी ऑनलाईन यंत्रणा बसविण्यात आली आहे.
- मे. महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ (MPCB) यांनी महाराष्ट्रातील सर्व मैलापाणी शुध्दीकरण केंद्रांची माहिती उपलब्ध करणेसाठी sewage.ecmpcb.nic.in हे पोर्टल विकसित केले आहे. पुणे महानगरपालिकेमार्फत या पोर्टलवर मैलापाणी शुध्दीकरण केंद्रांशी संबंधित दैनंदिन सर्व माहिती अपलोड करण्यात येत आहे.

**सन २०२१–२२**

- पुणे महानगरपालिकेच्या मलनिःसारण विभागामार्फत सन २०२१-२२ साठी एकूण आर्थिक तरतूद र.रू. ६३,६७,७४,२०० उपलब्ध झाली होती.
- बहिरोबा मैलापाणी शुध्दीकरण केंद्र येथील प्रायमरी व सेंकडरी क्लोरिफायर, ग्रीट क्लासिफायर गिअर बॉक्स बदलण्यात आले असुन प्रक्रिया केलेल्या पाण्याची गुणवत्ता सुधारण्यास यामुळे मदत होत आहे. तसेच येथील वीज बिलामधील कॉन्ट्रॅक्ट डिमांड कमी करण्यात आल्याने वीज बिलांमध्ये बचत झाली आहे.

**सन २०२२–२३**

**पुणे महानगरपालिकेच्या मलनिःसारण विभागामार्फत खालील महत्वाची वैशिष्टयेपुर्ण कामे करण्यात येणार आहे.**

- भैरोबा मैलापाणी शुध्दीकरण केंद्र येथे जूने झालेले एरिएटर मोटर व गिअर बॉक्स व एचटी स्विच गिअर बदलण्यात येणार असुन यामुळे ट्रान्सफॉर्मरसाठी प्रोटेक्शन यंत्रणा कार्यान्वित होणार आहे.
- भैरोबा मैलापाणी शुध्दीकरण केंद्र येथे जुने झालेले आर.सी. पंपसेट बदलण्यात येणार असुन यामुळे अस्तित्वातील आर.सी. यंत्रणेला स्टॅडबाय यंत्रणा उपलब्ध होणार आहे.
- एरंडवणा मैलापाणी शुध्दीकरण केंद्र येथे प्रायमरी सेटलिंग टँकसाठी मिडिया (जुने झाल्याने) बदलण्यात येणार असुन प्रक्रिया केलेल्या पाण्याची गुणवत्ता सुधारण्यास यामुळे मदत होत आहे.
- विविध मैलापाणी शुध्दीकरण केंद्रांमधील स्लजवर गामा रेडिएशन सहाय्याने निर्जंतुकीकरण करणे यासाठी BARC, मुंबई यांचे तांत्रिक सहाय्य घेण्यात येणार आहे.

## (३) घनकचरा व्यवस्थापन (भांडवली तरतूद र.रू १२८.०० कोटी + महसूली तरतूद र.रू.७००.७७ कोटी = ८२८.७७ कोटी)

**सन २०२१–२२**

- **उरुळी फुरसुंगी येथे २०० मे टन क्षमतेचा कचरा प्रक्रिया प्रकल्प –** उरुळी फुरसुंगी कचरा डेपो येथील २ एकर क्षेत्रात २०० मे. टन क्षमतेचा मिश्र कचरा प्रक्रिया प्रकल्प उभारण्याचे काम मार्च २०२१ अखेर पुर्ण करण्यात आले आहे. एप्रिल २०२१ पासुन या प्रकल्पामध्ये २०० ते २५० मे. टन क्षमतेने कचऱ्यावर प्रक्रिया करण्यात येत आहे.
- **NCAP अंतर्गत वाहने खरेदी –** NCAP (National Clean Air Program) अंतर्गत महानगरपालिकेस ४ कोटीचा निधी उपलब्ध झालेला आहे. यापैकी ३ कोटी रुपये वाहन खरेदी व १ कोटी रुपये जनजागृतीसाठी देण्यात आलेले आहेत. खात्यास सद्यस्थितीस २ रोड स्वीपर उपलब्ध झाले असुन ३ वॉटर स्प्रींकलर खरेदी करण्याची वर्क ऑर्डर देण्यात आली आहे.
- **बायोमायनिंग –** उरुळी फुरसुंगी कचरा डेपो येथे साठलेल्या कच–यावर प्रक्रिया करणेसाठी १००० मे. टन प्रति दिन क्षमतेचा प्रकल्प उभारण्यात आला असुन सदर प्रकल्पामध्ये सरासरी ९५० मे. टन प्रतिदिन क्षमतेने प्रक्रिया करण्यात येत आहे. सद्यस्थितीत सुमारे १२ एकर क्षेत्र रिकामे करण्यात आले असुन निविदेतील नमुद कालावधीच्या आधी सुमारे दिड वर्ष अगोदर काम संपणार आहे.
- **वेस्ट टू एनर्जी –** पुणे बायोएनर्जी यांच्या मार्फत ७५० मे टन क्षमतेचा वेस्ट–टू–एनर्जी प्रकल्पाच्या पहिल्या टप्प्यातील देखभाल दुरस्तीचे O & M (Operation & Maintance) काम सुरु झाले आहे. या अंतर्गत सुमारे ३०० मे. टन प्रतिदिन क्षमतेने कचऱ्यावर प्रक्रिया करण्यात येत आहे. तसेच या प्रकल्पातील अन्य स्थापत्य विषयक कामाचे बांधकाम देखील मोठयाप्रमाणात सुरु आहे. येणाऱ्या आर्थिक वर्षात सदर प्रकल्प ७५० मे. टन क्षमतेने कार्यान्वीत करण्याचे नियोजन आहे.
- **स्वच्छ सर्वेक्षण २०२१ –** स्वच्छ सर्वेक्षण २०२१ स्पर्धेमध्ये १० लाखाहुन अधिक लोकसंख्येच्या श्रेणीत पुणे शहरास ५ वा राष्ट्रीय क्रमांक आणि महाराष्ट्रात २ रा राज्य क्रमांक मिळविला आहे. तसचे पुणे शहराला कचरा मुक्त शहर अंतर्गत ३ स्टार मानांकन, ODF++ (Open Defication Free) प्रमाणपत्र व बेस्ट सेल्फ सस्टेनेबल बिगसिटीचा देशातील प्रथम क्रमांकाचा पुरस्कारही मिळाला आहे.

**सन २०२२–२३ चे दृष्टीक्षेपातील अंदाजपत्रक**

- **ओला कचरा प्रक्रीया प्रकल्प –** अस्तित्वातील बंद पडलेले/नादुरुस्त असलेले बायोगॅस प्रकल्प पाडुन त्याठिकाणी DBOO (Design, Build, Own, Operate) तत्वावर ओल्या कचऱ्याचे प्रकल्प उभारण्यासाठी EOI (Expression of Inerest) मागविण्यात आला आहे. शहराच्या ४ ठिकाणच्या बायोगॅसच्या जागी ओल्या कचऱ्यापासुन ब्रीकेट्स बनविण्याचा प्रकल्प उभारण्याचे नियोजन आहे.
- **शास्त्रोक्त भुभराव उभारणे –** बायोमायनिग व शास्त्रोक्त भुभराव करून प्राथमिक स्तरावर उरुळी फुरसुंगी कचरा डेपो मधील जागा निश्चित करण्यात आली आहे. भुभरावाच्या कामासाठी तज्ञ सल्लागाराची नेमणुक करण्याची कार्यवाही सुरु आहे. नवीन भुभराव करणे या कामासाठी र.रू. ३.६० कोटी रुपये इतकी तरतुद करण्यात आली आहे.
- **पुणे छावणी परिषद येथे प्रकल्प क्षमता वाढविणे व भुभराव करणे –** पुणे छावणी परिषदेच्या अस्तित्वातील ५० मे. टन क्षमतेच्या प्रकल्पाची क्षमता १०० मे. टनाने वाढविणे. नव्याने शास्त्रोक्त भुभराव उभारणे या कामी मा. मुख्य सभेकडे प्रस्ताव मान्यतेस सादर करण्यात आला आहे. या प्रस्तावानुसार नमुद कामांसाठी ठराविक रक्कम पुणे छावणी परिषदेस वर्ग करण्यात येणार आहे. सदरचे दोन्ही प्रकल्प पुणे छावणी परिषदेच्या

मालकीच्या जागेवर करण्यात येणार आहे. त्यामुळे शहरातील कचरा समस्येचा प्रश्न सुटण्यास मदत होणार आहे.

- **ISWM** - Iswm (Integrated Solid Wase Management) अंतर्गत घनकचरा विभाग व मोटारवाहन विभाग यांच्याकडील सर्व प्रकल्प, वाहने, मनुष्यबळ याचे संगणकीय एकत्रिकरण करण्याचे काम हाती घेण्यात आले आहे. या कामाची वर्क ऑर्डर मे. VANN (M/s. Vaaan Infra Pvt. Ltd.) यांना देण्यात आली असुन प्रत्यक्ष जागेवर करावयाच्या कामांच्या अनुषंगाने मटेरीयल खरेदीची प्रक्रिया सुरु करण्यात आली आहे.
- **नवीन समाविष्ट गावे –** नवीन २३ गावांचा समावेश पुणे मनपामध्ये झालेला असुन या गावामधील घनकचरा विषयक विविध कामासाठी नियोजन करण्यात येत आहे. अस्तिवातील जागा ताब्यात घेऊन तेथे कचरा हस्तांतरण केंद्र /कचरा प्रक्रिया प्रकल्प उभारणेचे नियोजन आहे. या गावांसाठी अतिरिक्त स्वच्छता कर्मचारी यांची मागणी करण्यात येत आहे. त्याचप्रमाणे काही भागात सुरु असलेल्या प्रकल्पासाठी आवश्यक ती मान्यता घेण्यात येत आहे. सदर गावांमधील पुर्वीपासुन साठविण्यात आलेल्या कचऱ्यावर प्रक्रिया करण्यासाठी नियोजन करण्यात येणार आहे.
- सर्व कचरा रॅम्पवरुन सुका कचरा १५० मे. टन प्रतिदिन क्षमतेने सिमेंट कंपन्यांमध्ये इंधनासाठी वापरण्यासाठी निविदा प्रक्रिया राबविण्यात आली आहे.
- **गार्डन वेस्ट** – सद्यस्थितीत सुमारे १०० मे. टन गार्डन वेस्टवर प्रक्रिया करण्यात येत आहे. यामध्ये ३० टन नारळाच शहाळे व उर्वरित वेस्ट हे झाडाचे कटींग आहे. या कामामध्ये सर्व प्रकारचे गार्डन वेस्ट हे मनपाच्या खर्चाने वाहतुक करुन प्रक्रिया प्रकल्पांना पोहोचविण्यात येत होते. पुढील वर्षी शहरातील सर्व प्रभागातुन सर्व प्रकारचे गार्डन वेस्ट ठेकेदारामार्फत संकलन करणे, वाहतुक करणे व प्रक्रिया करणे या कामासाठी EOI (Expression of Interest) मागविण्यात येत आहे.
- **रॅम्प आधुनिकिकरण –** कचरा हस्तांतरण करणेसाठी सद्यस्थितीत ७ ठिकाणी रॅम्प उभारण्यात आलेले आहे. या व्यतिरिक्त बावधन येथे नवीन तंत्रज्ञानावर आधारित कॅप्सुल कंटेनरच्या स्वरुपातील कचरा हस्तांतरण केंद्र उभारण्यात येणार आहे. सदर हस्तांतरण केंद्रासाठी शहराच्या मध्यवर्ती भागात अशाप्रकारचे आधुनिक हस्तांतरण केंद्र उभारण्याचे खात्याचे नियोजन आहे.

## (४) आरोग्य (महसूली तरतूद र.रु. ४०९.२१ कोटी)

**सन २०२१–२२**

**कोव्हिड –१९**

- **पॉझिटीव्ह रूग्णांना दाखल करण्याकरीता कोविड केअर सेंटरची निर्मिती –**सुमारे ३० ठिकाणी कोविड केअर सेंटर निर्माण करण्यात येऊन सुमारे १०५०० बेडस् कार्यान्वित करण्यात आल्या होत्या व डेडिकेटेड कोविड हेल्थ सेंटर व डेडिकेटेड कोविड हॉस्पिटल येथे सुमारे ७४६६ यापैकी सुमारे १०५५ आय.सी.यू.बेडस् व सुमारे ५२१ व्हेन्टीलेटरची उपलब्धता असे सर्व मिळून सुमारे १८००० बेडस्ची उपलब्धता करून देण्यात आलेली आहे.
- **कॉन्टॅक्ट ट्रेसिंग –** पॉझिटीव्ह रूग्ण आढळल्याबरोबर त्याच्या घरातील व त्याच्या संपर्कात आलेल्या हाय रिस्क व लो रिस्क कॉन्टॅक्ट ना तातडीने क्षेत्रिय कार्यालय व आपत्ती व्यवस्थापन कक्ष यांचेमार्फत नजीकच्या कोविड केअर सेंटर /शाळा येथे आणून आय.सी.एम.आर. प्रोटोकॉल प्रमाणे स्वॅब घेण्यात येतात.
- **स्वॅब टेस्ट –**हायरिस्क कॉन्टॅक्टचा विना विलंब स्वॅब टेस्ट घेण्याकरीता हायरिस्क झोनमध्ये कोविड केअर सेंटर व्यतिरिक्त एकुण १७ ठिकाणी स्वॅब घेण्याची व्यवस्था करण्यात आली आहे .

- **ॲम्ब्युलन्सची उपलब्धता –** कोविड रूग्णांकरीता १५५ रूग्णवाहिका कार्यरत करण्यात आल्या असून पुणे मनपा मार्फत शहरभर एकुण १२५ व १०८ नंबरच्या रूग्णवाहीकेच्या ३० ॲम्ब्युलन्सची व्यवस्था करण्यात आली होती.
- **कॉल सेंटरची स्थापना –** नागरिकांच्या सुविधेकरीता पुणे मनपाचे आपत्ती व्यवस्थापन कक्षामध्ये फोन नं. ०२०-२५५०६८००/ १/२/३/४ हेल्प लाईन तयार करण्यात आली होती.
- **बेड व्यवस्था –** नागरिकांच्या सुविधेकरीता पुणे मनपाच डॅशबोर्ड कक्षामध्ये फोन नं. ०२०-२५५०२११०/०६ हेल्प लाईन तयार करण्यात आली. तसेच येथे कोविड, नॉन कोविड रूग्णांकरीता मार्गदर्शन करण्यात येऊन कोविड रूग्णांकरीता डॅशबोर्डच्या सहाय्याने बेडस्च्या उपलब्धते बाबत मार्गदर्शन करण्यात आले.
- **माझे कुटुंब – माझी जबाबदारी –** दि.१५/९/२०२० पासून **'माझे कुटुंब-माझी जबाबदारी'** ही मोहिम पुणे मनपा कार्यक्षेत्रात सुरू करण्यात आली व घरोघरी सर्वेक्षण करून तपासण्या करण्यात आल्या. सदर मोहिम दोन टप्प्यामध्ये राबविण्यात आली.

**पंडीत दिनदयाळ उपाध्याय अपघात विमा योजना सन २०२१-२२**

- सन २०२०-२१ या आर्थिक वर्षात पुणे शहरातील निवासी मिळकतकरदात्यांसाठी पंडीत दिनदयाळ उपाध्याय अपघात विमा योजना राबविण्यात आलेली होती.
- या योजनेत मिळकतकरधारक व ग.व.नि. सेवाशुल्क भरणाऱ्या नागरीकांची संख्या ७४५९०० एवढ्या करदात्यांना रक्कम रुपये ५ लाखापर्यंत विमा कवच देण्यात आले होते. एप्रिल २०२० ते आजतागायत ४० जणांना अपघात विम्याचा लाभ प्रत्येकी र.रु. ५ लाख रुपयाप्रमाणे र.रु. १,६३,४२,९२४/- पर्यंत विमा रक्कम अदा करण्यात आलेली आहे. सन २०२१-२२ या आर्थिक वर्षात पुणे शहरातील निवासी मिळकतकरदाते व झोनिपु विभागाकडील सेवाशुल्क भरणाऱ्या कुटुंबासाठी पंडीत दिनदयाळ उपाध्याय अपघात विमा योजने कामी निविदा प्रक्रिया राबविण्यात आलेली असून निविदा प्रक्रियेची काम सुरू आहे.

**अंशदायी वैद्यकीय सहाय्य योजना विभाग**

- पुणे महानगरपालिकेच्या सेवेतील शेडयूलमान्य सेवक तसेच सेवानिवृत्त सेवक, विद्यमान सभासद व माजी सभासद यांना अंशदायी वैद्यकीय सहाय्य योजने अंतर्गत लाभ दिला जातो व मान्य धोरणानुसार १% वर्गणी कपात केली जाते. मनपाच्या पॅनेलवर अंतर्भूत असलेल्या हॉस्पिटल्समध्ये सेवकांना औषधोपचारा पोटी ९०% सवलतीचा लाभ देण्यात येतो.
- विद्यमान सभासद व माजी सभासद यांना मनपाच्या पॅनेलवरील हॉस्पिटलमध्ये उपचार घेतल्यास त्यांना १००% सवलत देण्यात येत असून, वैयक्तिक औषधोपचार खर्चापोटी सी.जी.एच.एस. नियमानुसार परतावा अदा करण्यात येतो.

**शहरी गरीब वैद्यकीय योजना विभाग व अंशदायी सहाय्य योजना विभाग**

- **शहरी गरीब वैद्यकीय सहाय्य योजना** – शहरी गरीब वैद्यकीय सहाय योजना ही पुणे म.न.पा. कार्यक्षेत्रातील झोपडपट्टयांमध्ये राहत असलेल्या, दारिद्र्यरेषेखालील पिवळे रेशनकार्ड व कुटूंबाचे वार्षिक उत्पन्न रु.एक लाखपर्यंत असणा-या गरीब कुटूंबियांना लागू करण्यात आलेली आहे. पुणे मनपा तर्फे एका कुटूंबासाठी एका वर्षासाठी जास्तीत जास्त एक लाख इतका खर्च करण्यात येतो. योजने अंतर्गत वैद्यकीय उपचारांसाठी सी.जी.एस.एस. मान्य दराने किडनी, ह्रदयरोग व कॅन्सर या तीन आजारांसाठी र.रू. २,००,०००/- (अक्षरी रक्कम रूपये दोन लाख) या कमाल मर्यादेपर्यंत आर्थिक लाभ देण्यात येत आहे. सन २०२१-२२ या आर्थिक वर्षात आज अखेर एकूण १४,९५० नागरिकांना सभासदत्व कार्ड देण्यात आलेले असुन एकूण शहरी गरीब योजने अंतर्गत १४,४०० नागरीकांनी लाभ घेतलेला आहे. शहरी गरीब योजने अंतर्गत पुणे मनपाचे पॅनेलवरील रुग्णालयामार्फत वैद्यकीय सेवेचा लाभ देणेसाठी सन २०२१-२२ या आर्थिक वर्षासाठी रक्कम रुपये पंचेचाळीस कोटी तरतूद करणेत आलेली आहे. पुणे मनपाचे हद्दीत नव्याने ३४ (११+२३) गावांचा समावेश झालेला आहे. सदर गावातील नागरीकांना मा. स्थायी समिती ठराव क्र.१३०५, दि.२६/१०/२०२१ अन्वये व

मा. महापालिका आयुक्त ठराव क्र. ६/६६२, दि.०३/१२/२०२१ अन्वये शहरी गरीब योजने अंतर्गत पात्र नागरीकांना वैद्यकीय लाभ देण्यात येत आहे.

## भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी वैद्यकिय महाविद्यालय

- वैद्यकीय महाविद्यालयाच्या वैद्यकीय अधिष्ठाता यांची नेमणुक करण्यात आली.
- एन.एम.सी.च्या निकषाप्रमाणे वैद्यकीय महाविद्यालय चालविणे करीता आवश्यक अध्यापक पदांची भरती करण्यात आली आहे.
- नॉन टिंचीग पदांची भरती प्रक्रिया पूर्ण झाली असुन एन.एम.सी. च्या मंजुरीनंतर आदेश देण्यात येणार आहे.
- वैद्यकीय महाविद्यालय स्थापित करणेसाठी वैद्यकीय उपकरणे व मुलभूत सोयी सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या.
- आवश्यक अभ्यासक्रमांची पुस्तकांची खरेदी करण्यात आली.
- वैद्यकीय महाविद्यालय स्थापित करणेसाठी एन.एम.सी. यांचे कडील मान्यता प्राप्त करणेसाठी पाठपुरावा करणेत येत आहे.

## सन २०२२–२३

- **पुणे मनपा क्षेत्रात कोव्हिड –१९ प्रादुर्भाव रोखणेसाठी संभाव्य तिसऱ्या लाटेची पुर्वतयारी –**
- कोव्हिड – १९ प्रादुर्भाव :- माहे मार्च २०२० पासून पुणे म.न.पा. क्षेत्रातील एकुण ५०९२७६ कोरोना बाधीत झालेल्या रुग्णांपैकी ४९९०९२ (९८%) इतके रुग्ण बरे झालेले आहेत. तसेच जानेवारी २०२२ अखेर ९२१४ कोरोनाबाधीतांचा मृत्यू झाला आहे.
- पुणे महानगरपालिका कार्यक्षेत्रात ऑमिक्रोनचे आजवर १२ रूग्ण सापडले आहेत. त्यापैकी ६ रूग्णांनी परदेशी प्रवास केला आहे तर २ रूग्ण ऑमिक्रोन रूग्णाच्या संपर्कात आहे. या रूग्णांपैकी ४ रूग्णांना सौम्य प्रकारची लक्षणे होती तर ८ जणांना काही लक्षणे नव्हती. ओमिक्रोनचे निदान झाल्यावर रूग्णांना त्वरित संस्थात्मक विलगीकरण करण्यात येत आहे. ५ रूग्णांची दहाव्या दिवसाची RTPCR तपासणी निगेटिव्ह आल्यानंतर त्यांना डिसचार्ज दिले आहे. रूग्णांच्या संपर्कातील आलेल्या सर्व व्यक्तींचे RTPCR तपासणी केली जात असून त्यात पॉझिटिव्ह रूग्णांची ऑमिक्रोन तपासणी केली जात आहे. या पार्श्वभूमीवर पुणे म.न.पा. क्षेत्रात तयारी करण्यात आली आहे.
- मा. मुख्यमंत्री कार्यालय, महाराष्ट्र शासन व वैद्यकिय तज्ञांनी पुण्यात कोरोनाची तिसरी लाट जानेवारी आणि फेब्रुवारी २०२२ मध्ये येण्याची संभावना वर्तविली आहे. प्रतिबंध हाच उपाय असल्याने नागरीकांनी सोशल डिस्टन्सिंग आणि मास्कचा वापर व वारंवार हात धुणे, सॅनिटाईज करणे या नियमांचे सातत्याने काटेकोर पालन करण्यासाठी जनजागृती करण्यात येत आहे.

**कोव्हिड – १९ साठी पुणे म.न.पा. क्षेत्रात विशिष्ट पायाभूत सुविधांची आवश्यकता व उपलब्धता :**

- आजपर्यंत सर्वाधिक कोव्हिड – १९ (दुसऱ्या लाटेतील) सक्रीय रुग्ण संख्या = ५६६३६
- भविष्यात अत्यंत गंभीर परिस्थिती निर्माण झाल्यास – १.५ च्या पटीत (शासन मार्गदर्शन सुचनेनुसार) सर्वाधिक कोव्हिड – १९ सक्रीय रुग्ण संख्या = ८४९५४
- **पुणे मनपाची बेडस् उपलब्धतेबाबत तयारी –**

**शासकिय –**अंदाजीत वाढ होणाऱ्या रूग्णांची संख्या – ८४९५४, होम आयसोलेशन – ५५२२०, आवश्यक शासकिय बेडस् – १४८६७ कोविड केअर सेंटर आवश्यक बेडस् –७४३३ उपलब्ध बेडस् –१७८०, ऑक्सिजन आवश्यक बेडस् ४७५७ उपलब्ध बेडस् २५३६, आय.सी.यु. आवश्यक बेडस् – ५९५ उपलब्ध बेडस् ४५१ , आय.सी.यु.आणि व्हेन्टीलेटर आवश्यक बेडस् –५९५ उपलब्ध बेडस् २२६

**खाजगी –**अंदाजीत वाढ होणाऱ्या रूग्णांची संख्या ८४९५४-, होम आयसोलेशन – ५५२२०, आवश्यक खाजगी बेडस् – १४८६७ कोविड केअर सेंटर आवश्यक बेडस् –७४३३ उपलब्ध बेडस् –३५३४, ऑक्सिजन आवश्यक बेडस् ४७५७, उपलब्ध बेडस् ५४०२, आय.सी.यु. आवश्यक बेडस – ५९५ उपलब्ध बेडस् ४५६, आय.सी.यु.आणि व्हेन्टीलेटर आवश्यक बेडस् –५९५ उपलब्ध बेडस् ५८३
खाजगी कोव्हिड सेंटर यांना मान्यता देण्यात आल्यास वरील बेडस् उपलब्ध होतील.

- **ऑक्सिजन व्यवस्थापन**

| नाव | आवश्यक (मेट्रीक टन) | उपलब्ध (मेट्रीक टन) | मान्यता प्राप्त (पुढील १ महिन्यात कार्यान्वित) | एकुण |
|---|---|---|---|---|
| ओजीपी | ३१ | १७.७ | ६.२१ | २३.९१ |
| एलएमओ | ७८ | ७४ | ४९ | १२३ |
| डयुरा | ३१ | १४ | १४ | २८ |
| जम्बो | १५.६ | ५.५ | ० | ५.५ |
| ओ२ कॉन्सट्रेटर | १८५८ | ६११ | ० | ६११ |

- **आरोग्य सेवा व सुविधा –**
- स्वॅब सेंटर – एकुण १८ सेंटर, प्रयोगशाळा तपासणी– शासकिय– ३ व खाजगी– ३६, नमुना तपासणी क्षमता (शासकिय) ६००० प्रतिदिन, तपासणी प्रकार– RTPCR आणि RAT, कोविड केअर सेंटर– ८, वैद्यकिय साधनसामुग्री, रूग्ण संख्येच्या आवश्यकतेप्रमाणे वैद्यकीय मनुष्यबळ उपलब्ध करून घेण्यात येणार आहे.
- **कॉन्टॅक्ट ट्रेसिंग –** पॉझिटीव्ह रूग्ण आढळल्याबरोबर त्याच्या घरातील व त्याच्या संपर्कात आलेल्या हाय रिस्क व लो रिस्क कॉन्टॅक्ट ना तातडीने क्षेत्रिय कार्यालय व आपत्ती व्यवस्थापन कक्ष यांचेमार्फत नजीकच्या कोविड केअर सेंटर/शाळा येथे आणून आय.सी.एम.आर. प्रोटोकॉल प्रमाणे स्वॅब घेण्यात येतो
- **कोव्हिड – १९ प्रतिबंधात्मक वर्तन अंमलबजावणी अहवाल**

मास्क न वापरणाऱ्या नागरीक – १७५१९
मास्क न वापरणाऱ्या नागरीकांवर र.रु. – ९०,०७,०५५/– एवढी दंडात्मक कारवाई करण्यात आली आहे.
तसेच कोव्हिड प्रतिबंधक वर्तणूक न केलेली सार्वजनिक (उदा.हॉटेल ,सिनेमागृह,मॉल) येथे ३०२१५ ठिकाणी कारवाई करण्यात आली आहे.
वरील प्रमाणे सार्वजिनक ठिकाणांवर केलेल्या दंडात्मक कारवाई नंतर जमा झालेली र. रू. ९४,९३,१७८/–

- **पंडित दिनदयाळ उपाध्याय अपघात विमा योजना सन २०२२–२३**
- पुणे महानगरपालिकेच्या सन २०२२–२३ या आर्थिक वर्षातील निवासी मिळकतकर व या योजने अंतर्गत सन २०२१–२२ प्रमाणेच झोनिपु विभागाकडील सेवाशुल्क भरणाऱ्या कुटुंबासाठी योजनेचा लाभ मिळणार आहे.
- मिळकतकरधारकाचा (पती/पत्नी) अपघाती मृत्यू झाल्यास त्याच्या कुटुंबास ५ लाख रुपये (र.रु. ५,००,०००/–)
- मिळकतकरधारकावर अवलंबून असलेल्या २६ वर्षांखालील पहिल्या दोन मुलास (पाल्यास) अपघाती मृत्यू आल्यास त्याच्या कुटुंबाला मुळ विमा रकमेच्या ५०% म्हणजे दोन लाख पन्नास हजार रु. (र.रु. २,५०,०००/–)
- मिळकतकरधारकाच्या पालकांसाठी (आई–वडील) अपघाती मृत्यू आल्यास मूळ विमा रकमेच्या १००% म्हणजे रु. पाचलक्ष. (र.रु. ५,००,०००/–)
- कुटुंबातील व्यक्तीला कुठल्याही प्रकारचा अपघात झाल्यास कुटुंबातील सर्वांना मिळून किंवा एका व्यक्तीला एका वर्षामध्ये जास्तीत जास्त दोन लाख रु. (र.रु. २,००,०००/–) दवाखान्यात असतानाचा औषधाचा व दवाखान्याचा खर्च देण्यात येईल.

- वरील पाच लाख रुपयांचे विमा संरक्षण एका कुटुंबातील सर्वांना मिळून किंवा एका व्यक्तीला वर्षातून एकदा वापरता येईल.
- रुग्ण वाहिकेसाठी रुपये तीन हजार (र.रु. ३०००/-)
- अपघाताने पुर्णत: कायमस्वरुपी अपंगत्व आल्यास मूळ विमा रकमेच्या १००% म्हणज रुपये पाच लक्ष (र.रु. पाच लक्ष)
- कुटुंबातील व्यक्तीला अपघाताने अंशत: कायमस्वरुपी अपंगत्व आल्यास IRDA च्या नियमांप्रमाणे दिलेल्या अपंगत्वाच्या प्रमाणानुसार लाभ.
- मिळकतकरधारकांना दिव्यांग मुल असेल व त्याला अपघाती मृत्यू झाल्यास मूळ विमा रकमेच्या १००% म्हणजे पाच लाख रु. (र.रु. ५,००,०००/-) (वयाची अट असणार नाही.)
- मिळकतकरधारकावर जर त्यांची घटस्फोटीत मुलगी किंवा अविवाहीत मुलगा /मुलगी अवलंबून असेल तर त्याला किंवा तिला अपघाती मृत्यू झाल्यास मूळ विमा रकमेच्या १००% म्हणजे पाच लाख रु. (र.रु. ५,००,०००/-) (वयाची अट असणार नाही)

**अंशदायी वैद्यकीय सहाय्य योजना विभाग**

- सन २०२१-२२ या आर्थिक वर्षासाठी अंशदायी वैद्यकीय सहाय योजने अंतर्गत पुणे मनपाने पॅनेलवरील रुग्णालयामार्फत वैद्यकीय सेवेचा लाभ देणेसाठी र.रू. ४० कोटी ५० लाख तरतूद करणेत आलेली आहे. अंशदायी वैद्यकीय सहाय्य योजनेअंतर्गत सभासद सेवक संख्या १४,८८७ व सेवानिवृत्त सेवक संख्या ६,८९४ असे एकूण सभासद सेवकांची संख्या २१,७८१ इतकी असून त्यांचे वैद्यकीय बिलांची प्रतिपुर्ती करणेत येते. सबब सन २०२२-२३ या आर्थिक वर्षासाठी शहरी गरीब योजनेसाठी अंदाजे र.रू. ५० कोटी अंदाजपत्रकीय तरतूदीची आवश्यकता भासणार आहे.
- तसेच विद्यमान सभासद यांची संख्या १७८ इतकी असून त्यांचे वैद्यकीय सेवा सुविधेसाठी व बिलांचे प्रतिपुर्तीसाठी सन २०२१-२२ च्या अंदाजपत्रकामध्ये र.रू. २ कोटी ७० लाख तरतूद करण्यात आली होती. सद्यस्थितीत सदरची तरतूद संपुष्टात आलेली आहे. सन २०२२-२३ च्या अंदाजपत्रकामध्ये र.रू. २ कोटी वाढ करण्याची आवश्यकता आहे.
- माजी सभासद यांची संख्या २१८ इतकी असून त्यांचे वैद्यकीय सेवा सुविधेसाठी व बिलांचे प्रतिपूर्तीसाठी सन २०२०-२१ च्या अंदाजपत्रकामध्ये ९० लाख अधिक वर्गीकरणाने र.रू. १ कोटी ५० लाख असे र.र. २ कोटी ४० लाखाचे तरतूद करण्यात आलेली होती. सद्यस्थितीत सदरची तरतूद संपुष्टात आलेली आहे. सबब सन २०२२-२३ च्या अंदाजपत्रकामध्ये र.रू. २ कोटी वाढ करणे आवश्यक आहे.

**शहरी गरीब वैद्यकीय योजना विभाग**

- **शहरी गरीब वैद्यकीय सहाय्य योजना** - या योजने अंतर्गत सन २०२१-२२ प्रमाणेच मान्य धोरण व नियमानुसार योजनेचा लाभ मिळणार आहे. नव्याने ३४ गावे समाविष्ट झाल्याने समाविष्ट ३४ गावातील नागरीकांना शहरी गरीब योजनेअंतर्गत सेवा सुविधा पुरविणेकामी आर्थिक तरतूदीमध्ये वाढ करणे आवश्यक आहे. सन २०२२-२३ या आर्थिक वर्षासाठी शहरी गरीब योजनेसाठी अंदाजे र.रू. ६० कोटी अंदाजपत्रकीय तरतूदीची आवश्यकता भासणार आहे.
- **पशुवैद्यकीय विभाग**
- **सन २०२२-२३ अंदाजपत्रकातील प्रस्तावित योजना**
- जागतिक बँकेच्या अर्थसहाय्याने कोंढवा येथील शेळी व मेंढी यांच्या कत्तलखान्याचे आंतरराष्ट्रीय दर्जाचे धर्तीवर (APEDA STANDERD) आधुनिकीकरण करण्यासाठी पुणे महानगरपालिकेस र.रु. ७ कोटी १००% अनुदान हप्त्याहप्त्याने प्राप्त होणार आहे. सदर प्रकल्पा अंतर्गत पुणे शहरातील नागरिकांना उत्तम दर्जाचे मांस मिळेल तसेच पुणे शहरातील अनधिकृत होत असलेल्या मांस कटाईस प्रतिबंध होईल. सदर प्रकल्प कार्यान्वित

होण्यापूर्वी जागतिक बँकेच्या निर्देशाप्रमाणे PPP तत्वावर चालविण्यास देण्यात येईल. त्यासाठी प्रकल्प कार्यन्वित करण्याच्या दृष्टीने अंदाजपत्रकीय तरतूद सुचविण्यात आली आहे.

- खाजगी संस्थानी पुणे महानगरपालिकेच्या हद्दीत खाजगी/भाड्याच्या जागेत मांजरीसाठी इन्फ्रास्ट्रक्चर उभारून किंवा अस्तित्वात असलेल्या इन्फ्रास्ट्रक्चरचा वापर करून भटक्या व मोकाट मांजरी स्वत:च्या वाहनांमार्फत व सेवकांमार्फत पकडणे त्यांची नसबंदी शस्त्रक्रिया करणे व अँटी रेबीज लसीकरण करणे पकडलेल्या ठिकाणी पुन्हा सोडणे यासाठी स्वतंत्र नव्याने निविदा प्रक्रिया करण्याचे नियोजन आहे.

- पुणे शहरातील भटक्या व मोकाट कुत्र्यांचा उपद्रव कमी करण्याच्या दृष्टीने तसेच कुत्र्यांची नसबंदी शस्त्रक्रिया करण्याचे प्रमाण वाढविण्याच्या हेतूने भारतीय जीवजंतू कल्याण मंडळ (Animation Welfare Board of India) यांचे सभासदत्व असलेल्या संस्थांकडून स्वतःचे इन्फ्रास्ट्रक्चर, सेवकवर्ग, वाहने, ऑपरेशन खर्च व अँटी रेबीज लसीकरण या कामासाठी वर्तमान पत्रातून जाहीर प्रकटना द्वारे संस्था बोलावून त्याचे Empanel करण्यात येणार असून सध्या होणाऱ्या नसबंदी शस्त्रक्रिया करण्याच्या प्रमाणात तीन पट वाढ करण्याचे नियोजन आहे.

- Goverment Of India च्या निधीतून कोंढवा कत्तलखाना येथे प्रयोग शाळा उभारण्यात आली असून सदर प्रयोग शाळा मासिक र.रू. २,५१,७८६/-रुपये इतक्या किमतीने १० वर्ष कालावधी साठी भाड्याने देण्यात आली असून प्रती वर्षी १०% भाड्यामध्ये वाढ मनपास प्राप्त होणार आहे. तसेच सदर ठेकेदाराकडून प्रयोग शाळेच्या सुरक्षेसाठी ३ कोटी रुपये किमतीची Bank Gaurantee घेण्यात येणार आहे. या प्रयोग शाळे मध्ये सर्व अन्न पदार्थ व पाणी नमुने तपासणी करण्यासाठी उपलब्ध होणार आहे.

**भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी वैद्यकिय महाविद्यालय**

- पुणे शहरातील नागरीकांसाठी वैद्यकीय महाविद्यालयाचे माध्यमातून सुलभ व व्यापक वैद्यकीय सेवा उपलब्ध करणेस्तव महानगरपालिकेचे 'भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी वैद्यकीय महाविद्यालय' उभारणे हा महत्वाकांक्षी प्रकल्प प्रस्तावित आहे.

- मा.मुख्य सभा ठराव क्रमांक ३११ दिनांक-२८/०८/२०१९ अन्वये वैद्यकीय शिक्षण ट्रस्ट स्थापन करून पुणे महानगरपालिकेचे वैद्यकीय महाविद्यालय स्थापित करणेची कार्यवाही करणेस मान्यता मिळालेली आहे.

- मा.अवर सचिव, नगर विकास विभाग, महाराष्ट्र शासन,मंत्रालय यांची वैद्यकीय ट्रस्ट फॉर्मेशन स्थापन करणेबाबत शासनाची मान्यता प्राप्त झाली आहे.

- पुणे महानगरपालिका वैद्यकीय शिक्षण ट्रस्ट (पी.एम.सी.- एम.ई.टी.) विश्वस्त व्यवस्थांच्या नोंदणीचे प्रमाणपत्र प्राप्त झाले आहे.

- दि.२५/११/२०२० रोजी DMER यांचेकडून ESSENTIALITY CERTIFICATE व दि.२८/११/२०२० रोजी MUHS नाशिक यांचेकडून AFFILIATION CONSENT प्राप्त झाले आहे.

- NMC यांची मान्यता मिळणेकरीता NMC यांच्या निकषाप्रमाणे फर्निचर, यंत्र-सामुग्री, व पुस्तकांची खरेदी करणेत आली आहे.

- वैद्यकीय महाविद्यालय सुरु करणे करीता NMC यांच्या निकषाप्रमाणे आवश्यक टिंचीग पदाची नेमणुक निवड प्रक्रियेव्दारे करण्यात आली आहे. तसेच नॉन टिंचीग पदाची भरतीची कार्यवाही अंतिम टप्प्यांमध्ये आहे.

- 'भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी वैद्यकीय महाविद्यालयाचे' प्रथम वर्ष चालु करणेकरीता NMC यांचे कडे अर्ज सादर करण्यात आला आहे.

## (५) नगर नियोजन

**सन २०२१-२२**

- **सन २०२१-२२ मधील महत्त्वाच्या पूर्णत्वास/सुरू असलेल्या नाविण्यपूर्ण योजना/प्रकल्पांची नावे, ठळक बाबी**
- **शहर अभियंता कार्यालय डि.पी.मार्कींग व इतर योजना**
- पुणे शहराचा (जुनी हद्द ) व यापुर्वी समाविष्ट २३ गावांचा विकास आराखडा तयार करण्यात आला आहे. सदर आराखड्यामध्ये विविध डि.पी. रस्ते व आरक्षणे नियोजित करण्यात आलेली आहे.
- सदर विकास योजनेतील रस्त्याची हद्द व आरक्षणे आखणी निश्चित करणेबाबत तसेच प्रत्यक्ष जागेवर डि.पी.रस्त्यांचे मार्कींग करणेबाबत कार्यवाही करण्यात येत आहे. अशारितीने आरक्षणाची हद्द निश्चित झाल्यास तेथे अतिक्रमण होऊ शकणार नाही. तसेच रस्त्याचे व आरक्षणाचा ताबा व विकसन करणेही पुणे महानगरपालिकेस सुलभ होणार आहे.
- २०१२ साली समाविष्ट मौजे येवलेवाडी गावाचा प्रारुप विकास आराखडा मा.मुख्य सभेच्या मान्यतेनुसार महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ३० अन्वये मे. शासनास अंतिम मंजुरीकरीता सादर करण्यात आला आहे.
- **नगर रचना परियोजना (टि.पी. स्कीम) –**
- **मे. केंद्र शासनाने अमृत अभियानाअंतर्गत** ''Pilot on Formulation on Local Area Plan And Town Planning Scheme'' या योजनेची अंमलबजावणी करण्यात आली आहे. सदर योजने अंतर्गत देशातील २५ शहरांमध्ये या योजनेची प्रायोगिक तत्वावर अंमलबजावणी करण्यात येत आहे. सदर २५ शहरांमध्ये राज्यातील पुणे शहराची निवड केंद्र शासनाने केली आहे. पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने जाहीर केलेल्या इराद्यानुसार मौजे ऊरळी देवाची व फुरसंगी या गावांमधून जाणाऱ्या ६५ मी. रुंद बाह्यवळण रस्त्याच्या विकसनासाठी तीन नगर रचना परियोजना तयार करण्याचा प्रस्ताव तयार करण्यात आलेला आहे. पुणे महानगरपालिकेने केंद्र शासनास सादर केलेल्या मौजे फुरसुंगी व उरूळीदेवाची येथील ''Pilot Town Planning Scheme'' ला केंद्र शासनाने मान्यता दिली आहे.
- नगररचना कायद्यातील तरतुदीनुसार मिळकतधारकां समवेत बैठका आयोजित करण्यात आल्या होत्या व त्या बैठकांमधून मिळकतधारकांना टीपी स्किमचे महत्व व त्यातून मिळणाऱ्या सोयी सुविधांबाबत माहिती करून देण्यात आली. आवश्यक कागदपत्रजमा करणेबाबत त्यांना मार्गदर्शन करण्यात आले आहे.
- सदर ३ टीपी स्किम च्या क्षेत्रातील सर्वेक्षण काम पूर्ण होऊन प्रारूप आराखडा तयार करण्यात आला आहे. प्रारूप नगर रचना परीयोजनेचा मसुदा नगररचना अधिनियम १९६६ अन्वये मा. संचालक, नगर रचना महाराष्ट्र राज्य यांच्या मान्यतेसाठी पाठविण्यात आलेला आहे. सदर मंजुरीनंतर मा. मुख्य सभेच्या मान्यतेने प्रारूप आराखडा प्रसिध्द करणेत येणार आहे.
- नगर रचना योजनेच्या अंमलबजावणीमुळे ६५ मी. बाह्यवळण रस्त्याखालील क्षेत्र प्राधिकरणाला विकसित करणे शक्य होईल व पुणे महानगरपालिकेस अंतर्गत रस्ते व सोयीसुविधासाठी जागा उपलब्ध होणार आहे.
- **११ गावांचा प्रारुप विकास आराखडा**
- विद्यमान जमीन वापर नकाशा व अहवाल तसेच महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम २६ अन्वये प्रारुप विकास आराखडा तयार करुन नागरिकांच्या हरकती व सूचना मागविणेकरिता प्रसिध्द करण्यात येणार आहे. विकास आराखड्याची संपूर्ण वैधानिक प्रक्रिया पूर्ण करुन सदरच्या प्रारुप विकास आराखड्यास मा. मुख्य सभेची मान्यता घेऊन मे. शासनाकडे अंतिम मंजूरीसाठी सादर करण्यात येणार आहे.
- **सन २०२२-२३**

पुणे महानगरपालिकेत नव्याने समाविष्ट झालेल्या ११ गावांचा प्रारुप विकास योजना आराखडा तयार करण्याच्या दृष्टीने तसेच भविष्यकालीन लोकसंख्येचा आढावा, सामाजिक, आर्थिक विश्लेषण याकरिता

गोखले इन्स्टिट्युट्स ऑफ पॉलिटिक्स ॲण्ड इकॉनॉमिक्स या संस्थेमार्फत ११ गावांमध्ये नमुना सर्वेक्षण करण्यात आले आहे. त्याचा सविस्तर अहवाल तयार करण्यात येत आहे. समाविष्ट ११ गावांचे हद्दी दर्शविणारा नकाशा जाहीर प्रकटनासह प्रसिध्द करणेत आलेला आहे. या सर्वेक्षणातून संकलित करण्यात आलेल्या माहितीच्या आधारे ११ गावांसाठी प्रारुप विकास योजना आराखडा तयार करण्याचे काम सुरु आहे.

- **प्रधानमंत्री आवास योजना प्रगती व अंमलबजावणी अहवाल.**

**सन २०२१-२२**

प्रधान मंत्री आवास योजने अंतर्गत आर्थिक दुर्बल घटकांतील पात्र लाभार्थ्यांना परवडणारी घरे देण्याचे उद्दीष्ट पूर्ण करण्यासाठी हडपसर, खराडी व वडगाव खु. येथे एकूण ५ ठिकाणी २९१८ सदनिकांचे बांधकाम व सद्यपरिस्थितीतील खालील प्रमाणे

१. मौजे खराडी स.नं.५७/५ (पै) येथील ७८६ सदनिकांचा प्रकल्प, प्लॉट नं. १ - ३८% कामपूर्ण
२. मौजे हडपसर स.नं.१०६अ हिस्सा नं. १६(पै) +१७(पै) +१८(पै) येथील ३४० सदनिकांचा प्रकल्प - हिस्सा १६ अ व १७ अ - ३०% कामपूर्ण
३. मौजे हडपसर स.नं.१०६अ हिस्सा नं. १२(पै) +१३(पै) येथील १०० सदनिकांचा प्रकल्प - हिस्सा १२ अ - ३ ब - १५% कामपूर्ण
४. मौजे हडपसर स.नं.८९ +९२(पै) येथील ५८४ सदनिकांचा प्रकल्प - १५% कामपूर्ण
५. मौजे वडगाव स.नं.३९(पै) +४०(पै) येथील ११०८ सदनिकांचा प्रकल्प - ४५ % कामपूर्ण

- **सन २०२२-२३ मधील करावयाचे प्रस्तावित महत्वाचे प्रकल्प / योजना**

विकास नियंत्रण नियमावली २०१७ मध्ये नॅशनल टिओडी पॉलिसी अंतर्भुत करण्यात आली आहे. त्यानुसार प्रभाव मुल्यांकन अभ्यास (Impact Assesment) करणेबाबत तरतूद आहे. त्यामध्ये मेट्रो स्टेशन हद्दी पासुन ५०० मी. अंतरापर्यंत २ ते ४ चटई क्षेत्र निर्देशांक प्लॉटचे क्षेत्रानुसार व प्लॉट समोरील रस्त्याचे रूंदीनुसार संबंधीतांना मिळणार आहे. तसेच टीओडी झोन मधील रहिवासी तसेच शासकीय व निमशासकीय क्षेत्राकरिता पार्किंगमध्ये सवलत मिळणार आहे.

प्रभाव मुल्यांकन अभ्यास करणेकरिता (Impact Assesment) निविदा मागविण्यात आल्या होत्या. भारत सरकारचे अंगीकृत तज्ञ सल्लागार मे. अर्बन मास ट्रान्सपोर्ट कंपनी लि. यांचेमार्फत Impact Assesment Study करणेत येत आहे. यामध्ये पुर्नविकास एकत्रीकरण, रिअल इस्टेट संभाव्यता आणि बाजार विश्लेषणाचे मुल्यांकन करणे, सार्वजनिक सुविधा, भौतिक पायाभूत सुविधा, रहदारी आणि पर्यावरणावर मेट्रो कॉरिडोरच्या बाजुने प्रस्तावित वाढीव एफएसआयच्या परिणामाचे मुल्यांकन करणे, मुल्यांकन आधारे आवश्यक शमन उपाय आणि शिफारशी कालांतराने कृती योजनेसह सादर करणेत येणार आहे.

आतापर्यंत तज्ञ सल्लागार यांचेमार्फत पीसीएमसी ते स्वारगेट मेट्रो अंतर्गत ६ स्टेशन, वनाज ते रामवाडी मेट्रो अंतर्गत १६ स्टेशन व शिवाजीनगर ते हिंजेवाडी अंतर्गत १४ स्टेशन असे एकुण ३६ स्टेशन करिता फेज-१ व फेज-२ चे काम पूर्ण करणेत आलेले आहे. फेज ३ चे काम सुरू असून एच.सी.एम.टी.आर अंतर्गत २६ स्टेशनसाठीचा सर्व्हे सुरू आहे.

- **प्रधानमंत्री आवास योजना - सन २०२२-२३ मध्ये करावयाचे प्रस्तावित महत्वाचे प्रकल्प /योजना**

सन २०२२-२३ या आर्थिक वर्षात खाजगी भागीदारी तत्वावर प्रकल्प राबविण्याचे नियोजन करण्यात येत आहे. सदरच्या जागा बाणेर, बालेवाडी, कोंढवा बु., धानोरी, महम्मदवाडी, फुरसुंगी (गायरान) या ठिकाणी या प्रकल्प अंतर्गत आर्थिकदृष्टया दुर्बल घटकांना उपलब्ध करण्याचे नियोजन असून पुढील ३ ते ५ वर्षात सदनिकांचे बांधकाम पूर्ण होऊन नागरिकांना घरे देण्याचा प्रशासनाचा प्रयत्न राहील.

सन २०२२-२३ मध्ये चालू असलेल्या सर्व प्रकल्पांचे काम पूर्ण करण्यात येणार आहे. त्यासाठी सुमारे र.रू. १२० कोटी इतक्या तरतुदीची आवश्यकता लागणार आहे.

## (६) <u>वाहतूक नियोजन व प्रकल्प (भांडवली तरतूद र. रु.६६९.८० कोटी)</u>

- **सन २०२१-२२**
- सार्वजनिक वाहतुक व्यवस्था व विशेष प्रकल्प या अर्थशिर्षकांतर्गत सन २०२१-२२ मध्ये नदीपुनरुत्जीवन प्रकल्प, वाहनतळ विकास व सुधारणा, उड्डाणपुल, नदीवरील पुल, इ. प्रकल्प सुरु आहेत. तसेच चालू आर्थिक वर्षात सुरू असलेल्या उडड्डाणपुलांची कामे पूर्ण करण्याचे नियोजन आहे.
- **सन २०२१-२२ मधील पूर्ण/पूर्णत्वास आलेले प्रकल्प/योजना-**
- **बालेवाडी स.नं. ४६/४७ जवळ मुठा नदीवर पुल बांधणे –** सदर कामाचे पुणे मनपा हद्दीकडील बाजूच्या ॲप्रोच रस्ता व पुलाचे काम पूर्ण करणेत आले आहे. पिंपरी चिंचवड बाजूकडील उर्वरीत एक स्पॅन व ॲप्रोच रस्त्याचे काम पूर्ण करणेत आलेले आहे.
- **सेव्हन लव्हज चौक ते वखार महामंडळ चौक उड्डाणपुल बांधणे –** सदरचे काम पूर्ण झाले असून जुन २०२१ मध्ये सदर पुल वाहतूकीस खुला केला आहे.
- **घोरपडी पुणे येथे पुणे सोलापूर व पुणे- मिरज रेल्वे लाईनवर उड्डाणपुल बांधणे –** बी.टी. कवडे रस्ता, थोपटे चौक घोरपडी येथे पुणे-सोलापूर रेल्वे लाईनवर उड्डाणपुलाचे काम सुरु असून सुमारे १५% पूर्ण झाले आहे. (ROBI)
- **पुणे- मिरज रेल्वे लाईनवरील रामटेकडी व काळेपडळ रेल्वे फाटक येथे विकसित करणेत आलेल्या भुयारी मार्गाचे** रविपार्क येथील काम पूर्ण झाले आहे.
- **नळस्टॉप चौकात उड्डाणपूल बांधणे** - वनाज ते रामवाडी मेट्रो मार्गिकेवर नळस्टॉप चौकात महामेट्रोसोबत उड्डाणपूल बांधणेत येत आहे. उड्डाणपुलासाठी र.रु.३५.२५ कोटी इतकी रक्कम महाराष्ट्र मेट्रो रेल कॉर्पोरेशन लि. यांना महानगरपालिकेकडून टप्प्याटप्प्याने अदा करणेत येणार आहे. आतापर्यंत १७ कोटी इतकी रक्कम आदा करणेत आली आहे. सदरचे काम प्रगतीपथावर असून ९०% इतके काम पूर्ण झाले असून फेब्रुवारी २०२२ अखेर काम पूर्ण करणेचे नियोजन आहे.
- **औंध वाकड / सांगवी रस्त्यावरील अस्तित्वातील पुलाशेजारी नव्याने पुल बांधणे –** सदरचा प्रकल्प पिंपरी चिंचवड महानगरपालिका आणि पुणे महानगरपालिका संयुक्त विद्यमाने राबविण्यात येत असून नवीन पुलासाठी येणारा खर्च पिंपरी-चिंचवड महानगरपालिका ५०% व पुणे महानगरपालिका ५०% अशा पध्दतीने करणेत येणार आहे सदर काम प्रगतीपथावर असून आतापर्यंत ९५% काम पूर्ण झाले आहे. फेब्रुवारी २०२२ अखेरपर्यंत काम पूर्ण करण्याचे नियोजन आहे.
- **गोल्फ क्लब चौक येरवडा येथे उड्डाणपूल बांधणे –** सदरचे काम प्रगतीपथावर असून ४०% काम पूर्ण झालेले आहे. सन २०२२ या वर्षात काम पूर्ण करणेचे नियोजन आहे.
- **मुंबई- बेंगलोर राष्ट्रीय महामार्ग क्र. ४ वर पाषाण- सुस येथे उड्डाणपूल बांधणे-** मुंबई- बेंगलोर राष्ट्रीय महामार्ग क्र. ४ वर पाषाण- सुस येथे उड्डाणपूल बांधणेचे नियोजिन असून या कामाचे पूर्वगणनपत्रक र.रु. ४४.९१ कोटी इतके आहे. सदर कामाकरीता अडीच वर्षाचा कालावधी लागणार असून जागेवर ७०% इतके काम पूर्ण झाले आहे. सदरचे काम जुन २०२२ पर्यंत पूर्ण करणेचे नियोजन आहे.
- **राजाराम पुल येथे बंडगार्डन आर्ट प्लाझाच्या धर्तीवर पेडेस्ट्रीयन प्लाझा विकसित करून सुशोभिकरण करणे-** राजाराम पुलाच्या अपस्ट्रीम बाजुला नदीपात्राचे भागात पेडेस्ट्रीयन प्लाझा तयार करण्याचे नियोजन आहे. जागेवर काम सुरु असून प्रत्यक्षात ४०% इतके काम पूर्ण झाले आहे. मार्च २०२२ अखेर सदरचे काम पूर्ण करणेचे नियोजन आहे.

- **पुणे शहरामध्ये विविध ठिकाणी वाहनतळ विकसित करणे/बांधणे –** या कामांतर्गत वडगाव शेरी, पुण्यनगरी सोसायटी शेजारील वाहनतळाचे काम पूर्ण झाले असून कोंढवा, ईस्कॉन मंदिर शेजारील वाहनतळ विकसित करण्याचे काम प्रगतीपथावर असून मार्च २०२२ अखेर सदरचे काम पूर्ण करणेचे नियोजन आहे.
- **राष्ट्रीय राजमार्ग क्रमांक ४ वरील चांदणी चौकातील रस्त्यांने एकात्मिक विकसनाबाबत –** सदर कामांतर्गत युटीलिटी शिफ्टींगबाबतची कार्यवाही पुणे महानगरपालिकेच्या मलनिःसारण , विदयुत विभागाकडून चालू आहे. झाडे तोडणे व वृक्षारोपण करणे तसेच पाणी पुरवठ्याचे लाईन टाकणेचे काम NHAI मार्फत करणेत येणार असून त्यास महानगरपालिकेमार्फत निधी उपलब्ध करुन देण्याचा ठराव मा. स्थायी समिती मध्ये मान्य झाला आहे. सन २०२१-२२ या आर्थिक वर्षाकरीता र.रु. ४.९० कोटी इतकी तरतूद उपलब्ध झाली आहे.
- **सिंहगड रोड येथे नवीन उड्डाणपुल बांधणे–** वडगाव, नऱ्हे, वडगाव धायरी, खडकवासला, इ. भागाला पुणे शहराशी जोडणारा सिंहगड रस्ता हा एकमेव रस्ता असल्याने या रस्त्यावर वाहतूकीचा मोठया प्रमाणात ताण येतो. सदरचा ताण कमी करणेसाठी सिंहगडरोड येथे उड्डाणपूल प्रस्तावित करणेत आलेला आहे. सदर कामासाठी र.रु. १३५ कोटी इतका खर्च अपेक्षित आहे. सन २०२१-२२ चे अंदाजपत्रकामध्ये सदर कामाकरीता र.रु. १७.५० कोटी इतकी तरतूद उपलब्ध झाली असून या कामाचा कार्यादेश दि. २१/०९/२०२१ रोजी देणेत आला आहे. सदरचे काम सुरु असून मार्च २०२२ अखेर पर्यंत१५% काम पूर्ण होईल.
- **शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय शिवाजीनगर येथे उड्डाणपुल बांधणे अंतर्गत, उड्डाणपुलांवर ध्वनीरोधक बसविणे व अभियांत्रिकी कॉलेज हॉस्टेल ते कॉलेज मैदान यांना जोडणारा पादचारी पुल बांधणे –** कॉलेज ऑफ इंजिनिअरींग येथे उड्डाणपुल बांधणे या अंतर्गत शासकीय महाविद्यालय येथे ध्वनीरोधक बसविणे, जिना करणे इ. कामे पुणे महानगरपालिका व शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय यांचेमध्ये झालेल्या सामंजस्य करारनाम्यामध्ये सुचविणेत आली आहेत त्यानुसार सन २०२१-२२ चे अंदाजपत्रकामध्ये र.रु. ८.४० कोटी इतकी तरतूद उपलब्ध झाली असून सदर कामाची निविदा प्रक्रिया सुरु आहे.

**सन २०२२-२३ चे दृष्टीक्षेपातील अंदाजपत्रक –**

- सार्वजनिक वाहतूक व्यवस्था व विशेष प्रकल्प या अर्थशिर्षकांतर्गत चालु वर्षातील नदीपुनरुत्जीवन प्रकल्प, वाहनतळ विकास व सुधारणा, तसेच पुल/ उड्डाणपूलांची कामे प्रगती पथावर असून सन २०२२-२३ च्या अंदाजपत्रकात नव्याने काही कामे प्रस्तावित करण्यात आली आहेत आणि सद्यस्थितीत सुरु असलेली कामे मार्गी लावण्याचे अनुषंगाने तरतूद सुचविणेत आली आहे.

**सन २०२२-२३ मध्ये करावयाचे प्रस्तावित महत्वाचे प्रकल्प/योजना**

- **विश्रांतवाडी येथे पुणे मनपा व राष्ट्रीय महामार्ग योजने अंतर्गत संयुक्तपणे उड्डाणपुल उभारणे–** सदरच्या कामासाठी तज्ञ सल्लागार यांची नियुक्ती करणेत आली असून पूर्वगणनपत्रक तयार करण्यात येत आहे.
- **कल्याणीनगर ते कोरेगाव पार्क जोडणाऱ्या पुलाचे (**H H Agakhan Bridge) रुंदीकरण करणे- या कामाचे पूर्वगणनपत्रक मान्य झाले असून निविदा प्रक्रिया सुरु करणे आहे.
- **नदी पुनरुत्जीवन प्रकल्प राबविणे –** मुळा, मुठा, मुळा-मुठा या ४४.४ किमी. नद्यांचे पुनरुत्जीवन या प्रस्तावित प्रकल्पास Environment Clearance प्राप्त झाले असून सन २०२२-२३ या आर्थिक वर्षात पुढील प्रमाणे कामे करण्याचे नियोजन आहे व याकरीता र. रु. २७५ कोटी इतकी तरतूद सुचविणेत आली आहे.
  - औंध भागातील सदर प्रकल्प राबविणेसाठी पिंपरी चिंचवड महानगरपालिका, खडकी कॅन्टोन्मेंट बोर्ड यांची मान्यता घेणे.
  - प्रकल्प उभारणीसाठी फायनान्शीयल मॉडेल तयार करणे.
  - या प्रकल्पातील फेज २ चे डिटेल इंजिनिअरींग ड्रॉईंग, एस्टीमेट तयार करणे.
  - पथदर्शी प्रकल्प : संगमवाडी ते येरवडा, तसेच औंध – बाणेर भागातील नदीसाठी टेंडर लावणे.
  - येरवडा ते मुंढवा पर्यंत नदीकाठ विकसित व डी.पी. रस्ता मिळुन PPP धर्तीवर करण्यात येणार आहे.

- **खराडी बायपास चौक येथे उड्डाणपुल / ग्रेड सेपरेटर बांधणे –** सदर कामासाठी तज्ञ सल्लागार नियुक्ती व प्रीटेंडर ॲक्टीव्हीटी इ. बाबी पूर्ण झाल्या आहेत. या कामासाठी र. रु. ८ कोटी इतकी तरतूद सुचविली आहे.

- **जुन्या पूलांची दुरूस्ती करणे** – या कामांतर्गत वि.भा. पाटील पुल बोपोडी, यशवंतराव चव्हाण पुल, एस.एम. जोशी पुल, औंध वाकड पुल (महादजी शिंदे पूल) किर्लोस्कर रेल्वे उड्डाणपुल हडपसर, संचेती रेल्वे उड्डाणपुल (जुना) या पुलांच्या दुरुस्तीचे काम करणेचे नियोजन आहे. याकरीता र. रु. ८ कोटी इतकी तरतूद सुचविली आहे.

- **पुणे शहरातील विविध ठिकाणी कल्व्हर्टची दुरुस्तीची कामे करणे –** सन २०२१–२२ मध्ये पुणे शहरातील मुठा उजव्या कालव्यावरील विविध ठिकाणचे कल्व्हर्टच्या दुरुस्तीचे काम पूर्ण करणेत आले आहे. उर्वरीत कल्र्व्हट दुरुस्तीचे कामासाठी सन २०२२–२३ चे अंदाजपत्रकामध्ये तरतूद सुचविणेत आली आहे.

- **पुणे मेट्रो रेल्वे प्रकल्प–** सदरचे काम महामेट्रो मार्फत सुरु असून,मनपाच्या सहभागाच्या हिश्यासाठी र. रु. ५ कोटी इतकी तरतूद सुचविण्यात आली आहे.

- **राष्ट्रीय राजमार्ग क्रमांक ४ वरील चांदणी चौकातील रस्त्यांचे एकात्मिक विकसनाबाबत –** सदर कामांतर्गत युटीलिटी शिफ्टींगबाबतची कार्यवाही पुणे महानगरपालिकेच्या मलनिःसारण , विद्युत विभागाकडून चालू आहे. झाडे तोडणे व वृक्षारोपण करणे तसेच पाणीपुरवठ्याचे लाईन्स टाकणेचे काम NHAI मार्फत करणेत येणार असून त्यास महानगरपालिकेमार्फत निधी उपलब्ध करुन देण्याचा ठराव मा. स्थायी समिती मध्ये मान्य झाला आहे. सन २०२२–२३ चे अंदाजपत्रकामध्ये र.रु. १० कोटी इतकी तरतूद सुचविणेत आली आहे. यामधून NHAI ला युटीलिटी शिफ्टींग करीता र.रू. ५ कोटी व NHAI कडून Dwelling Unit चे बांधकामासाठी मिळालेली र.रु. १६.४० कोटी रक्कम पुढील तीन वर्षात परत करावयाची असलेने र.रु. ५ कोटी.

- **साधू वासवानी पुल (कोरेगावपार्क) ते बंडगार्डन पुलापर्यंत एकात्मिक वाहतूक आराखडा तयार करुन सदर** पुलाचे पुनर्निर्माण कामासाठी र.रु.२० कोटी इतकी तरतूद सुचविण्यात आली आहे.

- **ॲम्ब्रोसिया रिसॉर्ट ते बावधन उड्डाणपुल/ ग्रेडसेपरेटर बांधणे –** सदरचा उड्डाणपुल बांधल्यास चांदणी चौकाकडून बावधन, मुळशीकडे जाणारी वाहतूक सुरळीत होणार आहे. सदर कामाची प्रकल्पीय र.रु. ५५ कोटी इतकी असून सन २०२२–२३ चे अंदाजपत्रकाकरीता या कामासाठी र.रु. ३ कोटी इतकी तरतूद सुचविणेत आली आहे.

- **करिश्मा चौक ते कर्वे पुतळा उड्डाणपुल बांधणे –** सदर चौकातील वाढत्या वाहतूक समस्या सोडविणेकरीता उड्डाणपुलाचे नियोजन करणेत आले आहे. सदर कामाची प्रकल्पीय तरतूद र.रु.७५ कोटी इतकी असून या कामाकरीता सन २०२२–२३ चे अंदाजपत्रकामध्ये र. रु. १५ कोटी इतकी तरतूद सुचविणेत आली आहे.

- **सनसिटी, सिंहगडरोड ते कर्वेनगर नदीवर पुल बांधणे –** सदर नदीवरील पुल केल्याने सिंहगडरोड परिसर व कर्वेनगर हे एकमेकांना जोडले जाऊन वाहतूकीचे अंतर कमी होऊन वाहतूक सुरळीत होणेस मदत होणार आहे. या कामाकरीता र.रु. ५० कोटी इतकी तरतूद आवश्यक असून सन २०२२–२३ चे अंदाजपत्रकामध्ये र.रु. ५ कोटी इतकी तरतूद सुचविणेत आली आहे.

- **पाषाण – पंचवटी ते कोथरुडला जोडणारा बोगदा करणे** – सदरचा बोगदा हा १.७ कि.मी. लांबीचा असून तो झाल्यास पाषाण–पंचवटी ते कोथरुड चे अंतर कमी होऊन वाहतूकीचा ताण कमी होणार आहे. सदर कामासाठी एन्व्हायरमेंटल ईम्पॅक्ट ॲसेसमेंट, जीओटेक्निकल अहवाल, टोपोग्राफी व इतर कामे करणेकरीता निविदा प्रक्रिया सुरु आहे. सन २०२२–२३ चे अंदाजपत्रकामध्ये सदर कामाकरीता र.रु. २ कोटी इतकी तरतूद सुचविणेत आली आहे.

## (७) पथ(भांडवली तरतूद र. रु.५१४.५२ कोटी + महसूली तरतूद र.रु. ३४२.०४ कोटी = र. रु.८५६.५६ कोटी)

- **सन २०२१-२२ चा दृष्टीक्षेपातील अंदाजपत्रकातील संक्षिप्त माहिती :-** पथ विभागाकडे रस्त्यांवर एम.एन.जी.एल., विविध मोबाईल नेटवर्कींग केबल्स, एम.एस.ई.बी. केबल्स, इ. खोदाईकरिता संबंधितांकडून खोदाई शुल्क आकारण्यात येते. सन २०२१-२२ या आर्थिक वर्षात र.रू. ३०५ कोटी जमा होणे उद्दिष्ट आहे. तथापि, दि. ३१/०१/२०२२ पर्यंत २१५ कोटी उत्पन्न जमा असून मार्च २०२२ अखेर ९० कोटी महसुल उपलब्ध होईल.
- **सन २०२१ च्या दृष्टीक्षेपातील महत्वाची कामे**
- शिवणे खराडी रस्ता - शिवणे ते म्हात्रे पुल ६ कि.मी. व संगमवाडी ते खराडी ११.५ कि.मी. असा एकुण १७.५ कि.मी. रस्त्याचे काम पुर्णत्वाच्या मार्गावर आहे.
- कात्रज कोंढवा रस्ता - ३.५ कि.मी. लांब व ८४ मी. रुंद राजस सोसायटी ते खडीमशीन चौक दरम्यान रस्त्याचे काम हाती घेण्यात आलेले असून यातील ५०० मी. लांबीचे ग्रेड सेप्रेटरचे काम तसेच लगतच्या सर्व्हिस रोडचे काम पूर्ण झालेले आहे. ग्रेड सेप्रेटरचे काम व रस्त्याचे काम सलगरित्या पूर्ण होवून वाहतुक सुरु होण्याच्या दृष्टीकोनातुन भुसंपादनाकरिता प्रशासकीय कार्यवाही सुरु आहे.
- सातारा रोड बीआरटी मार्ग- रस्त्याच्या मध्यभागी बस थांबे त्यालगत दोन्ही बाजूने बीआरटी मार्ग व तद्नंतर रेलिंग टाकून स्वतंत्र वाहतुक मार्ग व रस्त्याच्या कडेला फुटपाथ व सायकल ट्रॅक मार्ग याप्रमाणे पुर्नरचित बीआरटी मार्ग ५.५ कि.मी. लांबीसाठी स्वारगेट ते कात्रज दरम्यान बीआरटीएसचे काम पूर्ण करुन प्रत्यक्ष बस वाहतुकीस सुरु करण्यात आलेले आहे.
- स्ट्रीट फॉर पीपल- केंद्र शासनाचे स्मार्ट सिटी मशिनमार्फत "स्ट्रीट फॉर पीपल" या संकल्पनेवर आधारित रस्ते विकसनाची स्पर्धा सन २०२१ अन्वये घोषित केली आहे. सदर संकल्पनेवर आधारित पाषाण सुस रस्त्याचे विकसन करणेचे ठरविणेत आले आहे. त्यानुसार ऑनलाईन स्पर्धा होऊन विविध डिझाईन मागविणेत आली आहेत. सद्यपरिस्थितीत पाषाण सुस ३६ मी. डी.पी. रस्त्यावरील २.३० कि.मी. लांबीपैकी ५०० मी. लॉकिंग रस्ता या संकल्पनेवर आधारित विकसित केला आहे. त्यामध्ये वाहनांसाठी मार्गिका, सायकल मार्गिका, प्रशस्त पादचारी मार्ग याबरोबर लहान मुलांसाठी किड्स प्लाझा, स्केटींगसाठी रोलर स्केटींग व स्केटर झोन विकसित केला आहे. तसेच जेष्ठ नागरिकांसाठी फ्री जीम सुविधा इ. अंतर्भूत केल्या आहेत. मा. महापौर, पुणे यांनी दि. १५/१२/२०२१ या पादचारी दिनी लोकार्पण केला आहे. सदर २.३० कि.मी. लांबीचा रस्ता याच संकल्पनेवर आधारित येत्या दोन वर्षात पूर्ण करणेत येणार आहे.
- **सन २०२१-२२ मधील महत्वाच्या पुर्णत्वास / सुरु असलेल्या नाविन्यपुर्ण योजना / प्रकल्पांची नावे ठळक बाबी**
- शहरातील आंबिल ओढयावर नाल्याच्या दृष्टीकोनातुन कमी वहन क्षमतेचे पुल पाडून नवीन २१ लहान पुल पुरेशा वहन क्षमतेचे बांधण्याचे काम सुरु आहे. २१ पैकी १० पुलाची कामे पूर्ण झालेली असून उर्वरीत ३ कामे सुरु आहेत व ८ कामे टप्पेनिहाय सुरु करण्यात येत आहे. या कामामुळे आंबिल ओढयाचा पुराचा धोका टळणार आहे.
- महम्मदवाडी परिसरात रहेजा व्हिस्टा ते महम्मदवाडी उंड्री कडे जाणाऱ्या १८ मी. डी.पी. रस्त्यावरील नाल्यावर नवीन पूल बांधण्यात आलेला असून यामुळे परिसरात रस्त्याची नवीन लिंक निर्माण झालेली आहे.
- हडपसर मध्ये रेल्वे क्रॉसिंग खाली बांधण्यात आलेल्या भुयारी मार्गासाठी ॲप्रोच रस्ते रविपार्क सोसायटी नजीक पुर्ण झालेले असून सदर भुयारी मार्गाचा वाहतुकीस वापर सुरु झालेला आहे.
- पुणे स्ट्रीट प्रोग्राम (पीएसपी) योजने अंतर्गत एफ.सी. रोड विकसित करण्यात आले. त्यामध्ये गुडलक चौक येथे कलाकार कट्टा तयार करण्यात आलेला आहे. सदर ठिकाणी सायंकाळी विविध क्षेत्रातील कलाकार, वाद्यवृंद इ. कार्यक्रम होत असतात. तसेच सदरच्या रस्त्यावर ठिकठिकाणी परगोला तयार करण्यात आले असून वृध्द लोकांसाठी विरंगुळा ठिकाण तयार करण्यात आले आहे.

- **पुणे शहरामधील २५ व्ही.आय.पी. रोड बाबत**.- पुणे शहरामधील मुख्य रस्ते (VIP Roads) वर्षभर सुस्थितीत व नागरिकांना वापरण्या योग्य राहणेकरिता विविध प्रकारची देखभाल दुरुस्तीची कामे करणेसाठी सन २०२१-२२ या आर्थिक वर्षामध्ये र.रु. १२ कोटी इतकी तरतुद उपलब्ध करुन देण्यात आली होती. सदर तरतुदीमधून VIP रस्त्यावरील रस्ते दुभाजक दुरुस्ती व पेटींग, पेडेस्ट्रीयन क्रॉसींग, थर्मोप्लास्टीक पेंट, साईन बोर्डस्, कर्बस्टोन दुरुस्ती, सुशोभिकरण इ. कामे करणेकरिता कार्यादेश देण्यात आलेले असून प्रत्यक्ष जागेवर कामे प्रगतीपथावर आहेत.

- **ट्रॅफिक प्लाझा** - ब्रेमेन चौक औंध येथे लहान मुलांसाठी ट्रॅफिक प्लाझा उभारण्यात आलेला असून यामध्ये सिग्नल यंत्रणा, वाहतुक चिन्हे, पादचारी क्रॉसिंग, इ. सुरक्षाविषयक बाबींची प्रत्यक्षात उभारणी करण्यात आलेली आहे. या ट्रॅफिक प्लाझामध्ये वाहतुक विषयक नियमांचे पालन व संस्करण, लहान मुलांमध्ये रुजविण्यासाठी नियमावलीची माहिती देणेकरिता सेफ कीड्स या स्वयंसेवी संस्थेची नेमणुक करण्यात आली असून त्याद्वारे शहरातील प्राथमिक वर्गापर्यंतच्या लहान मुलांना वाहतुक विषयक नियमांवलीचे व त्यांचे पालनाचे मार्गदर्शन व प्रशिक्षण देण्यात येणार आहे.

- **पादचारी दिन** - पुणे मनपाने पादचारी धोरण व अर्बन स्ट्रीट डीझाईन गाईडलाईन्स तयार करणेत आल्या आहेत. त्या आधारावर शहरातील रस्ते व पदपथ इ. निर्माण करणेत येत आहे. शहरातील नागरिकांना चालण्यास प्रोत्साहन देण्यासाठी विना अडथळा व सुयोग्य रचना असणारे पदपथ व सायकल ट्रॅक मार्ग निर्माण करण्याचे काम पुणे महानगरपलिकेमार्फत शहरात हाती घेण्यात आलेले असून ११ डिसेंबर रोजी पुणे मनपाने पादचारी दिन शहराच्या हद्दीत साजरा केलेला आहे. नागरिकांना चालण्यायोग्य फुटपाथ निर्माण करुन पादचारी सुरक्षा विषयक मार्किंग व चिन्हे उभारणेची कार्यवाही केलेली असून विशेष बाब म्हणून शहरातील मुख्य लक्ष्मीरस्ता १ दिवस वाहनांसाठी बंद करुन केवळ पादचाऱ्यांकरिता खुला करण्यात आलेला होता.

- **अमृत मिशन योजना** - या मिशन अंतर्गत महम्मदवाडी येथील गुजर शाळेनजीक असलेल्या तलावातील गाळ काढून व तलावाच्याकडेने भिंती बांधून पायऱ्या करण्यात आलेल्या आहेत. यामुळे येथील पाण्याचे जुने झरे पुनर्जिवित होऊन पाण्याचा तलाव नव्याने निर्माण झालेला आहे.
- **सन २०२२-२३ चे दृष्टीक्षेपातील अंदाजपत्रकातील संक्षिप्त माहिती** – सन २०२२-२३ च्या अंदाजपत्रका अंतर्गत पथ विभागाने भांडवली तरतुद र.रु.५१४.५२ कोटी (पावसाळी लाईन व्यवस्थापनासाठी र.रु. ५०.७५ कोटीसह) + महसुली तरतुद र.रु. ३४२.०४ कोटी अशी एकुण र.रु. ८५६.५६ कोटी प्रस्तावित केलेली आहे.

**सन २०२२-२३ मध्ये करावयाच्या प्रस्तावित योजना –**

- आंबिल ओढयावरील २१ पुलांपैकी पुर्ण झालेले १० पुल वगळता नवीन ११ पुलांची कामे पुर्ण करण्यात येणार आहे.
- एकात्मिक सायकल योजना – नागरिकांना सायकल चालविण्यास प्रोत्साहन देण्यासाठी पुणे मनपाने सायकल क्लब निर्माण करुन त्याद्वारे विविध सायकल फेरीचे कार्यक्रम हाती घेण्यात येत असतात. सद्यस्थितीत शहरातील विविध भागातील मिळून ९५ कि.मी. लांबीचा सायकल ट्रॅक असून नवीन १० कि.मी. लांबीचा सायकल ट्रॅक नव्याने प्रस्तावित आहे.

- शहराच्या गावठाण भागातील ५० वर्ष जुन्या ड्रेनेज लाईन बदलल्यामुळे तसेच २४X७ पाणी पुरवठा योजने अंतर्गत नव्याने टाकण्यात आलेल्या पाण्याच्या लाईनमुळे झालेल्या खोदाईची दुरुस्ती करण्यात आलेली आहे. सदर रस्ते पुर्णतः डांबरीकरण करण्यात येणार असून याकामामध्ये लक्ष्मीरस्ता, केळकर रस्ता, बाजीरावरस्ता, टिळकरस्ता व शिवाजीरस्ता यांचा समावेश आहे.

- पुणे स्ट्रीट प्रोग्राम – पुणे मनपा मार्फत सन २०१६ मध्ये अर्बन स्ट्रीट डिझाईन गाईड लाईनला मान्यता दिले नंतर त्या संकल्पनेवर आधारीत जंगली महाराज रस्ता, फर्ग्युसन रस्ता, बिबवेवाडी रस्ता इ. सुमारे ३५ किमी लांबीचे रस्ते विकसित केले आहेत. पुणे स्ट्रीट प्रोग्राम अंतर्गत वाहतुक सुरक्षितता व पादचारी पुरक रस्त्याची रचना या अनुषंगाने अस्तित्वातील रस्त्याचे नव्याने डिझाईन करुन पुर्नरचना करण्यात येत आहे. नव्याने ५ रस्ते नव्याने डिझाईन करुन पुर्नरचित करण्यात येणार आहे.

- **सन २०२२-२३ मध्ये करावयाचे प्रस्तावित महत्वाचे प्रकल्प व योजना -**
- लॉ कॉलेज रोडला समांतर असा बालभारती ते पौड रस्ता दरम्यान २. १० कि.मी. लांबीचा नवीन लिंक रस्ता करण्याचे नियोजन आहे. या रस्त्यामुळे लॉ-कॉलेज रोड, पौड रोड या रस्त्यावरचा वाहतुकीचा ताण कमी होवून नवीन लिंक निर्माण होणार आहे.
- कात्रज कोंढवा रस्त्यावरील ग्रेड सेप्रेटरचे उर्वरीत काम पूर्ण करणे तसेच शत्रुंजय मंदीर चौकात सदर रस्त्यावर ग्रेडसेप्रेटर वरती पुल बांधण्यात येणार आहे. यामुळे या रस्त्याची वाहतुक सुरळित होणार आहे.
- लोहिया गार्डन ते मिरज रेल्वे लाईन दरम्यान सुमारे १ कि.मी. लांबीचा २ कॅनॉल ओलांडून जाणारा नव्याने रस्ता निर्माण करण्यात येणार आहे. यामुळे महमदवाडी ते हडपसर दरम्यान नवीन वाहतुक लिंक निर्माण होणार आहे.
- **ई व्हेईकल चार्जिंग स्टेशन योजना** - पर्यावरणपुरक इ-दुचाकी योजनेला प्रोत्साहन देण्यासाठी शहरातील प्रमुख रस्त्यांवर, रस्त्याच्या कडेला वाहतुकीस अडथळा होणार नाही, अशा पध्दतीने एकुण ५०० ठिकाणी इ-दुचाकी चार्जिंग स्टेशन खाजगी सहभागातुन बांधणेचे नियोजन आहे. यामध्ये शहरामध्ये ५०० ठिकाणी रस्त्यांलगत इ-दुचाकी चार्जिंग करणेसाठी तसेच नागरिकांना इ-दुचाकी भाडयाने उपलब्ध करुन देणेसाठी चार्जिंग स्टेशन बांधणेस परवानगी देणेत येणार आहे. यामधून मिळणाऱ्या उत्पन्नाचा काही भाग तसेच चार्जिंग स्टेशनचे भुईभाडे मनपास मिळणार आहे. या योजनेमुळे नागरिकांना शहरामध्ये विविध ठिकाणी इ-दुचाकी भाडयाने उपलब्ध होणार आहेत. तसेच खाजगी ई दुचाकीसाठी चार्जिंग स्टेशन देखील उपलब्ध होणार आहेत. यामुळे रस्त्यावरील दुचाकी वाहनांच्या संख्येत घट होणे व प्रदुषण पातळी कमी होण्यास मदत होईल.
- **पीपीपी धर्तीवर प्रस्तावित रस्ते व पुलांची कामे** - शहरातील महत्वाचे विकास आराखडयातील रस्ते व पुल विकसित करण्यासाठी पुरेशी आर्थिक तरतुद कामांच्या प्रमाणात प्रतिवर्षी उपलब्ध होत नाही. यावर पर्याय म्हणून खाजगी सहभागातुन रस्ते व पूल विकसन करण्याचा निर्णय पुणे महानगरपालिकेतर्फे घेण्यात आलेला आहे. यामध्ये रस्ते व पुलांची विकास कामे ही डेव्हलपमेंट क्रेडीट नोटच्या मोबदल्यामध्ये करण्यात येणार असून सदर डेव्हलपमेंट क्रेडीटनोट ही कामाचे ठेकेदार पुणे मनपास देय असलेल्या बांधकाम परवानगी विषयक शुल्क , कर देयके, पाणीपट्टीची देयके, रस्ता खोदाई शुल्क, आकाशचिन्ह परवाना शुल्क अशा प्रकारे पुणे मनपाच्या कोणत्याही देय चलनाकरिता वापरु शकणार आहेत. सदर डेव्हलपमेंट क्रेडीटनोट ही कामाचे ठेकेदार स्वतः वापरु शकतात अथवा अन्य व्यक्तीस पुणे मनपाचे देयक देण्यासाठी क्रेडीटनोटची विक्री करुन शकतात. या प्रस्तावानुसार पुणे मनपास थेट आर्थिक देयके कामाचे ठेकेदारास न देता त्याऐवजी सदर देयके पुणे मनपाच्या देय शुल्काकरिता समायोजित केली जाणार आहे. सद्यस्थितीत खराडी भागातील आठ रस्ते, बाणेर भागातील तीन रस्ते, कोंढवा व मुंढवा येथील प्रत्येकी एक रस्ता असे एकुण १३ रस्ते आणि मुळा नदीवरील मुंढवा ते खराडी दरम्यानचा पुल व गंगाधाम चौकातील ग्रेड सेप्रेटर व उड्डाणपुल अशी कामे हाती घेण्यात आलेली आहेत. त्याचप्रमाणे बंडगार्डन ते मुंढवा असा ५.५ कि.मी.चा नवीन नदीकाठचा रस्ता, नदीसुधारणा प्रकल्प कामाबरोबरच पीपीपी तत्वावर हाती घेण्यात आलेला आहे. ही सर्व कामे सन २०२२-२३ या आर्थिक वर्षात सुरु होणार आहेत.
- पुणे शहरामधील मुख्य रस्ते (VIP Roads) वर्षभर सुस्थितीत व नागरिकांना वापरण्या योग्य राहणेकरिता विविध प्रकारची देखभाल दुरुस्तीची कामे करणेसाठी सन २०२२-२३ या आर्थिक वर्षामध्ये र.रु. १२ कोटी इतक्या तरतुदीची मागणी करण्यात आलेली आहे. सदर तरतुदीमधून VIP रस्त्यावरील रस्ते दुभाजक दुरुस्ती, व पेटींग, पेडेस्ट्रीयन क्रॉसिंग, थर्मोप्लास्टीक पेंट, साईन बोर्डस्, कर्बस्टोन दुरुस्ती, सुशोभिकरण इ. कामे करणेत येणार आहेत.

## (८) पुणे महानगर परिवहन महामंडळ लि.(र. रू.४३३.१९ कोटी)

### सन २०२१-२२

- सद्यस्थितीत पुणे महानगर परिवहन महामंडळाचा स्वःमालकीचा बस ताफा १२४९ असून दहा वर्षापुढील आयुर्मान असलेल्या १३४ बसेस ताफ्यातून बाद होणार आहेत. स्वःमालकीच्या बसेस १११५ राहणार आहेत.

- सद्यस्थितीत भाडे तत्वावर सीएनजी ८०६ बसेस व ई–बस – १५० अशा एकुण ९५६ बसेस आहेत.
- नवीन ई–बस ३५० व FAME II १५० बसेस अश्या ५०० नवीन ई–बसेस वर्षा अखेरपर्यंत ताफ्यात दाखल होणार आहेत व बस ताफा २५७१ होणार आहे.

**सन २०२१–२२**

| | | |
|---|---|---|
| सन २०२१–२२ अंदाजित एकूण स्व उत्पन्न र.रू. | – | ३३९.१९ कोटी |
| सन २०२१–२२ अंदाजित खर्च र.रू. | – | ९५०.१५ कोटी |
| **अंदाजित संचलन तूट र.रू.** | **–** | **६१०.९६ कोटी** |
| पुणे महानगरपालिकेच्या ६०% स्वामित्वानुसार र.रू. | – | ३६६.५८ कोटी |

**सन २०२२–२३ दृष्टीक्षेपातील अंदाजपत्रक**

- सन २०२२–२३ पुणे महानगर परिवहन महामंडळाचा स्वःमालकीचा बस ताफा १११५ असून दहा वर्षा पुढील आयुर्मान असलेल्या २११ बसेस ताफ्यातुन बाद होणार आहेत व स्वःमालकीच्या ९०४ बसेस राहणार आहेत.
- भाडे तत्वावरील सीएनजी ८०६ बसेस व ई–बस – ६५० अशा एकूण १४५६ बसेस ताफ्यात असणार आहेत. एकुण ताफा २३६० होणार आहे.
- दोन्ही मनपाच्या सबसिडीमधून घेण्यात येणाऱ्या १२ मी. बीआरटी एसी इलेक्ट्रिक ३५० बसेससाठी प्रति बस र.रू.५० लाख प्रमाणे सबसिडी र.रू.१७५ कोटी द्यावी लागणार आहे. पुणे महानगरपालिकेच्या ६०% स्वामित्वानुसार र.रू.१०५ कोटी होत आहेत.
- सन २०२२–२३ च्या पुणे महानगरपालिकेच्या अर्थसंकल्पात र.रू.४३३.१९ कोटीची तरतूद करणेची मागणी करण्यात आली आहे.

**पुणे महानगरपालिकेच्या सन २०२२–२३ च्या अंदाजपत्रकात पुणे महानगर परिवहन महामंडळाकरिता करावयाच्या तरतूद रकमांचा तपशील पुढीलप्रमाणे :**

| अ.क्र. | तपशिल | पुणे मनपाचे सन २०२२–२३ चे अंदाजपत्रकात करावयाची तरतूद र.रू. (कोटीत) |
|---|---|---|
| १. | संचलन तूट (शा.नि.क्र.एनयुआर–२०१३/प्र.क्र.३३८ नवि–३३, मंत्रालय मुंबई–४०० ०३२, दि.१८/०२/२०१४) | ३६६.५८ |
| २. | १) इ. ५ वी ते १०वी विद्यार्थ्यांना मोफत पासेस / बससेवा | ६.५० |
| | २) नागरवस्ती विकास योजना अंध / अपंग पासेस | १०.०० |
| | ३) विविध सवलतीचे पासेस | २०.११ |
| ३. | सातवा वेतन आयोग फरक | ३०.०० |
| | **तरतूद करावयाची एकूण रक्कम रू.** | **४३३.१९** |

## (९) <u>उद्यान (भांडवली तरतूद र. रु.५१.०० कोटी + महसूली तरतूद र.रु. ५८.८५ कोटी = र.रु.१०९.८५ कोटी)</u>

**सन २०२१–२२**

- **पु.ल. देशपांडे उद्यान, पुणे पेठ पर्वती स. न.१२१,१२२ येथे फेज ३ मध्ये कलाग्राम विकसित करणे**

  विविध राज्यामधील कलाकारांना त्यांची कला सादर करणे, माहिती देणे, पाहण्यासाठी उपलब्ध ठेवणे या संकल्पनेवर आधारित निर्मिती करण्यात येत आहे. सन २०२०–२१ या आर्थिक वर्षात प्रवेशद्वाराचे व गाळ्यांचे काम पूर्ण झाले आहे.

- **स्व. राजीव गांधी प्राणिसंग्रहालय, कात्रज मास्टर प्लॅननुसार विकसित करणे**

  राजीव गांधी प्राणीसंग्रहालयचा आगामी २० वर्षाच्या विकासाचा आराखडा केंद्रीय प्राणीसंग्रहालय प्राधिकरण, नवी दिल्ली यांचेकडून मंजूर करण्यात आलेला आहे. प्राणीसंग्रहालय विकास आराखडा कालावधी २०२१–२०३१ असा असून आराखड्याची अंमलबजावणी एकुण चार टप्प्यात करणे बाबत नियोजन आहे. पहिल्या टप्प्यात समाविष्ट एकुण ९ खंदकांपैकी ५ खंदक/पिंजरे यांचे काम पूर्ण झाले आहे. सन २०२१–२२ या आर्थिक वर्षात जंगल कॅट, लेपर्ड कॅट, रस्टी स्पॉटेड कॅट व भारतीय शेकरु या चार प्रजातींच्या प्राण्यांसाठी नव्याने पिंजऱ्यांची उभारणी करणेत आली आहे. प्रकल्पीय कामकाज पूर्ण झालेले असून पर्यटकांना वन्यप्राण्यांच्या तीन प्रजाती नव्याने पाहता येणार आहेत. पुढील चार महिन्यात आशियाई सिंह, तरस चौशिंगा व झेब्रा या प्राण्यांच्या खंदकांची नव्याने उभारणी पूर्ण होऊन पर्यटकांना तीन अधिकच्या प्रजाती नव्याने पाहता येणार आहेत.

**सन २०२२–२३ चे दृष्टीक्षेपातील अंदाजपत्रक**

- **पु.ल. देशपांडे उद्यान, पुणे पेठ पार्वती स. न.१२१,१२२ येथे फेज ३ मध्ये कलाग्राम विकसित करणे.**

  विविध राज्यामधील कलाकारांना त्यांची कला सादर करणे, माहिती देणे, पाहण्यासाठी उपलब्ध ठेवणे या संकल्पनेवर आधारित निर्मिती करण्यात येत आहे. सदरच्या कलाग्राममध्ये स्थानिक तसेच राज्यातील कलाकारांनी तयार केलेल्या साहित्य व कलाकुसरीची माहिती कांउटर्स, माहिती केंद्र, Display Area, तसेच २०० नागरिक बसु शकतील असे अँफिथिएटर तसेच फुड एरिया तयार करण्याचे नियोजन आहे.

- **स्व. राजीव गांधी प्राणिसंग्रहालय, कात्रज मास्टर प्लॅननुसार विकसित करणे**

  सन २०२२–२३ या आर्थिक वर्षात बृहन आराखडा टप्पा क्र व.२ मधील उर्वरित प्रकल्प पुर्ण करावयाचे आहेत. यामध्ये आधुनिक नवीन सर्पालय, जलाशया जवळील विस्तीर्ण प्राणी पिंजरा, लायन टेल्ड मकाक या प्राण्यासाठी नवीन मोटेड खंदक, पिसोटी हरणासाठी नवीन पिंजरा, निसर्ग निर्वाचन केंद्राचे उर्वरित काम हे महत्त्वपुर्ण प्रकल्प पूर्ण करण्याचे नियोजन आहे. या प्रकल्पाच्या निर्मितीद्वारे पर्यटकांना विविध प्रजातींचे सस्तन प्राणी सरपटणारे प्राणी व पक्षी पाहण्यास मिळणार आहेत. यातून पर्यटकांच्या संख्येत वाढ होणार असुन पुणे महानगरपालिकेच्या महसुलात भरघोस वृद्धी होणे अपेक्षित आहे.

## (१०) <u>विद्युत (भांडवली तरतूद र. रु.१६.२१ कोटी + महसूली तरतूद र.रु. २८३.१७ कोटी = र.रु. २९९.३८ कोटी)</u>

**सन २०२१–२२**

- शहरातील प्रकाश व्यवस्थेमध्ये केंद्र शासनाच्या धोरणानुसार एल.ई.डी दिवे बसविणे (EESL) अंतर्गत यापूर्वी सन २०२१ – २२ या कालावधी मध्ये शहरातील जुने नादुरूस्त एल.ई.डी दिवे बदलने व नवीन पोल साठी एल.ई.डी दिवे बसविणे कामा अंतर्गत एकुण ३,७१० एल.ई.डी दिवे EESL चे माध्यमातून बसविण्यात आले आहे.

- मा.शिवसेना प्रमुख बाळासाहेब ठाकरे बालनाटयगृहात येथील नाटयगृहात विविध विद्युत विषयक कामे प्रकाश व्यवस्था, ध्वनीक्षेपण यंत्रणा बसविणे, नाटयगृह परिसरात कामे सुरू करण्यात आली आहेत.

- पुणे मनपाच्या पंडित भिमसेन जोशी कलादालन येथे डिजीटल फोटो गॅलरी तयार करण्यात आली आहे. या कामासाठी र.रू. ३५.३५ लक्ष खर्च करणेत आला असून या विविध आकाराच्या हाय रिझोल्यूशन एल.ई.डी. मॉनिटरवर नामवंत व प्रसिध्द कलाकारांच्या सादरीकरणाचे अत्युत्कृष्ट फोटो प्रसिध्द केले जाणार आहेत व नागरिकांना कलाकारांच्या पोट्रेट दर्जाचे चित्रे पाहवयास मिळतील.

- सहकारनगर येथील कै. वसंतराव बागुल उद्यान येथे वॉटर स्क्रीनवर आधारीत मल्टी मिडीया लेझर शो ची निर्मिती केली आहे. या कामासाठी र.रू. ३४८ लक्ष खर्च आला असून भारत देशातील पाण्याच्या पडदयावर युध्दावर सादर होणारी पहिलीच मल्टी मिडिया लेझर चित्रफित आहे. हा शो नागरिकांसाठी खुला करणेत आला आहे.

- नॅशनल क्लीन एअर प्रोग्राम अंतर्गत र.रू. २०० लक्ष तरतुद उपलब्ध झाल्याने हडपसर, बावधन, वैकुंठ या ठिकाणी हायब्रिड (गॅस व विद्युत दाहिनी) उभारण्यात आल्या आहेत. तसेच महापौर निधी मधून र.रू. २१०.३० लक्ष तरतूद उपलब्ध झाल्याने कैलास स्मशानभूमी, वडगाव धायरी, गंगानगर हडपसर, कात्रज व कर्वेनगर स्मशानभूमी या ठिकाणी एकुण ७ हायब्रिड (गॅस व विद्युत दाहिनी) उभारण्यात आले असून तेथील प्रदुषण कमी करणेस मदत झाली आहे.
- पुणे महानगरपालिकेच्या कै. बाबुराव सणस शाळा येथे नव्याने भारतरत्न डॉ. अटल बिहारी वाजपेयी कॉलेज विकसित करणेत येत आहे. सदर कॉलेजचे ठिकाणी विद्युतविषयक सर्व कामे प्रगती पथावर आहे.
- पुणे महानगरपालिकेच्या विद्युत विभागाकडून खालीलप्रमाणे ऑक्सिजन टँकची उभारणी करणेत आली आहे.
- शिवाजीनगर येथील दळवी हॉस्पिटल मध्ये ऑक्सिजन जनरेटिंग प्लाँटची उभारणी करणेत आली असून त्यासाठी र.रू. २३६.२३ लक्ष खर्च झाला आहे. तसेच याठिकाणी र.रू. ५४ लक्ष खर्च करून लिक्विड ऑक्सिजन टँकची उभारणी केली आहे.
- नायडू हॉस्पिटल येथे र.रू. ४१.७३ लक्ष खर्च करून १३ के.एल क्षमतेचा क्रायोजनिक लिक्विड ऑक्सिजन टँकची उभारणी केली आहे. तसेच तेथे जम्बो सिलेंडर रिफिलिंग स्टेशनची उभारणी करणेत आल्याने पुणे मनपाच्या सर्व दवाखान्यांसाठी ऑक्सिजन सिलेंडर पुरविणे शक्य होत आहे.
- राजीव गांधी हॉस्पिटल कोविड बालरूग्णालय येथे र.रू. ४१.७८ लक्ष खर्च करून १० के.एल. क्षमतेचा क्रायोजनिक लिक्विड ऑक्सिजन टँकची उभारणी केली आहे.
- वडगाव धायरी येथील लायगुडे रूग्णालय येथे र.रू. ५३.८७ लक्ष खर्च करून लिक्विड ऑक्सिजन टँकची उभारणी केली असून डयूरा लिक्विडची व्यवस्था करणे आली आहे.
- वारजे हॉस्पिटल येथे र.रू. ५९ लक्ष खर्च करून लिक्विड ऑक्सिजन टँक व ऑक्सिजन पाईपिंगची उभारणी केली आहे.
- आण्णासाहेब मगर हॉस्पिटल येथे र.रू.४३.०७ लक्ष खर्च करून १३ टन क्षमतेचा लिक्विड ऑक्सिजन प्लँटची उभारणी केली आहे.

## सन २०२२–२३ चे दृष्टीक्षेपातील अंदाजपत्रक

- शहरातील प्रकाश व्यवस्थेमध्ये केंद्र शासनाच्या धोरणानुसार एल.ई.डी दिवे बसविणे (EESL) अंतर्गत सन २०२२–२३ मध्ये अंदाजे र.रू. ७.५० कोटी तरतूदी मधून ४७ हजार नग एल.ई.डी दिवे बसविणेत येणार आहेत.
- पुणे शहरातील पथ दिवे सक्षम व अद्ययावत करणेसाठी भरीव तरतूद करणेत आली आहे.
- नव्याने समाविष्ट गावांमधील प्रकाश व्यवस्था सक्षम करण्यासाठी पोल व एलईडी दिवे बसविण्याची आवश्यकता असून त्यासाठी र.रू. २७३ लक्ष तरतूद करण्यात आली आहे.
- शहरातील महत्वाच्या रस्त्यांवरील प्रकाश व्यवस्थेत सुधारणा करणे कामी भरीव लक्ष तरतूद करणेत आली आहे.
- पुणे शहरातील विविध स्मशानभूमी, मनपा शाळा, दवाखाने, इत्यादी ठिकाणी विद्युत विषयक कामे पूर्ण करणेसाठी र.रू. ७५ लक्ष तरतूद करणेत आली आहे.
- पुणे महानगरपालिकेच्या पाणीपुरवठा वीज वापरापोटी वीज बिलामध्ये बचत करणेच्या दुष्टीने EESL च्या उपकंपनी असलेल्या CESL बरोबर SPV स्थापन करून त्यांच्याशी (PPA) वीज खरेदीसाठी करारनामा करून ओपन ॲक्सेस द्वारे वीज खरेदी र.रू. ३.४० प्रतीयुनिट या दराने २० वर्षाच्या कालावधीसाठी करण्यात येणार आहे.
- नदीवरील पुलावर सोलर युनिट बसवून वीज निर्मिती करण्याचे प्रकल्प हाती घेण्यात आले आहे.
- कोवीड–१९ च्या अनुषंगाने पुणे महानगरपालिकेच्या हॉस्पिटलमध्ये आवश्यकतेनुसार लिक्विड ऑक्सिजन टँकची उभारणी करणेत येणार आहे.

## (११) अमृत अभियान व स्मार्ट सिटी, जनेराशपुअ वाढीव कालावधी अंतर्गत प्रकल्प

### सन २०२१-२२

- अमृत अभियान व स्मार्ट सिटी, ज.ने.रा.श.पु.अ.वाढीव कालावधी अंतर्गत प्रकल्प, बीएसयूपी या योजने अंतर्गत करावयाच्या कामांसाठी सन २०२१-२२ साठी आवश्यक तरतुद र.रु.९२.३९ कोटी मंजूर आहे.
- ज.ने.रा.श.पु.अ.वाढीव कालावधीमध्ये मंजुर झालेले तसेच अमृत अभियानांमध्ये समावेश झालेल्या भामा आसखेड पाणी पुरवठा योजनेसाठीची तरतुद र.रु.३७.१०कोटी व वडगाव बुद्रुक प्रकल्पासाठी र.रु.१.४० कोटी इतकी तरतुद करण्यात आली आहे. याव्यतिरिक्त बीएसयुपी योजने अंतर्गत र.रु १.०५कोटी तरतूद केली आहे.
- अमृत अभियान अंतर्गत सुरु असलेल्या हरित क्षेत्र विकास प्रक्ल्पांसाठी र.रु.१.५८ कोटी तरतूद करण्यात आली आहे व पुणे शहरात तंत्रशुध्द पध्दतीने पाणीपुरवठा करण्याची योजना (२४ X ७) अंतर्गत विविध ठिकाणी पाण्याच्या टाक्या बांधणे पाणी पुरवठा विभागाच्या अंदाजपत्रक 'क' मध्ये र.रु. ८० कोटी तरतुद करण्यात आली आहे.
- स्मार्ट सिटी अभियान अंतर्गत सुरु असलेल्या प्रकल्पांसाठी र.रु.५० कोटी मनपा सम हिश्याची तरतुद अनुदान म्हणून करण्यात आली आहे.

### सन २०२१-२२ मधील महत्वाच्या पूर्णत्वास/सुरु असलेल्या नाविण्यपूर्ण योजना/प्रकल्प

- ज.ने.रा.श.पु.अ.अंतर्गत वाढीव कालावधी अंतर्गत प्रकल्पातील भामा आसखेड या प्रकल्पाचे चारही हप्ते प्राप्त झालेले असून प्रकल्प पूर्ण झालेला आहे.
- अमृत अभियानांतर्गत हरित क्षेत्र विकास यासाठी आत्तापर्यंत र.रु.२.४२ कोटी इतका खर्च झाला असून, प्रकल्प पूर्ण झालेला आहे.
- पुणे महानगरपालिका आणि पुणे सिटी कनेक्ट यांच्या संयुक्त विद्यमाने,'लाईटहाऊस - कौशल्यविकास आणि रोजगार केंद्र' हा प्रकल्प राबविण्यात येत आहे. एकुण १५ लाईट हाऊस उभारण्याचा मानस आहे. त्यातील एकुण ११ लाईट हाऊस यशस्वीरीत्या सुरु झाले आहेत. त्यातील ४ लाईटहाऊस सन २०२१-२२ या आर्थिक वर्षामध्ये सुरू करण्यात आलेले आहेत. सध्या एकुण केंद्रांमध्ये एकत्रितपणे १७,००० पेक्षा अधिक युवा वर्ग सहभागी झालेला आहे. त्यातील ७००० विद्यार्थ्यांना विविध ठिकाणी रोजगार उपलब्ध करून देण्यात आला आहे.

### सन २०२२-२३ चे दृष्टीक्षेपातील अंदाजपत्रक

- अमृत अभियान व स्मार्ट सिटी,ज.ने.रा.श.पु.अ.वाढीव कालावधीमधील प्रकल्प, बीएसयुपी या योजने अंतर्गत करावयाच्या कामांसाठी सन २०२२-२३ साठी एकुण आवश्यक तरतूद र.रु.१०९.५५ कोटी प्रस्तावित आहे. या व्यतिरिक्त पाणीपुरवठा योजना (२४X७) अंतर्गत विविध ठिकाणी पाण्याच्या टाक्या बांधणेसाठी पाणीपुरवठा विभागाच्या अंदाजपत्रक 'क' अंतर्गत र.रु. ६० कोटी इतकी तरतुद विभागाद्वारे सूचविण्यात आली आहे.
- उपरोक्त नमूद मुद्यामध्ये स्मार्ट सिटी अभियान अंतर्गत मनपाचा हिस्सा र.रु.७५ कोटी इतकी तरतूद अनुदान म्हणून प्रस्तावित आहे.
- अमृत अभियान अंतर्गत प्रकल्पासाठी केंद्र शासन व राज्य शासनाचा अपेक्षित प्राप्त होणारा निधी र.रु.४.३० कोटी.
- केंद्र शासन मार्फत अमृत प्रकल्पांसाठी नव्याने सुरू होणाऱ्या योजनांसाठी र.रू. १० कोटी इतकी तरतूद (केंद्र शासन व राज्य शासन अनुदानासहित) सूचविण्यात आली आहे.

**सन २०२२-२३ मध्ये करावयाचे प्रस्तावित महत्वाचे प्रकल्प/योजना-**

- पुणे शहरात (२४ X ७) पाणीपुरवठा योजने अंतर्गत विविध ठिकाणी पाण्याच्या टाक्या बांधणे (प्रकल्पीय सुधारित र.रु.२३५.९४ कोटी) प्रकल्पा अंतर्गत या प्रकल्पाची भौतीक प्रगती ६२.१०% व वित्तीय प्रगती ६६.३७% आहे.
- सदर प्रकल्पामध्ये ८२ टाक्यांचे बांधकाम नियोजित होते. तथापि, जागेच्या अडचणीमुळे व हायड्रोलिक डिझाईनमध्ये काही ठिकाणी एक टाकी दोन ते तीन विभागामध्ये बांधण्यात येणार आहे. त्यामुळे टाक्यांची एकूण संख्या ८२ वरुन ८६ झाल्याने प्रकल्पीय खर्चात वाढ होणार नसून एकूण ८६ पाण्याच्या टाक्या बांधण्याचे नियोजन आहे. त्यातील ७३ पाण्याच्या टाक्यासाठी जागा उपलब्ध झालेली असून, त्यातील ३८ टाक्यांचे काम पूर्ण झालेले आहेत.
- सन २०२२-२३ या आर्थिक वर्षात अजून ३ लाईट हाऊस नव्याने सुरु करण्याचे नियोजन आहे.

**सन २०२१-२२ मध्ये मनपास मिळालेले ॲवार्डस /बक्षीस/ट्रॉफीज यांची माहिती**

- ''स्वच्छ सर्वेक्षण - २०२१'' च्या राष्ट्रीय क्रमवारीत पुणे शहराला ५ वा क्रमांक प्राप्त झाला आहे.
- भारत सरकारच्या गृहनिर्माण आणि शहरी व्यवहार मंत्रालय यांचे "इज ऑफ लिव्हिंग इंडेक्स २०२०" मध्ये पुण्याला दुसरा क्रमांक प्राप्त झालेला आहे. तसेच Municipal Performance Index २०२० साठी भारतामध्ये पाचवा क्रमांक प्राप्त झाला.

## (१२) भवन रचना(भांडवली तरतूद र. रु.३०४.९० कोटी + महसूली तरतूद र.रु. ३९.८५ कोटी = र.रु. ३४४.७५ कोटी)

**सन २०२१-२२ मधील महत्वाच्या पूर्णत्वास/ सुरु असलेले प्रकल्प -**

- कोथरुड येथे नवीन बालनाट्यगृह उभारणे/यशवंतराव चव्हाण नाट्यगृहाचे विस्तारीकरण करणेचे कामे पुर्ण करणेत येत आहेत. (पोडीयम पार्किंगसहीत)
- भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी वैद्यकिय महाविद्यालय उभारणेचे अनुषंगाने सणस शाळा - मंगळवार पेठ, सणस हॉस्टेल - सारसबाग व कमला नेहरू हॉस्पिटल मंगळवार पेठ येथे स्थापत्य विषयक कामे करणेत येत आहेत.
- कर्वेनगर येथील सम्राट अशोक शाळा येथे नवीन इमारतीचे काम पूर्ण करणेत येत आहे.
- वारजे येथे मॅटर्निटी होम हॉस्पिटल बांधणेत येत आहे.
- बिबवेवाडी, अप्पर राजीव गांधी नगर येथे अद्ययावत प्रसुतिगृह व आरोग्य केंद्र उभारणेचे काम पूर्णत्वास येत आहे.
- बाणेर स.नं.८८ येथे आदिवासी/मागासवर्गीय विद्यार्थीनी, महिलाकरीता निवासी प्रशिक्षण केंद्राचे भाग १ चे पार्किंग + पहिल्या मजल्याचे काम पूर्ण करणेत आलेले आहे.
- कोथरुड येथे शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे कलामंदिराचे फेज -१ चे काम पुर्णत्वास असुन सन २२-२३ मध्ये फेज - २ चे काम सुरू करणेत येणार आहे.
- हडपसर येथे राजर्षी शाहु संकुलामधील कै.विठ्ठलराव तुपे नाट्यगृहाचे काम अंतिम टप्प्यात आहे.
- नगर रोड येथील क्षेत्रिय कार्यालयाची इमारतीचे बेसमेंट + २ मजल्याचे इमारतीचे काम मार्च-२०२२ अखेर १००% पूर्ण करणेत येणार आहे.
- डॉ.बाबासाहेब आंबेडकर प्राथमिक विद्यालय लक्ष्मीनगर येथील नवीन इमारतीचे काम पूर्णत्वास येत आहे.
- बाणेर स.नं. ११४+११५ येथे नोकरी करणाऱ्या महिलांसाठी हॉस्टेल बांधुन पूर्ण होणार आहे.

- वडगांव बु. स.नं. ५५/१ पार्ट येथे शाळेची इमारत बांधण्यात आलेली आहे.
- प्रभाग क्र.१, (कळस धानोरी) मधील स.नं.१९/४ येथील ॲमिनिटी स्पेसवर राजयोग मेडिटेशन ध्यान योग केंद्र विकसित करणेचे काम पूर्णत्वास आले आहे.
- प्रभाग क्र.१, (कळस धानोरी ) मधील स.नं.१९/४ येथील अमेनिटी स्पेसवर अग्निशामक केंद्र उभारण्याचे काम पुर्णत्वास आले आहे.
- प्रभाग क्र.१, (कळस धानोरी) मधील मुंजाबावस्ती येथील सुरूअसलेल्या ई- लर्निंग स्कूलचे काम पूर्ण करण्यात आले आहे.
- कोंढवा खुर्द स.नं.१, येथील कै.राजेंद्र लोणकर ई-लर्निंग शाळेचे पूर्ण झालेले आहे.
- महमदवाडी कौसरबाग येथील उर्वरित भाजी मंडईचे काम पूर्णत्वास येत आहे.
- धानोरी येथील लाईट हाऊस इमारतीचे पहिल्या व दुसऱ्या मजल्यावर MPSC & UPSC च्या अनुषंगाने स्पर्धा परिक्षा केंद्राच्या इमारतीचे काम सुरू आहे.
- बालेवाडी स.नं २४ आर. के. लक्ष्मण स्मारक/ कलादालन प्रकल्प पूर्णत्वास येत आहे.
- स.नं. ५५ हडपसर येथे फुटबॉल ग्राऊंड विकसित करण्याचे काम अंतिम टप्प्यात आहे.
- स.नं.६० महमदवाडी येथे अग्निशमन केंद्र उभारण्याचे काम पूर्णत्वास आले आहे.
- पुणे शहरात विविध ठिकाणी भोलागीर शाळा जनता वसाहत , कोथरूड, सोमवार पेठ, बिबवेवाडी अप्पर या ठिकाणी लाईट हाऊस प्रकल्प कार्यान्वित करण्यात येत आहेत.
- डॉ. होमी भाभा दवाखाना, शिवाजीनगर येथील नवीन इमारतीचे बांधकाम पूर्ण करण्यात येणार आहे.
- धनकवडी स.नं. ३५ येथील बॅटमिंटन हॉल व क्रिडांगणाचे काम पूर्ण करण्यात येणार आहे.

**सन २०२२-२३ चे दृष्टीक्षेपातील अंदाजपत्रक**

- कोथरुड येथे नवीन बालनाट्यगृह उभारणे/यशवंतराव चव्हाण नाट्यगृहाचे विस्तारीकरण करणेचे कामे पूर्ण करणेत येणार आहे. (पोडीयम पार्किंग)
- भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी वैद्यकिय महाविद्यालय, हॉस्टेल व हॉस्पिटलसाठी नवीन इमारत नायडु हॉस्पिटलच्या आवारात बांधणेत येणार आहे.
- वारजे येथे मॅटर्निटी होम हॉस्पिटल बांधणेत येणार आहे.
- बिबवेवाडी म्युनिसिपल पर्पजसाठी आरक्षित जागेवर अद्यावत प्रसुतिगृह व आरोग्य केंद्र उभारणे
- कळस धानोरी येथील स.नं.३८/१ येथे आदिवासी विद्यार्थ्यांसाठी निवासी शिक्षण केंद्र उभारणेचे काम करणेत येणार आहे.
- बाणेर स.नं. ८८ येथे आदिवासी /मागासवर्गीय विद्यार्थीनी, महिलांकरीता निवासी प्रशिक्षण केंद्र भाग - २ चे काम करण्यात येणार आहे.
- शहराच्या विविध भागामध्ये सुरू असलेल्या प्लेस मेकिंगच्या १५ जागांची कामे पूर्ण करण्यात येणार आहे.

**सन २०२२-२३ मधील प्रस्तावित महत्वाचे प्रकल्प/योजना**

- कोथरूड येथे शिवसृष्टी उभारणेत येणार आहे.
- घोले रोड येथे नगर वाचनालय (सिटी लायब्ररी) बांधण्याचे नियोजन आहे.
- कोथरूड येथे एक्झिबिशन सेंटरची उभारणी करणे व त्या अंतर्गत ग.दि.माडगुळकर यांचे स्मारक, प्रायोगिक रंगभूमी यांचे काम करण्यात येणार आहे.
- बालगंधर्व रंगमंदिर पुनर्निर्माण करणेत येणार आहे.

- पुणे मनपाच्या कर्मचाऱ्यांचे राहणीमान सुधारणेचे अनुषंगाने पुणे महानगरपालिकेच्या धोकादायक वसाहतींचे पुनर्निर्माण करणेचे अभियान हाती घेणेत आले आहे.
- अण्णासाहेब मगर दवाखान्यासाठी जुनी इमारत पाडुन नवीन अद्यावत हॉस्पीटल इमारत बांधणेचे काम करणेत येणार आहे.
- बालेवाडी येथे कला अकादमी इमारतीचे बांधकाम करण्यात येणार आहे.
- पुणे शहरातील मुलींची पहिली शाळा (भिडेवाडा) शिवाजी रोड इमारतीचे पुनर्निर्माण करण्यात येणार आहे.
- संगमवाडी येथे क्रांतीवीर लहुजी वस्ताद यांचे स्मारकाचे काम शासनाचे मदतीने करण्यात येणार आहे.

## (१३) माहिती व तंत्रज्ञान (भांडवली ४७.२० कोटी + महसूली र. रू.३९.६२ कोटी = र.रु. ८६.८२ कोटी)

**सन २०२१–२२**

**पुणे महानगरपालिकेच्या माहिती व तंत्रज्ञान विभागाने सन २०२१–२२ या वर्षातील कामांची फलनिष्पत्ती –**

- **कोविड–१९ः–**
- माहिती व तंत्रज्ञान विभागामार्फत कोविड – १९ बाबत प्रभावी उपाययोजना करण्यात आल्या. कोरोनाबाबतचे कामकाजाकरीता सर्व क्षेत्रीय कार्यालय,मनपा मुख्य भवन, आपत्ती व्यवस्थापन विभागांमध्ये वॉर रुम तयार करुन त्याद्वारे Contact Tracing रूग्णांचे समन्वय, रूग्णांबाबत माहिती, बेड मॅनेजमेंटबाबत विविध कॉल सेंटर्स कार्यान्वीत करण्यात आले. तसेच आरोग्यधीर मोबाईल ॲपद्वारे टेलीमेडीसीन यंत्रणा कार्यान्वीत करण्यात आली. विविध कोविड केअर सेंटर, स्वॅब सेंटर, रुग्णालय या ठिकाणी संगणक संच, प्रिंटर व इंटरनेटची सुविधा उपलब्ध करुन देण्यात आली.
- **ऑनलाईन संगणक प्रणाली अंमलबजावणी** :– पुणे मनपा मार्फत ई –गर्व्हेनन्स नागरीकाना विविध ऑनलाईन स्वरुपात सेवा सुविधा उपलब्ध करुन, देण्यात आलेल्या आहेत. ऑनलाईन मिळकत कराची संगणक प्रणाली भरणा, मिळकत कर ना–हरकत, पाणीपट्टी भरणा, तक्रार संगणक प्रणाली, बांधकाम परवानगी, टी.डी.आर परवाने, वृक्ष कापणी परवानगी व ई– तिकीटींग संगणक प्रणाली इ. सेवा उपलब्ध करुन देण्यात आलेले आहे. पुणे मनपाचे अधिकारी/कर्मचारी व सेवा निवृत्त सेवकांना ७ वा वेतन आयोगानुसार वेतन पेन्शन प्रणाली अद्यावत करण्यात आली आहे. मालमत्ता व व्यवस्थापन विभागाकडील मिळकतीच्या नोंदी एकत्रित स्वरुपात जतन करणे याबाबत अद्यावत संगणक प्रणाली विकसीत करण्यात आली आहे.
- **Enterprise GIS** : – पुणे महानगरपालिकेमार्फत Enterprise GIS संगणक प्रणाली विकसीत करण्यात आली आहे. विविध खात्याकडील उपलब्ध माहिती व नकाशे गोळा करुन त्या माहितीचे एकत्रीकरण करून एकाच वैधानीक नकाशावर (Basemap) तयार करण्यात आले आहे. पुणे महानगरपालिकेच्या विकास कामांमध्ये प्रशासकीय दृष्ट्या निर्णय घेणे, पारदर्शकता असणेच्या उद्देशाने विकास कामाच्या नोंदी करणेसाठी Tender Utility जी.आय.एस प्रणालीच्या माध्यमातून विकसित करण्यात आली आहे.
- **सेवाशुल्क वसुली संगणकीकरण :–** सर्व क्षेत्रिय कार्यालयातील झोनिपु विभागाकडील नागरी सुविधा केन्द्रातून सेवाशुल्क व पाणीपट्टी बिले संगणकीकृत करणेकरीता संगणक प्रणाली विकसित करण्यात आली आहे.
- **मालमत्ता व व्यवस्थापन संगणक प्रणाली :–** मालमत्ता व व्यवस्थापन विभागाकडील पुणे महानगरपालिकेच्या मालकीच्या मिळकतीच्या नोंदी एकत्रीत स्वरुपात जतन करणे तसेच या माहितीच्या आधारे मिळकतीचे व्यवस्थापन करणेकामी अद्ययावत संगणक प्रणाली विकसीत करण्यात आली आहे.
- **पी.एम.सी.केअर / सोशल मिडीया /WebSite:-**
- पुणे महानगरपालिकेमार्फत नागरिकांच्या सुविधेसाठी PMC CARE हा प्रकल्प राबविण्यात येत आहे. यामध्ये नागरिकांशी व मनपा सेवकांशी संबंधित सर्व विभागांसाठी तक्रार व्यवस्थापन प्रणाली अद्ययावत करण्यात

आली.  मनपाचे विविध सोशल मिडीया हॅन्डल्सद्वारे वेळोवेळी प्रसिध्द केली जाते. यावर्षी नागरिकांमध्ये कोरोनाबाबत जन–जागृती करण्यासाठी व कोरानाबाबत काळजी घेण्यासाठी विविध उपाययोजना व आवश्यक त्या सूचना देण्यासाठी सोशल मिडीयाचा वापर मोठयाप्रमाणात झाला आहे.  फेसबुक, ट्विटर, व इन्स्टाग्रामवर या माध्यमांचा वापर केला जातो.  त्याला मोठया प्रमाणात प्रतिसाद मिळतो. माहिती व तंत्रज्ञान विभागाने सर्व विभागांची माहिती नागरिकांना उपलब्ध करून देण्यासाठी Content Management System CMS तंत्रज्ञानावर आधारित संकेतस्थळ विकसीत करण्यात आले आहे.

- **महाटेंडर संगणक प्रणाली अंमलबजावणी** :–  सर्व शासकीय संस्थामार्फत राबविल्या जाणाऱ्या ऑनलाईन निविदेचे व्यवस्थापन पारदर्शक प्रभावीपणे व Centralized पध्दतीने होणे करीता मे. महाराष्ट्र शासनाने महाटेंडर ऑनलाईन ई–निविदा संगणक प्रणाली विकसीत केली आहे.  म.न.पा. तील सर्व विभागांमध्ये विविध प्रक्रिया अंमलबजावणी ही महाटेंडरच्या संगणक प्रणालीद्वारे यशस्वीरित्या करण्यात आली.

- **Direct Benefit Transfer (DBT)** : - थेट लाभ हस्तांतर (DBT) या योजने अंतर्गत विविध कल्याणकारी योजनांमध्ये मिळणा–या लाभाचे हस्तांतर रोख स्वरुपात लाभार्थींच्या बँक खात्यात जमा करण्यात येते.  या करिता पुणे म.न.पा. मार्फत ऑनलाईन संगणक प्रणाली विकसीत करण्यात आलेली आहे. सदर संगणक प्रणाली द्वारे १० वी व १२ वी ची स्कॉलरशिप, समाजविकास विभागाकडील सर्व योजना ऑनलाईन सुविधा निर्माण करण्यात आल्या आहेत. ऑनलाईन पध्दतीने व यशस्वीरीत्या अंमलबजावणी करण्यात आली आहे.

- **हॉकर्स संगणक प्रणाली** :– पथ  विक्रेता (उपजीविका संरक्षण व पथ विक्री विनिमय ) अधिनियम २०१४ चे नुसार करण्यात आलेल्या सुचना अंमलात आणण्यासाठी अतिक्रमण खातेप्रमुख Hawkers Management System ही संगणकीय प्रणाली विकसीत करण्यात आली आहे.  पथविक्रेत्याचे सर्वेक्षण करुन त्यांना प्रमाणपत्र व ओळखपत्र  देण्याचे कामकाज करण्यात येते. त्यानुसार हॉकर्स संगणक प्रणालीमध्ये अपग्रेडेशन देखभाल दुरुस्तीचे कामकाज करण्यात येत आहे.

- **Artificial Intelligence**:-   पुणे मनपाच्या कर आकारणी व कर संकलन विभागामध्ये अत्याधुनिक माहिती तंत्रज्ञानाचा Artificial Intelligence व Data Analytics चा प्रभावी वापर करुन कर महसुलामध्ये वाढ होणेकरीता सदर प्रकल्प प्रस्तावीत आहे. कर आकारणी व कर संकलन विभागाकडील नगररोड व सिंहगड रोड क्षेत्रिय कार्यालयाकडे अनुक्रमे १२७ व ९७ नव्या मिळकतीची माहिती Artificial Intelligence या माध्यमाद्वारे प्राप्त करण्यात आले या नवीन मिळकतीद्वारे पुणे महानगरपालिकेस र.रु ६.१ कोटी रुपयाचे महसुल प्राप्त झाला आहे.

- **Call Center** :-  पुणेकर नागरिकांना विविध विभांगाची माहिती होण्याकरिता, तक्रारी नोंदविण्याकरिता व पुणे महानगरपालिकेकडील सेवा सुविधा कॉल सेंटरद्वारे देण्यात येते. सदर कॉल सेंटरकरिता टोल फ्री क्रमांक १८००१०३०२२२ उपलब्ध करून देण्यात आला आहे. नागरिकांकडून पुणे मनपातील अभय योजना, पाणी संदर्भातील तक्रारी, कर आकारणी व कर संकलन विभागाकडील कर आकारणी, थकबाकी इ. संदर्भातील नागरीकांशी संवाद साधून पुणे मनपाच्या महसूलात वाढ करणेस मदत झाली आहे. तसेच पुणे मनपाने उपलब्ध करून दिलेल्या सेवांबाबत नागरीकांचा सकारात्मक अभिप्राय मिळत आहे.

## सन २०२२–२३

पुणे महानगरपालिकेच्या माहिती व तंत्रज्ञान विभागाने सन २०२२–२३ या वर्षातील प्रस्तावित कामे खालीलप्रमाणेः–

- **Integrated Command & Control Center (ICCC)** :-  सद्यस्थितीतील कार्यान्वित असलेल्या आपत्ती व्यवस्थापन विभागाकडील War Room चे अद्ययावतीकरण मनपाच्या मुख्य इमारतीमध्ये करणे प्रस्तावित आहे. सदरच्या Command & Control Center मध्ये स्मार्ट सिटी, पोलीस, अग्निशमन विभाग, पी.एम.पी. एम.एल व पुणे मनपामधील कार्यान्वित सर्व संगणक प्रणालीचे इनटिग्रेशन हे सेंट्रलाइज पध्दतीने करण्यात येणार आहे. Command & Control Center (CCC) द्वारे तक्रार निवारण, आपत्ती व्यवस्थापन सिसिटीव्ही, वाहतूक नियोजन व्हेइकल ट्रेकिंग सिस्टिम इ.बाबींचे नियोजन व व्यवस्थापन करण्यात येणार आहे. त्यामुळे

प्रशासकीय निर्णय घेणे सहज शक्य होणार आहे. सदर प्रकल्प अंमलबजावणी आपत्ती व व्यवस्थापन विभागामार्फत करण्यात येणार आहे.

- **शहरी गरिब योजना संगणकप्रणाली**ः–
- पुणे महानगरपालिका कार्यक्षेत्रातील झोपडपट्टयांमध्ये राहत असलेल्या, दारिद्र्य रेषेखालील पिवळे रेशनकार्ड व कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न र.रू.एक लाखपर्यंत असणाऱ्या गरिब कुटुंबियांना शहरी गरीब वैद्यकिय सहाय्यक योजने अंतर्गत लाभ देण्यात येतो. तद्नुषंगाने सदर योजनेची सेवा नागरिकांना ऑनलाईन संगणक प्रणालीद्वारे देण्यात येणार असून सदर योजनेचे कामकाज जलदगतीने होण्यास मदत होणार आहे.
- **Property Tax Software अद्ययावतीकरण** ः–
- पुणे महानगरपालिकेचा कर आकारणी व कर संकलन विभाग उत्पन्नाचे मुख्य स्त्रोत असून संगणक प्रणालीत अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून अद्यावतीकरण करणे प्रस्तावीत आहे.
- **नगरसचिव विभाग दस्तऐवज स्कॅनिंग**ः–
- पुणे महानगरपालिकेच्या नगरसचिव विभागाकडील सन १९५० पासूनचे सर्व जुने व महत्वाचे दस्त, नस्ती, नोंदी, अभिलेख, विविध समिती निर्णय इत्यादी महत्वाचे रेकॉर्ड स्कॅनिंग करून डिजीटल स्वरूपात जतन करणे व भविष्यातील गरजेप्रमाणे त्याचा वापर करणे प्रस्तावित आहे. याबाबतच्या निविदा प्रक्रिया सुरू करण्यात आलेली आहे.
- **Backup Solution**ः-
- पुणे महानगरपालिकेतील विविध विभागांमार्फत नागरिकाभिमुख सेवासुविधा उपलब्ध करून देणेकरीता विविध ऑनलाईन संगणक प्रणाली विकसीत करणेत आलेल्या आहेत. सदर संगणक प्रणालींची संगणकीय माहिती सुरक्षेच्या दृष्टीकोनातून जतन करणे गरजेचे व अत्यावश्यक असल्याने सद्यस्थितीत अस्तित्वात असलेला सर्व संगणक प्रणालींच्या डाटाचा बॅकअप घेण्याचे कामकाज सुरू असून Backup Solution कार्यरत ठेवणे प्रस्तावित आहे.
- **राजीव गांधी प्राणीसंग्रहालयाकरीता नवीन वेबसाईट व बुकिंग सेवा संगणक प्रणाली**ः–
- राजीव गांधी प्राणी संग्रहालय व वन्यजीव संशोधन केंद्र हे भारतातील अग्रगण्य प्राणी संग्रहालय असून ६१ वन्यजीव प्रजातीतील ४२५ प्राणी आहेत. प्राणी संग्रहालयात दरवर्षी सुमारे १६ ते १८ लाख पर्यटक भेट देतात. प्राणी संग्रहालयाची स्वतंत्र अशी वेबसाईट असावी ज्याद्वारे पर्यटकांना प्राणी संग्रहालयाविषयी इत्यंभूत माहिती अद्ययावत करून प्रसिध्द करणे करीता तसेच तिकीट संग्रहालय तिकीट विक्रीसाठी पर्यटकांना सोयीस्कर अशी ऑनलाईन संगणक प्रणाली विकसीत करण्यात येणार आहे.

## (१४) हेरिटेज सेल

### सन २०२१–२२

### सन २०२१–२२ महत्वाची कामे (महसूली तरतूद र.रू.८.५० कोटी, भांडवली तरतूद र.रू.५.१७ कोटी )

- ऐतिहासिक महात्मा फुले मंडई येथे जतन संवर्धन विषयक कामे सुरू आहेत.
- नानावाडा फेज २ चे जतन संवर्धनाचे काम सुरू आहे.
- कोंढवा येथील हेरिटेज पार्कचे काम प्रगतीपथावर आहे.
- पुणे शहरातील पर्यटनवाढीच्या दृष्टीने ऐतिहासिक वारसा स्थळांची माहिती छापील स्वरूपात प्रसिध्द करण्यात आली आहे.

**सन २०२२-२३ चे दृष्टीक्षेपातील अंदाजपत्रकातील संक्षिप्त माहिती (भांडवली तरतूद र.रू. ७.२५कोटी) -**

- पुणे शहराचे ऐतिहासिक महत्व असलेल्या लालमहाल, शनिवारवाडा, नानावाडा, विश्रामबागवाडा, भिडे वाडा, महात्मा फुले मंडई इ. वास्तुंच्या जतन संवर्धनासाठी अंदाजपत्रकात तरतूद केली आहे.
- पर्वती पायथा येथे चित्रकला, शिल्पकला सराव व प्रात्यक्षिकांसाठी बैठक व्यवस्था करणे या कामासाठी अंदाजपत्रकात तरतूद केली आहे.
- पुणे शहराचे महत्व व माहिती पर्यटकांकडे येणेसाठी हेरिटेज वॉक टूर प्रकल्प राबवणेसाठी अंदाजपत्रकात तरतूद केली आहे.

**सन २०२२-२३ मध्ये करावयाचे प्रस्तावित महत्वाचे प्रकल्प/योजना**

- नानावाडा येथे आद्य सशस्त्र क्रांतीकारक यांचे जीवनचरित्रावर आधारित म्युझियमच्या फेज-२ चे कामासाठी तरतूद केली आहे.
- मराठा शैलीमधील ऐतिहासिक लालमहालचे काम पूर्ण करण्यासाठी तरतूद केली आहे.
- ऐतिहासिक भिडेवाडा जतन संवर्धनासाठी तरतूद करण्यात आली आहे.
- पर्यटनवाढीसाठी विविध ब्रॉशर्स, पोस्टर्स, माहिती पुस्तिका तसेच ऐतिहासिक वास्तूमध्ये माहिती फलक, साईनेजेस यासाठी तरतूद करणेत आली आहे.
- ऐतिहासिक वारसा स्थळांमध्ये अग्निशमन यंत्रणा बसविणेसाठी तरतूद केली आहे.

## (१५) <u>शिक्षणासाठी आधुनिक सुविधा (प्राथमिक र. रू. ४९५.८८ कोटी, माध्यमिक शिक्षण र. रू. ७५.८१ कोटी)</u>

**सन २०२१-२२**

- सन २०२१-२२ या शैक्षणिक वर्षामध्ये कोव्हीड- १९ महामारीमुळे शाळा बंद, पण शिक्षण सुरु या धर्तीवर शिक्षण विभागाकडून महापालिकेच्या शाळांमधील विद्यार्थ्यांसाठी ऑनलाईन शिक्षण सुरु ठेवले होते. पुणे मनपाच्या महात्वाकाक्षी प्रकल्प 'ई लर्निंग' द्वारे शिक्षकांना मध्यवर्ती स्टुडीओ मधून विविध प्रशिक्षण देण्यात आले, सहयोगी शिक्षकांमार्फत शिक्षकांच्या अध्यापनात मार्गदर्शन होणेसाठी उपचारात्मक अध्यापन करणे, विविध प्रकारची स्वाध्याय पुस्तिका तयार करणे, इ. बाबी करण्यात आल्या. समग्र शिक्षा अभियांतर्गत विद्यार्थ्यांना मोफत पाठयपुस्तके पालकांमार्फत वितरीत करण्यात आली.
- शिक्षक प्रबोधिनी अंतर्गत शिक्षक प्रशिक्षणासाठी 'प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र' या अर्थशिर्षकांतर्गत विभागीय पातळीवर प्रशिक्षण केंद्र स्थापन करणेसाठी नियोजन करण्यात आले आहे.
- सन २०२१-२२ या शैक्षणिक वर्षामध्ये शिक्षण विभाग प्राथमिक पुणे मनपाच्या आरोग्य विभागास र.रु ५.४० कोटी इतकी तरतूद मान्य करण्यात आलेली होती. प्राथमिक शिक्षण विभागातील कर्मचाऱ्याची वैद्यकीय बिले पूर्णपणे खर्च झालेली आहे. तसेच वर्गीकरणाद्वारे र.रु. २ कोटी उपलब्ध करून उर्वरित बिले खर्ची टाकण्याची कार्यवाही सुरु आहे.
- शिष्यवृत्ती परीक्षेसाठी एकूण ३६४९ विद्यार्थी परीक्षेस बसले होते. त्यातील ५६ विद्यार्थी गुणवत्तायादीत आले आहेत. या विद्यार्थ्यांना मोफत मार्गदर्शक पुस्तके पुरविण्यात आली.

**सन २०२२-२३ चे दृष्टीक्षेपातील अंदाजपत्रक**

- शालेय स्वच्छता - एकूण १४३ शालेय इमारतीतील स्वच्छतागृहाचे यांत्रिकीकरणाने सफाई करणेसाठी तरतूद करण्यात आली आहे.
- विद्यार्थ्यांसाठी डिबीटी -विद्यार्थ्यांना दरवर्षी शैक्षणिक साहित्य जसे गणवेश, बुट, मोजे, वह्या, दप्तरे इ. मोफत पुरविण्यासाठी १६ ते १८ कोटी आर्थिक तरतूद करण्यात आली आहे.

- शिक्षक प्रबोधिनी 'प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र' या अर्थाशिर्षातर्गत कोविड काळात अभ्यासात मागे पडलेल्या विद्यार्थासाठी उपचारांतर्गत अध्यापन, शैक्षणिक स्वाध्याय पुस्तिका प्रशिक्षण इ. चे नियोजन केले आहे. शिक्षकांना प्रशिक्षण देण्यासाठी दर दोन विभागासाठी एक याप्रमाणे शिक्षक प्रबोधिनी हे प्रशिक्षण केंद्र उभारण्यासाठी विशेष तरतूद करण्यात आली आहे.
- तसेच विद्यार्थी वाहतूक, क्रीडानिकेतन शाळा, विद्यानिकेतन शाळा, संगीत विद्यालय, क्रीडासाहित्य, स्नेहसंमेलने, शैक्षणिक सहली, संस्कार वर्ग इ. साठी सुद्धा भरीव आर्थिक तरतूद करण्यात आली आहे. मॉडेल स्कूल या उपक्रमासाठी भरीव तरतूद करण्यात आलेली आहे.

## माध्यमिक व तांत्रिक शिक्षण विभाग, पुणे महानगरपालिका

### सन २०२१–२२

- मोफत पाठ्यपुस्तके :– पुणे महानगरपालिका संचलित माध्यमिक शाळांमधील विद्यार्थी व पुणे महानगरपालिका हद्दीतील रात्रशाळेतील शिक्षण घेणाऱ्या इ.९ वी व इ.१० वी च्या विद्यार्थ्यांना क्रमिक पुस्तके बालभारती संस्थेकडून खरेदी करून वितरीत करण्यात आली.
- मोफत गणवेश:–पुणे महानगरपालिका संचलित माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांकडील इ.५ वी ते इ.१२ वी च्या विद्यार्थ्यांना प्रत्येकी २ गणवेश मोफत देण्यात येतात. सन २०२१–२२ या शैक्षणिक वर्षात गणवेशबाबतची कार्यवाही प्रस्तावित असून, १२१७९ विद्यार्थ्यांना गणवेशाची रक्कम डीबीटी अंतर्गत बँक खात्यावर जमा करण्यात येत आहे.
- मोफत बसपास सुविधा:– पुणे महानगरपालिका शाळेतील व हद्दीतील इ.५ वी ते इ. १० वी पर्यंतच्या शहर निवासी विद्यार्थी व विद्यार्थिनींना पी.एम.पी.एम.एल. मार्फत मोफत बस पास सुविधा पुरविण्यात येते. पुणे महापालिका हद्दीतील खासगी शाळांतील विद्यार्थ्यांकडून २५% रक्कम घेऊन उरलेली ७५% रक्कम महापालिकेकडून घेऊन पीएमपीएमएलमार्फत पासेस उपलब्ध करुन देण्यात येणार आहे.
- मोफत २१ अपेक्षित प्रश्नसंच :– इ.१० वीच्या विद्यार्थ्यांना मोफत २१ अपेक्षित प्रश्नसंचाची रक्कम डीबीटी अंतर्गत खात्यावर जमा करण्यात येणार आहे.
- शारदाबाई पवार शिष्यवृत्ती योजना :– पुणे महानगरपालिकेच्या माध्यामिक शाळांमधील इ.१० वी व इ.१२ वी च्या अनुक्रमे ज्या विद्यार्थ्यांना ८५% व ८०% पेक्षा अधिक गुण मिळालेले आहेत अशा विद्यार्थ्यांना प्रत्येकी ५१०००/– प्रमाणे इ.१० वी व इ.१२ वी ४६१ विद्यार्थ्यांना र.रु. २,३५,११,०००/–इतका लाभ देण्यात आला.
- माध्यमिक विभागाकडील इ.१० वी च्या विद्यार्थ्यांना अभ्यासाचे तंत्र, परीक्षा पद्धती व करियर निवड बाबत मार्गदर्शनपर व्याख्यानमाला प्रस्तावित करण्यात आले आहे.

### सन २०२२–२३ चे दृष्टीक्षेपातील अंदाजपत्रक

- सन २०२१–२२ मध्ये राबविण्यात आलेल्या मोफत पाठयपुस्तके व गणवेश, मोफत बसपास सुविधा, मोफत २१ अपेक्षित प्रश्नसंच, शारदाबाई पवार शिष्यवृत्ती योजना, NSQF (National Skill Qualification Framework) योजना, सॅनेटरी नेपकिन, इ.११ वी व इ.१२ वी द्विलक्षी अभ्यासक्रम, औद्योगिक प्रशिक्षण केंद्र, सी.एस.आर अंतर्गत उपक्रम सन २०२२–२३ मध्येही प्रभावीपणे राबविण्यात येणार आहे.
- NSQF (National Skill Qualification Framework) व राज्य शासनाचे उद्दिष्टानुसार "Model ITI" प्रमाणे पुणे महानगरपालिका संचलित श्री छत्रपती शिवाजी औद्योगिक प्रशिक्षण संस्था (आयटीआय) चे अद्यावतीकरण व नूतनीकरण करण्यात येणार आहे.
- माध्यमिक शाळांमधील विद्यार्थ्यांची गुणवत्ता वाढविणे, विद्यार्थ्यांची गळती शोधून त्यावर प्रभावी उपाययोजना करणेकामी नव्याने गुणवत्ता वाढ व संशोधन कक्ष स्थापित करणे प्रस्तावित आहे.

## (१६) सामान्य प्रशासन

**सन २०२१–२२**

- **HRMS प्रणालीमुळे उपलब्ध e Service Book माध्यमाने कोणत्याही कर्मचा-यांचे संपूर्ण रेकॉर्ड एका क्लिकद्वारे उपलब्ध**

**HRMS प्रणालीमुळे** अधिकारी/कर्मचारी यांचे सेवा तपशीलामध्ये वेळोवेळी होणारे बदल (वार्षिक वेतनवाढ, कालबध्द पदोन्नती, प्रत्यक्ष पदोन्नती, शैक्षणिक पात्रतेमधील बदल (Educational up gradation), विभागीय चौकशी, शास्ती, निलंबन, गोपनीय अहवाल/मालमत्ता विवरणपत्र Defaulters, परदेश दौरा, इत्यादी) इ. माहिती वेळोवेळी अद्यावत केली जाणार आहे तसेच त्यांचे शैक्षणिक व मनपा सेवेसाठी अन्य आवश्यक कागदपत्रे अपलोड केली आहे. सदर काम पूर्ण करण्याचे नियोजन करण्यात आले आहे. पुणे मनपामध्ये कार्यरत १६७८२ सेवकांपैकी १५९३५ सेवकांच्या नोंदी झालेल्या आहेत. या प्रणालीमुळे कोणत्याही सेवकाचे सर्व्हिस रेकॉर्ड व कागदपत्रे एका क्लिकद्वारे संबंधित खातेप्रमुखांना पाहता येणार आहे. त्यामुळे सेवकांची बदली करताना, बढती देताना तसेच प्रशासकीय कार्यवाही अथवा शास्ती करावयाची असल्यास निर्णय प्रक्रिया सुलभ होणार आहे.

- **आपले सरकार या तक्रार निवारण प्रणालीवर दाखल होणाऱ्या तक्रारींचा निपटारा**

आपले सरकार पोर्टलवर प्राप्त झालेल्या १३६५३ तक्रारींपैकी १३३९४ तक्रारी निकाली काढण्यात आलेल्या असून एकूण ९८% निकाली आहेत.

- **पी.जी.पोर्टल या तक्रार निवारण प्रणालीवर दाखल होणाऱ्या तक्रारींचा निपटारा**

पी.जी. पोर्टलवर प्राप्त झालेल्या ८९९ तक्रारींपैकी ७१९ तक्रारी निकाली काढण्यात आलेल्या आहेत.

- **कर्मचारी प्रशिक्षण**

कर्मचाऱ्यांना सोपविण्यात आलेल्या कामकाजात व कर्तव्य पार पाडणेसाठी सक्षम बनविणेसाठी प्रशिक्षण आयोजित करण्यात आली. सदर प्रशिक्षणामध्ये राज्य प्रशिक्षण धोरण–एकदिवसीय, Training Program on mains teaming of DRR in Urban Local Bodies, Online Training Program on Disaster Risk Reduction in Urban Areas, "Fundamentals of Disability Inclusion" अशा वेगवेगळया विषयांवर प्रशिक्षण आयोजित करण्यात आले होते. तसेच महानगरपालिकेतर्फे महिलांसाठी 'महिलांच्या कामाच्या ठिकाणी होणारी लैंगिक छळवणूक अधिनियम २०१३' या विषयावर माहितीसह व कायद्याचे ज्ञान देऊन प्रशिक्षण आयोजित करण्यात आले. महापालिकेतर्फे हा अनोखा उपक्रम राबविणेत आला.

- **कोरोना विषयक कामकाज**

पुणे महानगरपालिका क्षेत्रातील कोविड–१९ च्या प्रसारास प्रतिबंध करण्यासाठी प्रकरणाची साखळी प्रभावीपणे खंडित करण्यासाठी (Break the chain) लावलेले निर्बंध शिथिल करणे, तसेच विविध आर्थिक आणि सामाजिक उपक्रम नियोजनबध्द सुरु करण्याच्या अनुषंगाने वेळोवेळी आदेश निर्गमित करण्यात आले व यासाठी महापालिकेचे व पीएमपीएमएलचे अंदाजे एकुण १८५० अधिकारी/कर्मचारी यांची कोरोना विषयक कामकाजाकरिता पुणे महानगरपालिका क्षेत्रातील विविध कोविड सेंटर, स्वॅब सेंटर व लसीकरण केंद्रावर सामान्य प्रशासन, आस्थापना विभागामार्फत सेवक नियुक्ती आदेश काढण्यात आले.

- **कोरोनाच्या काळामध्ये सेवाभरती कक्षामार्फत भरती प्रक्रियाबाबतः–**

कोरोनाच्या काळामध्ये सामान्य प्रशासन विभाग व सेवाभरती कक्षाकडून आरोग्य विभागाकडील विविध क्षेत्रातील वैद्यकीय तज्ञ – अधिकारी वर्ग १ व अधिकारी वर्ग–२ भरती प्रक्रिया राबविणेत आली. सदर प्रक्रियेमध्ये एकुण ४५ तज्ञांची नेमणूक करण्यात आली.

**सन २०२२ –२३**

- **मनपा प्रशासनातील विविध खात्यातील कर्मचाऱ्यांची कामाचे स्वरूपानुसार Training Need Analysis (TNA) (प्रशिक्षण गरजेचे विशेषण)**

  कर्मचाऱ्यांना सोपविलेल्या कामकाजात व कर्तव्य पार पाडण्यात सक्षम बनविणे या माध्यमातून गतिमान व सक्षम प्रशासन निर्माण करण्याकरिता प्रत्येक 'अ ते ड' संवर्गातील अधिकारी/ कर्मचाऱ्याला त्याचे कर्तव्यनिहाय प्रशिक्षण देणे गरजेचे आहे. कर्तव्यनिहाय प्रशिक्षण देण्याकरिता प्रत्येक अधिकारी/कर्मचारी त्यांच्या विभागात कोणत्या स्वरूपाचे काम करतो, त्यास कोणती जबाबदारी सोपविण्यात आली आहे. याबाबतची माहिती संकलित करून त्यांचे Training Need Analysis करून कोणत्या विषयावर प्रशिक्षण देणे आवश्यक आहे. याबाबत निश्चिती करून प्रशिक्षण कार्यक्रमाचे (Training Calendar) नियोजन करण्यात येत आहे.

## (१७) आपत्ती व्यवस्थापन विभाग

**सन २०२१–२२**

- आपत्ती व्यवस्थापन केंद्रा अंतर्गत पुणे महापालिकेच्या महापालिका सहाय्यक आयुक्त कार्यालय, अग्निशमन विभाग, सुरक्षा विभागातील सेवकांना आपत्ती व्यवस्थापनाचे निवासी प्रशिक्षण नॅशनल डिझास्टर रिस्पॉन्स फोर्स, तळेगाव, पुणे येथे परिपूर्ण आपत्ती व्यवस्थापनाचे सेवकांना प्रशिक्षण देणेकरीता सदर संस्थेची मदत घेण्यात येत आहे.
- पुणे आपत्ती व्यवस्थापन केंद्र, मुख्य इमारत, पुणे महानगरपालिका येथे स्थापन करण्यात आले आहे. पुणे मनपा 'मुख्य आपत्ती व्यवस्थापन कक्ष' सुरु करण्यात आले असून सदर केंद्रामध्ये सेवकांची २४ तास नेमणूक करण्यात आलेली आहे. आपत्ती व्यवस्थापन विभागामार्फत पुणे मनपाचे विविध विभाग/खाते व सेवक कर्मचारी यांचेकरीता जनजागृती प्रशिक्षण व क्षमता बांधणी व आराखडा तयार करणेचे काम सुरू आहे.
- आपत्ती व्यवस्थापना अंतर्गत राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन संस्था (NIDM) यांच्या मार्गदर्शन धोरणानुसार पुणे शहराचा आपत्ती व्यवस्थापन आराखडा तयार करून घेण्याचे काम सुरू आहे.

**सन २०२२–२३**

- आपत्ती व्यवस्थापन केंद्रा अंतर्गत पुणे महापालिकेच्या महापालिका सहाय्यक आयुक्त कार्यालय, अग्निशमन विभाग, सुरक्षा विभाग, पुणे महानगरपालिकेकडील शिक्षण मंडळातील शिक्षकांना तसेच आरोग्य विभागाकडील सेवकांना आपत्कालीन परिस्थिती हाताळण्याचे आपत्ती व्यवस्थापनाचे निवासी प्रशिक्षण नॅशनल डिझास्टर रिस्पॉन्स फोर्स, तळेगांव, पुणे येथे परिपूर्ण प्रशिक्षण देण्याचा मानस आहे.
- पुणे शहरात उद्भवणाऱ्या नैसर्गिक व मानवनिर्मित आपत्ती बाबत क्षेत्रिय स्तरावर जनजागृती करण्यात येणार आहे.
- पुणे मनपाचे सर्व विभागाकरीता तसेच पुणे शहराकरीता आपत्ती व्यवस्थापन आराखडा तयार करून त्यानुसार त्याची अंमलबजावणी करण्यात येणार आहे.

## (१८) समाज विकास

- **सन २०२१-२०२२ मधील महत्वाच्या पूर्णत्वास/सुरू असलेल्या नाविन्यपूर्ण योजना/प्रकल्पांची नावे ठळक बाबी**
- समाज विकास विभागामार्फत विविध कल्याणकारी योजनांची अंमलबजावणी करणेत येते. या करीता सन २०२१-२०२२ चे अर्थसंकल्पात र.रू. १,६१,१६,३४,०००/- तरतूद करणेत आली आहे.
- पुणे महानगरपालिका, समाज विकास विभागामार्फत दारिद्र्य रेषेखालील व अल्प उत्पन्न गटातील नागरिकांसाठी खालीलप्रमाणे योजना राबविणेत येतात.

- केंद्र व राज्य शासनाची दिनदयाळ अंत्योदय योजना राष्ट्रीय नागरी उपजिवीका अभियान योजना दारिद्र्य रेषेखालील कुटुंबासाठी सन २०१४ पासून राबविणेत येत आहे. या योजना करीता शासनाकडून निधी प्राप्त होतो. या व्यतिरिक्त मनपा अर्थसंकल्पातील बांधील खर्च वजा जाता ५% रक्कम महिला बालकल्याण, ५% रक्कम मागासवर्गीयांसाठी व ५% रक्कम दिव्यांगांसाठी राखून ठेवली जाते. खात्यामार्फत महिला बालकल्याण योजना, मागासवर्गीय कल्याणकारी योजना, युवक कल्याणकारी योजना, दिव्यांग कल्याणकारी योजना इ. योजना राबविल्या जातात.

- **स्वयंरोजगार उपक्रम –** व्यवसाय प्रशिक्षण, उद्योजकता विकास प्रशिक्षण, स्वयंरोजगारासाठी अनुदान

- केंद्र व राज्य शासनाची दिनदयाळ अंत्योदय योजना राष्ट्रीय नागरी उपजिवीका अभियान अंतर्गत सामाजिक अभिसरण व संस्थात्मक बांधणी, क्षमता बांधणी व प्रशिक्षण, कौशल्य प्रशिक्षणाद्वारे स्वयंरोजगार व नोकऱ्यांची उपलब्धता, स्वयंरोजगार कार्यक्रम, फेरीवाल्यांना सहाय्य, शहरी बेघरांना निवारा योजना शासनाच्या निधीतून राबविल्या जातात. तसेच प्रत्येक क्षेत्रीय कार्यालयामध्ये नागरिकांसाठी सेवा केंद्र, बचत गटातील महिलांनी उत्पादित केलेल्या वस्तू विक्री करीता आधार केंद्र यांचा समावेश आहे.

- **बचत गटांसाठी योजना –** शहर पातळीवर सुमारे ८५७७ बचत गट कार्यरत असून बचत गट स्थापनेसाठी महिलांना प्रशिक्षण, फिरता निधी, बचत गटांनी उत्पादित केलेल्या वस्तूंसाठी प्रदर्शन व विक्री करीता अर्थसहाय्य, स्वस्त धान्याची दुकाने देणे, तसेच मनपाच्या प्राथमिक शाळेतील सुमारे ७०००० विद्यार्थ्यांना शासनाच्या मध्यान्ह भोजन योजना अंतर्गत मध्यान्ह भोजन व बालवाडीतील १२००० मुलांना बचत गटांच्या माध्यमातून शालेय पोषण आहार दिला जातो.

- **महिलांसाठी योजना –** विधवा महिलांना अनुदान, महिलांना कुटुंब नियोजनासाठी प्रोत्साहन, स्त्री संसाधन केंद्र (सक्षमा कक्ष), महिला/युवती यांना स्वसंरक्षण प्रशिक्षण, मुलगी दत्तक योजना, पाळणाघर, वस्तीपातळीवरील विविध प्रशिक्षण वर्ग व अनुदान, महिलांसाठी योगासन वर्ग इ. योजना राबविण्यात येतात.

- **विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक योजना –** इ. १० वी व इ. १२ वी मधील विद्यार्थ्यांसाठी खाजगी क्लास फी अर्थसहाय्य, सीईटी क्लास फी अर्थसहाय्य, उच्च शिक्षणासाठी अर्थसहाय्य, मागासवर्गीय विद्यार्थ्यांना सायकल करीता अर्थसहाय्य, कमवा व शिका योजना, इ. १० वी व इ. १२ वी मध्ये ८०% अथवा त्यापेक्षा जास्त गुण मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक अर्थसहाय्य, स्पोकन इंग्लिश वर्ग, अभ्यासिका, ग्रंथालय, घाणभत्ता मिळणाऱ्या मनपा सेवकांच्या मुलांना अर्थसहाय्य, पुणे महानगरपालिका हद्दीतील कचरा वेचक व बायोगॅस प्रकल्पावर काम करणारे तसेच कचऱ्याच्या संबंधित काम करणाऱ्या सर्व असंघटीत कष्टकरी कामगारांच्या मुलांना शैक्षणिक साहित्यासाठी अर्थसहाय्य, स्पर्धा परिक्षा केंद्र, मनपाच्या माध्यमिक प्रशालेतील मुलांना शैक्षणिक साहित्य इ. उपक्रम राबविले जातात.

- **भौतिक सुविधा उपक्रम** –झोपडपट्टीमध्ये वैयक्तिक शौचालय बांधणे, झोपडी दुरूस्ती, वीज कनेक्शन, नळ कनेक्शन इ. करीता मागासवर्गीय यांना अर्थसहाय्य, डॉ. बाबासाहेब आंबेडकर वसतीगृहातील ४०० विद्यार्थ्यांचा भोजनाचा खर्च दिला जातो.

- **सामाजिक उपक्रम –** वृद्धांसाठी विरंगुळा केंद्र, व्यसनमुक्तीसाठी अर्थसहाय्य, रस्त्यावरील मुलांसाठी घरटं प्रकल्प, दिवस रात्र निवारा प्रकल्प, बाल विकास केंद्र इ. उपक्रम राबविण्यात येतात.

- **दिव्यांग कल्याणकारी योजना –** दिव्यांगाना मोफत पीएमपीएमएल बसपास, कृत्रिम अवयव घेणे, स्वयंरोजगार, उच्च शिक्षण, प्रशिक्षणासाठी अर्थसहाय्य, महापालिका क्षेत्रातील १८ वर्षापुढील मतिमंद व्यक्तींचा सांभाळ करणाऱ्या महापालिका हद्दीतील नोंदणीकृत स्वयंसेवी संस्थेस अथवा मतिमंद व्यक्तीच्या पालकांस अर्थसहाय्य, कुष्ठ पिडीत व १००% अतितीव्र अपंग (निःसमर्थ) व्यक्तीकरिता वार्षिक अर्थसहाय्य दिले जाते.

- सन २०२१-२०२२ या आर्थिक वर्षामध्ये कोविड-१९ प्रादुर्भावामुळे ४०% पेक्षा जास्त दिव्यांगत्व असलेल्या नागरिकांच्या बँक खात्यामध्ये आर.टी.जी.एस. द्वारे प्रत्येकी र.रू. २०००/- प्रमाणे एकदाच अर्थसहाय्य देण्यात आले आहे.

**सन २०२२–२३ चे दृष्टीक्षेपातील अंदाजपत्रक –**

- समाज विकास विभागामार्फत वरील योजनांची अंमलबजावणी करणेत येते. या करीता तसेच नव्याने राबविणेत येणाऱ्या योजनांकरीता २०२२–२०२३ चे अर्थसंकल्पात र. रू. १२४.१८ कोटी ची तरतूद सुचविणेत आली आहे.

**सन २०२२–२०२३ मध्ये करावयाचे प्रस्तावित महत्वाचे प्रकल्प/योजना**

- MPSC, UPSC पूर्व परिक्षेत उत्तीर्ण होऊन मुख्य परिक्षेला पात्र होणाऱ्या गुणानुक्रमे प्रत्येकी १०० विद्यार्थ्यांना पुस्तके खरेदीसाठी अर्थसहाय्य करणे.
- Gender Responsibility अभ्यासगट तयार करणे व शहर पातळीवर महिलांच्या सुरक्षिततेसाठी उपाययोजना करणे.
- सार्वजनिक ठिकाणी महिलांच्या सुरक्षिततेसाठी Safety Mapping व Safety Audit करणे.
- पुणे महानगरपालिका दिव्यांग नागरिकांसाठी दिव्यांग–दिव्यांग, दिव्यांग–अव्यंग व्यक्तींच्या विवाहासाठी अर्थसहाय्य, दिव्यांग व्यक्तींनी स्थापित केलेल्या कला पथकास वाद्य खरेदीसाठी अर्थसहाय्य, दिव्यांग व्यवसाय गटांनी सुरु केलेल्या व्यवसायाच्या वृद्धी करिता अर्थसहाय्य, दृष्टीहीन यांचे सोबत मदतनीसाला पी.एम.पी.एम.एल. तिकिटात ५०% सवलत देणे, दिव्यांग व्यक्तींना वार्षिक अर्थसहाय्य या योजना राबविणेत येणार आहे.
- समाज विकास विभागाकडील योजनांचा लाभ अनाथ व्यक्तींना देणे.

## (१९) कामगार कल्याण विभाग

**सन २०२१–२२**

- **मृत सेवकांच्या वारसांना अर्थसहाय्य –** मृत सेवकांच्या ७९ वारसांना र. रू.४१.४७ लाख अर्थसहाय्य प्रदान करण्यात आलेले आहे.
- **कामगार कल्याण निधी –** कामगार कल्याण निधीचे सभासद असलेल्या मृत सेवकांच्या ७६ वारसांना र.रू.१७.१० लाख वारस अनुदान वितरित करणेत आले.
- **ध्वजदिन निधी संकलन –** सन २०२१–२२ मध्ये मा.जिल्हाधिकारी यांनी दिलेल्या उद्दिष्टानुसार मनपा अधिकारी/कर्मचाऱ्यांकडून र. रू. २३,५२,६२५/– ध्वजदिन संकलित करण्यात आला आहे.
- **कोरोना विषाणु सुरक्षा कवच योजना –**

  कोरोना विषाणू (कोव्हीड–१९) प्रतिबंधक उपाययोजनेकामी कार्यरत २५ अधिकारी व कर्मचारी यांना प्रत्येकी र. रू.२५.०० लाख प्रमाणे एकूण र.रू. ६.२५ कोटी अर्थसहाय्य कार्यकारी समिती, कामगार कल्याण निधी मार्फत वितरित करण्यात आले आहे.
- **मराठी भाषा संवर्धन –**

  मराठी भाषेच्या प्रसारासाठी आकाशवाणीवर **"आपली मराठी"** हा कार्यक्रम दि.१७/०३/२०२१ पासून दर बुधवारी १२.०० ते १२.१० या वेळेत प्रसारित करण्यात येत आहे. त्यामध्ये नामवंत साहित्यिक, लेखक, कवी, इत्यादींच्या साहित्यांची ओळख करून देण्यात येते.
- **अपघात विमा योजना –**

  पुणे महापालिका कायम आस्थापनेवरील अधिकारी/कर्मचाऱ्यांचा अपघाती मृत्यू झाल्यास वा अपंगत्व आल्यास समुह वैयक्तिक अपघात विमा राबविणेत येत आहे. त्या अंतर्गत एप्रिल २०२१ ते डिसेंबर २०२१ अखेर एकूण ४ दिवंगत सेवकांच्या वारसांना र.रू.३४,६०,०००/– आदा करण्यात आली आहे.

**सन २०२२–२३**

- **कामगार कल्याण निधी –**

कामगार कल्याण निधींतर्गत विहित विविध कल्याणकारी योजना राबविण्यात येणार आहेत. त्यामध्ये गुणवंत कामगार पुरस्कार, शैक्षणिक कर्ज शिष्यवृत्ती, विविध क्रीडा स्पर्धा, सांस्कृतिक कार्यक्रम इत्यादींचा समावेश आहे.

- **मराठी भाषा संवर्धन समिती –**

मराठी भाषा संवर्धन समितीमार्फत आकाशवाणीवर **"आपली मराठी"** हा कार्यक्रम प्रसारित करणे, मराठी आठवड्याच्या निमित्ताने ग्रंथ महोत्सव, कवी संमेलन, साहित्य पुरस्कार, साहित्यिक कट्टे, मनपा अधिकारी/कर्मचारी व शालेय विद्यार्थ्यांसाठी विविध स्पर्धा, नाट्यप्रयोग सादरीकरण, साहित्य संमेलन इत्यादी उपक्रम राबविण्याचे प्रस्तावित आहे.

- **अपघात विमा योजना –**

या योजने अंतर्गत महानगरपालिका अधिकारी/कर्मचारी समुह वैयक्तिक अपघात विमा राबविणेत येत आहे. त्या अंतर्गत र.रू.१० लाखाचे विमा कवच पुरविणे प्रस्तावित आहे.

- **महिलांसाठी विविध योजना/सांस्कृतिक कार्यक्रम/प्रशिक्षण शिबिरे आयोजित करणे –**

पुणे महानगरपालिकेतील महिला अधिकारी/कर्मचाऱ्यांसाठी महिला दिनानिमित्त विविध सांस्कृतिक, प्रबोधनपर आणि इतर बाबींच्या अनुषंगाने विविध कार्यक्रम व विविध विषयांवर प्रशिक्षण शिबिरे आयोजित करणेचे प्रस्तावित आहे.

- **कोरोना विषाणु सुरक्षा कवच योजना –**

कोरोना विषाणू (कोव्हीड–१९) प्रतिबंधक उपाययोजने अंतर्गत दिवंगत महानगरपालिका अधिकारी/कर्मचारी यांचे वारसास प्रत्येकी र.रू.५० लाख अर्थसहाय्य वितरित करणेत येणार आहे.

## (२०) भूसंपादन व व्यवस्थापन विभाग

**सन २०२१–२२**

- पुणे महानगरपालिकेस आवश्यक आरक्षित जागा भूसंपादन कायद्यान्वये ताब्यात घेण्याची कार्यवाही या विभागांतर्गत करण्यात येते.
- चांदणी चौक येथील महत्वाकांक्षी रस्ते व वाहतुक नियोजन प्रकल्प राबविण्यासाठी करावयाचे जागेच्या भूसंपादनाकरीता राज्य शासनाकडून र.रू.१८५.४३ कोटी पैकी र.रू.१८४.५० कोटी चार हप्त्यामध्ये प्राप्त झाले आहेत. तसेच र.रू. ०.९३ लाख रकमेचा पाचवा हप्ता वितरीत करणेबाबतचे शासन निर्णय क्र.नगरो–२०२१/प्रक्र८७(II)/नवि –३३/मंत्रालय,मुंबई दि.२८/१०/२०२१ प्राप्त झालेले आहेत. सदरची रक्कम मा. जिल्हाधिकारी, पुणे यांचे कार्यालयाकडून पुणे महानगरपालिकेस उपलब्ध करून देण्याची प्रक्रिया सुरू आहे.

**सन २०२२–२३**

**दृष्टीक्षेपात अर्थसंकल्पीय अंदाज सन २०२२–२३**

- पुणे महानगरपालिकेस आवश्यक आरक्षित जागा भूसंपादन कायद्यान्वये ताब्यात घेण्याची कार्यवाही या विभागांतर्गत करण्यात येते. जुना भूसंपादन कायदा १८९४ नुसार एकूण १५६ भूसंपादन प्रकरणाची कार्यवाही मा. जिल्हाधिकारी, पुणे यांचे कार्यालयांतर्गत विशेष भूमि संपादन अधिकारी क्र.१५ व १६ यांचेमार्फत सुरु आहे. तथापि, भूसंपादनातील योग्य नुकसान भरपाईचा अधिकार व स्थानांतरण, पुर्नस्थापना आणि पुर्नवसन अधिनियम २०१३ च्या तरतुदीनुसार अंमलबजावणी करणेकरिता त्यांनी एकूण २६४ चालु प्रकरणांपैकी ६१ प्रकरणांची नवीन भूसंपादन कायद्यानुसार सद्यस्थितीत कार्यवाही सुरु ठेवली असून ऊर्वरित २०३ प्रकरणे

संबंधित खात्यांच्या प्राधान्यक्रमानुसार व उपलब्ध होणाऱ्या आर्थिक तरतुदीनुसार पुनर्जिवित करण्याची कार्यवाही सुरु करण्यात येणार आहे. चालू असलेल्या भूसंपादनासाठी, निवाडा मंजूरीवर प्रलंबित प्रकरणी तसेच निवाडा मंजूर असलेली तथापि नुकसान भरपाई रक्कम प्राप्त नसलेने निवाडा जाहीर होणेवर प्रलंबित एकूण ३८ प्रकरणांसाठी र.रू.१७१० कोटी इतकी तरतुद आवश्यक आहे.

- पुणे महानगरपालिकेच्या मंजुर विकास योजना आराखडयामधील विविध आरक्षित जागांचा प्राधान्याने विकास करण्यासाठी आवश्यक असणाऱ्या आर्थिक तरतुदी त्या तरतुदी त्या-त्या खात्यांचे अर्थशिर्षकावर करणेत येणार आहेत.

- भूसंपादन व व्यवस्थापन विभागामार्फत चालू असलेले भूसंपादन विषयक महत्वपुर्ण प्रस्ताव :-

  चांदणी चौक उड्डाणपूल, पर्वती तळजाई, जायका (मैलापाणी प्रक्रिया प्रकल्प), क्रांतीवीर लहुजी वस्ताद साळवे स्मारक, संगमवाडी, भिडेवाडा, वारजे शिवणे नदीकाठचा रस्ता, महात्मा फुले स्मारक, मुंबई-पुणे रस्ता.

## (२१) अतिक्रमण/अनाधिकृत बांधकाम निर्मूलन विभाग

**सन २०२१-२०२२**

- पुणे शहारातील मुख्य रस्ते/ पदपथावर होणारे अतिक्रमण उदा. स्टॉल/हातगाडी/पथारीवाले व इतर व्यवसायिक यांच्यामुळे वाहतुकीस व रहदारीस होणारा अडथळा दूर करुन रस्ते/पदपथ अतिक्रमण मुक्त ठेवणेसाठी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतूदीनुसार दैनंदिन अतिक्रमण निर्मुलन कारवाई करण्यात येते. तसेच आवश्यक ते परवाने दिले जातात. उदा. मांडव घालणे इ. अधिकृत व्यवसायिकांचे पुर्नवसन करण्यात येते. तात्पुरत्या स्वरुपात देण्यात आलेल्या झाप/फळी पायरी, मांडव+कमान/इमारत मालमसाला डेलीपास या सर्व परवानाधारकांकडून परवाना फी वसूल केली जाते. अधिकृत परवाना धारकांची (स्टॉल/हातगाडी/बैठा) यांची परवाना फी वसुल करण्यात येते. महानगरपालिका हद्दीतील अनाधिकृतपणे व्यवसाय करणाऱ्या (स्टॉल/हातगाडी/बैठा) यांच्याकडून रिमुव्हल चार्जेस वसूल करण्यात येते. अनाधिकृत बांधकामे पाडणेकामी करण्यात आलेला खर्च वसुलीबाबत कार्यवाही करण्यात येते.

- सार्वजनिक रस्ता व पदपथावरील अतिक्रमण निर्मूलन कारवाई अहवाल खालीलप्रमाणे

| महिना | स्टॉल | हातगाडी | पथारी | सिलेंडर | शेड/झोपड्या | इतर | व्यावसायिक वाहने |
|---|---|---|---|---|---|---|---|
| एप्रिल २०२१ ते जानेवारी २०२२ अखेर | ८८ | ३१३४ | २४७३८ | ३३७ | १५२५ | ८०४२ | ६३ |

- नवरात्र व गणपती उत्सवावेळी मंडप परवानगी करीता पुणे पोलीस विभागाने पोर्टल/संकेतस्थळ विकसित करुन नाहरकत प्रमाणपत्र, परवाना देण्यात येतात. पुणे शहरातील रस्त्यावरील बेवारस वाहनांवर पोलीस वाहतूक शाखेच्या मदतीने संयुक्तपणे कारवाई करण्यात येत आहे. सन २०१४ च्या हॉकर्स पॉलिसी धोरणानुसार एकूण ३०४९५ पथारी व्यावसायिकांचे बायोमेट्रीक सर्व्हेक्षण झाले असून त्यापैकी २१३३९ पथारी व्यावसायिकांना फेरीवाला नोंदणी प्रमाणपत्र वाटप करण्यात आलेले आहे.

- दिनांक ३१/०१/२०२२ अखेर एकुण परवाना व रिमूव्हल चार्जेस शुल्कापोटीची र.रु ५,१८,६९,४६३/- एवढी रक्कम जमा झाली आहे.

**सन २०२२–२३**

**प्रस्तावित नाविन्यपुर्ण प्रकल्प किंवा योजना**

- मे. सर्वोच्च न्यायालयाने दिनांक ०९/०९/२०१३ चे आदेश व मे. महाराष्ट्र शासनाचे दिनांक २१/१०/२०१३ चे निर्णयानुसार पुणे महानगरपालिका हद्दीतील फेरीवाल्यांचे बायोमेट्रीक सर्वेक्षण करणे, नोंदणी करणे व ओळखपत्र देणे यासाठी अद्यावत संगणक प्रणाली तयार करण्यात आली असून मे. सर्वोच्च न्यायालयाने व शासनाने दिलेल्या आदेशानुसार ३०४९५ व्यवसायिकांचे सर्व्हेक्षण करण्यात आले असून, त्यांचे ओळखपत्र तयार करणे व वाटप करणे. त्यांचे पुर्नवसन झोन स्थापन करुन फेरीवाला क्षेत्र निर्माण करणे, फेरीवाल्यांचा जीवनस्तर उंचावण्यासाठी योजनांची अंमलबजावणी करणे,
- पुणे शहरातील फेरीवाल्यांचे सर्वेक्षण व पुर्नवसनाचे काम पुर्ण झाल्यानंतर त्यांचेकडून परवाना फी पोटी अंदाजे र. रु. ६०० लक्ष वसूल होण्याची अपेक्षा आहे.
- अतिक्रमण विभागाचे ५ परिमंडळ कार्यालये स्तरावर नव्याने अतिक्रमण निर्मूलन कक्षाची स्थापना करणे व त्या अंतर्गत फेरीवाला पुर्नवसन कक्ष कार्यान्वित करणेबाबतचे नियोजन करण्यात आले आहे.
- शहर फेरीवाला समिती सदस्यांची निवडणूक घेणे.
- ‘‘पंतप्रधान स्वनिधी योजना” केंद्र शासनातर्फे प्रस्तूत सदर योजनेमध्ये पुणे शहरातील फेरीवाले, पथविक्रेते, भाजी विक्रेता, स्टॉलधारक यांना र.रु.१०,०००/– कर्ज स्वरुपात देण्याची योजना शासनामार्फत सुरु आहे.

# दृष्टीक्षेपात अंदाजपत्रक–

## प्रमुख जमा बाबी :–

### (१) स्थानिक संस्था कर

**सन २०२१–२२**

- मे. राज्य शासनाने जकातकर बंद करुन स्थानिक संस्था कर (LBT) लागू केलेला असल्याने महसूलात होणारी तुट भरणेकरीता पुणे शहरांतर्गत होणाऱ्या खरेदी व विक्रीच्या व्यवहाराच्या रकमेवर अतिरिक्त १% रक्कम मुद्रांक शुल्क अधिभार अनुदान संबंधित महापालिकेस आदा करणेबाबतचे शासन निर्णय प्रसृत केलेले असून त्यानुसार दि. ०१/०४/२०१३ पासून पुणे मनपा मुद्रांक शुल्क अधिभार अनुदान प्राप्त होत आहे.
- मे. केंद्र व राज्य शासनाने दि. ०१/०७/२०१७ पासून वस्तु व सेवा कर (GST) लागू केलेला असल्याने स्थानिक संस्था कर बंद करण्यात आल्याने मे. राज्य शासनाकडून माहे जुलै २०१७ पासून दरमहा वस्तू व सेवा कर अनुदान पुणे मनपास प्राप्त होत आहे.
- सन २०२१–२०२२ या आर्थिक वर्षात मे. राज्य शासनाकडून दरमहा र.रु. १६५.४९ कोटी प्रमाणे वस्तु व सेवा कर अनुदानापोटी र.रु.१९८५.८८ कोटी, १% मुद्रांक शुल्क अधिभार अनुदानापोटी र.रु. १७० कोटी व इतर जमेपोटी र.रु.०.५७ कोटी अशी एकुण र.रु. २१५६.४५ कोटीचे अंदाजित उत्पन्न मा. स्थायी समितीने उद्दिष्ट दिलेले आहे.

| उत्पन्न तपशील सन २०२१–२२ | माहे एप्रिल २१ ते जानेवारी २२ प्रत्यक्ष प्राप्त उत्पन्न | अपेक्षित उत्पन्न (माहे फेब्रु.२२ ते मार्च २२) |
|---|---|---|
| वस्तू व सेवा कर अनुदान (दरमहा र. रु. १६५.४९ कोटी प्रमाणे) | र.रु. १७३१.५२ कोटी | र.रु. ३३०.९८ कोटी |
| १% मुद्रांक शुल्क अधिभार अनुदान | र.रु. १३०.१४ कोटी | र.रु. १७६.८१ कोटी |
| इतर जमा | र.रु. ०.१८ कोटी | र.रु. ०.२२ कोटी |
| एकुण | र.रु. १८६१.८७ कोटी | र.रु. ५०८.०१ कोटी |
| **एकूण उत्पन्न (प्रत्यक्ष प्राप्त व अपेक्षित उत्पन्नासह)** | **र.रु.२३६९.८८ कोटी** | |

**सन २०२२–२३**

| उत्पन्न तपशील सन २०२२–२३ करीता | अंदाजित उत्पन्न | ऐरा |
|---|---|---|
| वस्तु व सेवा कर अनुदान (दरमहा र.रु. १७८.७२ कोटी प्रमाणे) | र.रु. २१४४.७५ कोटी | मागील वर्षातील दरमहा र.रु.१६५.४९ मध्ये सरासरी ८% वाढ धरुन सन २०२२–२३ करीता दरमहा र.रु.१७८.७२ कोटी प्रमाणे प्राप्त होतील. |
| १% मुद्रांक शुल्क अधिभार अनुदान | र.रु. ३३०.९७ कोटी | |
| एकुण | र.रु. २४७५.७२ कोटी | |

## (२) मिळकत कर

### सन २०२१–२२

**कर आकारणी व कर संकलन विभाग २०२१–२२ उद्दीष्ट र.रु. २९४६ कोटी**

- सन २०२१–२२ या वर्षाची पोस्टामार्फत मिळकतकर देयके मिळकतधारकांना वितरीत करणेत आली तसेच मोबाईल क्रमांक व ईमेल द्वारे मिळकतकराची बिलांची माहिती देण्यात आलेली होती. वेबसाईटवर मिळकतकराचे बिल उपलब्ध असल्याने नागरिकांना मिळकत कर भरण्यामध्ये अडचण झालेली नाही. सदर कालावधीत नागरिकांनी पुणे महानगरपालिकेकडे मिळकतकर जमा केलेला आहे. लॉकडाऊनच्या कालावधीमध्ये ऑनलाईन मिळकतकर भरणेकरीता सर्व प्रकारचे ऑनलाईन पर्याय (Option) उपलब्ध करुन देण्यात आलेले होते.

- यावर्षी आयसीआयसीआय बँके मार्फत मिळकतकराची बिले विना खर्च छपाई करुन माहे एप्रिल मध्ये सर्व नागरिकांना पोस्टामार्फत पाठविण्यात आलेली आहेत. यामुळे पुणे महानगरपालिकेची किमान र.रू.५० लक्ष इतकी बचत झालेली आहे.

- संपूर्ण कर जमा करणाऱ्या मिळकतधारकांना सर्वसाधारण करामध्ये ५ ते १० % सवलत दि.०१/०४/२०२१ ते ३१/०५/२०२१ पर्यंत देण्यात आली होती. तथापि, कोरोना विषाणूच्या प्रार्दुर्भावामुळे सदरची मुदत दि.०१/०६/२०२१ ते दि ३०/०६/२०२१ वाढविण्यात आली होती. तसेच दरमहा जुलै पासून आकारणेत येणारी शास्तीची रक्कम १ ऑगस्ट पासून आकारणेस व सन २०२०–२१ मध्ये कोरोना कालावधीत दिनांक ३०/९/२०२० अखेर संपुर्ण मिळकत कर भरणाऱ्या मिळकतधारकांना शासनाचे कर वगळून इतर सर्व करांवर १५ टक्के सवलत देण्यात आली आहे.

- जे निवासी मिळकतधारक सन २१–२२ या वर्षाचा संपूर्ण मिळकतकर भरतील त्यांना ५ लक्षापर्यंतचा अपघाती विमा संरक्षण पुणे मनपाकडून देणेत येत आहे.

- मिळकतकराच्या डेटाबेसमध्ये सुमारे १०,४३,४८८ भ्रमणध्वनी व ईमेल ८,०३,५४५ समाविष्ट केलेले आहेत. भ्रमणध्वनी क्रमांकावर व ई–मेल वर सन २०२१–२२ मधील मिळकतकर विषयक मागणीची रक्कम मुदतीत भरणेबाबत तसेच मुदतीत कर न भरल्यास दरमहा २% शास्ती आकारणीबाबतची माहिती मिळकतकर धारकांना पाठविण्यात आली होती.

- १००० स्के. फुटापर्यंतच्या निवासी स्वरूपाच्या अनधिकृत मिळकतींना तीनपटची शास्ती दि.०१/०४/२०१९ पासून रद्द करणेत आलेली आहे. तसेच ज्या निवासी स्वरूपाच्या अनधिकृत १००१ स्के. फुटापेक्षा जास्त क्षेत्रफळ असलेल्या मिळकतींना तीनपट ऐवजी दिडपट शास्ती लागु करणेत आलेली आहे.

- मिळकतकर आकारणीचे जुन्या दस्ताऐवजांचे स्कॅनिंग व संगणकावर ‘अे’ फॉर्म अपलोडींगचे काम करण्यात येत असून आतापर्यत सुमारे ५७,४७,७९८ इतके कागदपत्राची स्कॅनिंग व अपलोडींगचे कामकाज पूर्ण करण्यात आलेले आहे. यामुळे मिळकतकराच्या आकारणीचे सर्व दस्तऐवजांचे जतन होत आहे

- दि. ०१/०४/२०२१ ते ३१/०१/२०२२ अखेर मिळकतकरापोटी र.रु.१५०५.१४ कोटी इतकी रक्कम जमा झाली आहे.

- मिळकतकराची रक्कम जास्तीत जास्त ऑनलाईन स्विकारणेबाबत खात्याकडून प्रोत्साहन देण्यात आले असून सन २०१८–२०१९ मध्ये ४७.१९% ऑनलाईन कलेक्शन, सन २०१९–२० मध्ये ४८.२३% व सन २०२०–२१ मध्ये ६५.१२% व सन २०२१–२२ मध्ये नोव्हेंबर अखेर ६८.९७% ऑनलाईन कलेक्शन झाले आहे. Online मिळकतकर भरण्यात नागरिकांच्या संख्येत वाढ झालेली आहे.

- पुणे महानगरपालिकेच्या हद्दीतील व नव्याने समाविष्ट झालेल्या ११ गावांसह निवासी, बिगरनिवासी, मोकळ्या अशा एकत्रित सुमारे ११,४६,६१५ इतक्या मिळकती आहेत.

- सन २०२१-२२ मध्ये अंदाजपत्रकामध्ये दरवाढ न करता र.रू.२६५०/-कोटी इतके उद्दिष्ट सुचविण्यात आले होते. यामध्ये मा.स्थायी समितीने नव्याने समाविष्ट होणारी २३ गावे व इतर करामध्ये र.रू. २९६/-कोटी इतकी रक्कम वाढविण्यात येऊन अंदाजित र.रू.२९४६/-इतके उद्दिष्ट सन २०२१-२२ दिले आहे.

- खात्याकडून प्रत्येक अर्थिक वर्षाचे अंदाजपत्रक खात्याकडून सादर करताना दरवाढ सुचित करून मा.स्थायी समिती मार्फत मा. मुख्य सभेची मान्यता मिळणेबाबत विषयपत्र सादर करण्यात येते. खात्याने सुचविलेल्या दरवाढीनुसार अंदाजपत्रक सादर करण्यात येते. तथापि, मा.स्थायी सादर झालेल्या अंदाजपत्रकाच्या उद्दिष्टामध्ये वाढ सुचवून अंदाजपत्रकास मान्यता दिली जाते. त्यामुळे उद्दिष्ट मोठ्या प्रमाणात दिसून येते. सन १७-१८ पासून खात्याने सुचविलेली दरवाढीस मा.स्थायी समिती मार्फत मा मुख्य सभेची मान्यता प्राप्त झालेली नाही. त्यामुळे पूर्वीच्या दरानुसारच मिळकतकराचे बिल देणे क्रमप्राप्त असते. त्यामुळे प्रत्यक्ष मिळकतकर वसुलीची व उद्दिष्ट यामध्ये तफावत निर्माण होते.

- **मिळकत कर अभय योजना :-** सन २०२१-२२ मध्ये मा. स्थायी समिती ठ.क्र.१६८८ दि.१४/१२/२०२१ दि. ०६/०१/२०२२ ते दि. २६/०१/२२ या कालावधीकरीता निवासी मिळकतींना एकूण मिळकत कराची थकबाकी व आकारलेली शास्ती याची र. रू. १ कोटीच्या आत असलेल्या एकरकमी भरल्यास आकारलेल्या शास्तीवर ७५% माफी देवून शिल्लक रक्कम भरणेबाबत अभय योजना राबविण्यात आली या कालावधीत ४८,३०४ निवासी मिळकतधारकांनी अभय योजनेचा लाभ घेतला असून र.रू.१०८.८३ कोटी इतका महसुल जमा करणेत आलेला आहे.

- उपरोक्त अभय योजनेस नागरीकांनी दिलेला प्रतिसाद विचारत घेता उपरोक्त अभय योजनेस मा.स्थायी समिती ठ.क्र.२०९१ दि.२५/१/२०२२ दि.९/२/२२ पासून ते २८/२/२२ अखेर मुदतवाढ देणेत आलेली आहे.

- **कर आकारणी व कर संकलन विभाग सन २०२२-२०२३**

  **उद्दीष्ट र.रु. २४५४.५४ कोटी**

- सन २०२२-२३ या आर्थिक वर्षाकरीता म्हणजेच दि.०१/०४/२०२२ ते दि.३१/०५/२०२२ अखेर मिळकत कराची संपूर्ण रक्कम भरल्यास सर्वसाधारण करामध्ये ५% ते १०% सवलत देणेबाबतचा प्रस्ताव सादर केलेला आहे. जेणेकरुन पहिल्या २ महिन्यामध्ये मिळकत कराची रक्कम मोठ्या प्रमाणात जमा होईल.

- सन २०२१-२२ या आर्थिक वर्षामध्ये नव्याने सर्वसाधारण करामध्ये (वार्षिक करपात्र रक्कमेवर) प्रत्येक टप्प्यास (slab) २%, साफसफाई मध्ये ५%,जललाभ करामध्ये २%, जलनि:स्सारण करामध्ये २% अशी एकूण ११ % दरवाढ सुचविण्यात आली आहे. सदरची वाढ ही मोबाईल टॉवर कंपन्या, आयटी आणि आयटीईएस कंपन्या यांनाही लागू राहील. त्यामुळे सुमारे र.रु.१६०/- कोटी पेक्षा जास्त वाढीव उत्पन्न अपेक्षित आहे.

- ग्रामपंचायत कडील कर आकारणी न झालेल्या मिळकती व पुणे शहरातील हद्दीतील नव्याने बांधकाम झालेल्या (नव्याने भोगवटा पत्र मिळालेल्या) मिळकतींची आकारणी करणेत येत असून दि.०१/०४/२०१९ पासून नव्याने भोगवटा घातलेल्या निवासी बांधकामांना/नव्याने तयार झालेल्या निवासी मिळकतींना वार्षिक करपात्र रक्कमेत ४०% सवलत बंद केल्याने वार्षिक करपात्र रक्कमेत वाढ होणार आहे.

- मे. राज्य शासनाच्या निर्णयानुसार ज्या निवासी मिळकतींना ४०% सवलत देण्यात आलेली आहे, अशा निवासी मिळकतींची दि. ०१/०४/१९ पासून ४०% सवलत काढणे व दि. ०१/०४/१९ पासून दिलेली सवलत वसुल करणेबाबत मा.स्थायी समिती मार्फत मा. मुख्य सभेची मान्यता मिळणेचे विषयपत्र सादर करणेत आलेले आहे. सदर कार्यवाहीमुळे पुणे महानगरपालिकेच्या उत्पन्नात निश्चित वाढ होईल.
- जास्तीत जास्त सेवक कर आकारणी व कर संकलन विभागास उपलब्ध करून देण्यात येत आहेत. सदर सेवकांकडून वापरात बदल झालेल्या मिळकती, आकारणी न झालेल्या मिळकती शोधून आकारणीचे कामकाज करण्यात येत आहे. तसेच सदर सेवकांकडून जास्तीत जास्त थकबाकीदारांकडून मिळकतकराची वसुली करणेत येत आहे. यामुळे पुणे महानगरपालिकेच्या उत्पन्नात भर पडेल.
- पुणे महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रामध्ये नव्याने प्रस्तावित २३ गावांचा समावेश झालेला आहे. सदर भागातील मिळकतींची आकारणी करणेबाबतच्या दृष्टीने योग्य ती कार्यवाही कमीत कमी वेळेत करण्याचे नियोजन खात्यामार्फत करणेत येत आहे. यामुळे मिळकत कराचे उत्पन्नात वाढ होईल.
- पुणे महानगरपालिकेच्या हद्दीतील मिळकतींचे Artificial Intelligence Survey करण्यात येत असून आकारणी न झालेल्या मिळकतींची तपासणी करून आकारणी करण्यात येते त्यामुळे नव्याने मिळकती नोंद करण्यात येऊन कायमस्वरूपी महसुल वाढण्यास मदत होत आहे.

## (३) <u>बांधकाम परवानगी व विकास शुल्क</u>

### सन २०२१-२२

- <u>**सन २०२१-२२**</u> या आर्थिक वर्षाकरिता सद्यस्थितीतील बांधकाम क्षेत्रातील कल, प्रस्ताव संमतीकरण व जमा महसूल यांचा ताळमेळ पाहता बांधकाम विकास विभागाकडील जमा महसूलीचे र. रू. ११८५.०६ कोटीचे उद्दिष्ट निश्चित केले होते. माहे ३१ जानेवारी २०२२ पर्यंत सुमारे र. रू. १६७३ कोटी जमा झालेले आहेत.

### सन २०२२-२३ (उद्दिष्ट र.रू.१४००.०१ कोटी)

- सन २०२१-२२ या अंदाजपत्रकीय वर्षात जमा महसूल र.रु. ११८५.०६ कोटी अपेक्षिले होते. तसेच ऑनलाईन ऑटो डिसीआर (Auto DCR) जलदगतीने बांधकाम परवानगीची कार्यपद्धती अवलंबून सदरचे उद्दीष्ट्य पूर्ण करणे शक्य होणार आहे. पुणे मनपा हद्दीसाठी मंजूर करण्यात आलेल्या UDCPR – 2020 एकात्मिक विकास नियंत्रण व प्रोत्साहनपर नियमावलीमध्ये नव्याने प्रिमियम एफ.एस.आय., आय.टी./ आय.टी.ई.एस., ट्रान्झिट ओरिएंटेड डेव्हलपमेंट इ. इमारती साठीचा अतिरिक्त एफ.एस.आय. व विशेष इमारतीसाठीचा अतिरिक्त एफ.एस.आय. पोटी प्रिमियम जमा होणार असल्याने सदर उद्दीष्ट्य गाठणे शक्य होणार आहे.
- महाराष्ट्र शासनाने दि.०२/१२/२०२० रोजी प्रकाशित केलेल्या (UDCPR–2020) मध्ये दिलेल्या प्रिमियममध्ये टप्पेनिहाय शुल्क भरण्याची सुविधा दिल्याने बांधकाम क्षेत्रामधील नव्याने मान्य होणाऱ्या प्रकल्पामध्ये वाढ झाली आहे. सदर टप्पेनिहाय सुविधा UDCPR–2020 प्रमाणे दोन वर्षे कालावधीसाठी असून त्यांची मुदत दि.०२/१२/२०२२ रोजी पूर्ण होणार आहे. तसेच राज्य शासनाने विक्री होणाऱ्या घटकांसाठी टेनामेन्ट (Tenament) ३१/१२/२०२१ पर्यंत प्रिमियम शुल्कामध्ये ५०% सूट मान्य केलेली आहे. त्यामुळे या कालावधीमध्ये देखील नवीन बांधकाम प्रस्ताव मान्य करण्यास वेग आला आहे. मूळ एफ.एस.आय. (FSI) घेतल्यावर ॲन्सीलरी FSI अतिरिक्त UDCPR मान्य होत असून त्यामुळे सर्व स्तरावरील लहान-मोठ्या विकसकांना फायदा मिळत आहे व तसेच पुणे महानगरपालिकेच्या उत्पन्नामध्ये देखील वाढ झालेली आहे.

## (४) पाणीपट्टी

### सन २०२१–२२

- सन २०२१–२२ सालासाठी मा.स्थायी समितीने मान्य केलेल्या अंदाजपत्रकानुसार पाणीपुरवठा विभागासाठी महसुली कामासाठी र.रु. ६२२.९० कोटी (२७०.१६ सेवकवर्ग व इतर तदनुषंगिकसहित) व भांडवली कामासाठी र.रु. ४२७.३५ कोटी असे एकुण र.रु. १०५०.२५ कोटीची तरतूद करण्यात आली होती. या तरतूदीचे अनुषंगाने सन २०२१–२२ सालासाठी पाणीपट्टीपोटी र.रु. ३७२ कोटी मिळणेचे उद्दिष्ट ठरवून दिलेले आहे. त्या अनुषंगाने दिनांक ३१/०१/२०२२ रोजी पर्यत पाणीपट्टीपोटी र.रु. ८७.८२ कोटी जमा झालेले आहे.

### सन २०२२–२३ चे दृष्टीक्षेपातील अंदाजपत्रक (उद्दिष्ट र.रु.२१२ कोटी)

- या अंदाजपत्रकामध्ये समान पाणीपुरवठा योजनेसाठी सुमारे र.रु. ४५० कोटीची तरतूद करण्यात आली आहे. २०२२–२३ सालासाठी पाणीपट्टीपोटी र.रु. २१२ कोटी मिळणेचे उद्दिष्ट ठरवून दिलेले आहे. पुणे मनपा हद्दीमध्ये नव्याने समाविष्ट ११ गावे व २३ गावांमध्ये (Master Plan नुसार) पाणीपुरवठा करण्याच्या योजनेसाठी र.रु. १५० कोटीची तरतूद करण्यात आली आहे.

- घरगुती व बिगर घरगुतीच्या मीटर पाणीपट्टीच्या दरामध्ये वार्षिक ५% दरवाढ मा.मुख्य सभा ठराव क्र. ८०९, दिनांक १६/०२/२०१६ अन्वये मान्य करण्यात आलेली आहे.

**वापरानुसार दर आकारणी**

| **सध्याचे दर** | | **प्रस्तावित दर** | |
|---|---|---|---|
| खप कि.लि./महिना | दर (सन २०२१) | खप कि.लि./महिना | दर (सन २०२२) |
| **झोपडपट्टी** | | | |
| कच्ची झोपडी | ४४.३४ / महिना | कच्ची झोपडी | ४६.५६ / महिना |
| पक्की झोपडी | ७३.८६/ महिना | पक्की झोपडी | ७७.५५/ महिना |
| **घरगुती पाणी वापर दर** | | | |
| ० ते १८.६० | ७.०२ | ० ते १८.६० | ७.३७ |
| १८.६० ते ३०.०० | ११.७४ | १८.६० ते ३०.०० | १२.३२ |
| ३०.०० ते ३७.५ | २३.३६ | ३०.०० ते ३७.५ | २४.५२ |
| ३७.५ पेक्षा जास्त | ३५.१० | ३७.५ पेक्षा जास्त | ३६.९७ |
| **बिगर घरगुती वापर दर** | | | |
| ० ते २० | ६०.७५ | ० ते २० | ६३.७८ |
| २० ते ४० | ६३.०४ | २० ते ४० | ६६.१९ |
| ४० ते ६० | ६६.२४ | ४० ते ६० | ६९.५५ |
| ६० पेक्षा जास्त | ७६.३२ | ६० पेक्षा जास्त | ८०.१३ |

## (५) आकाशचिन्ह परवाना

### सन २०२१-२२

- सन २०२१-२२ मध्ये जाहिरात फलकांचे व नामफलकाचे दि. ०१/०४/२०२१ ते दि. ३१/०१/२०२२ अखेर र.रु. ५,१९,१९,९६८/- एवढे उत्पन्न प्राप्त झाले आहे. परंतू प्रति चौ. फुट र.रु. २२२/- शुल्काबाबत मे. उच्च न्यायालयात रिट याचिका क्र. १०६८४/२०१८ दाखल असल्याने दि.०१/१०/२०१८ पासून जाहिरातदारांनी शुल्क भरलेले नाही. सन २०२१ मध्ये सदरकोर्ट केसची प्रत्यक्ष सुनावणी सुरवात झाली आहे.

- सन २०२१-२२ मध्ये दि. ०१/०४/२०२१ ते ३१/०१/२०२२ अखेर परमिट, परवानाचे र.रु. ३६,४३,४०४/- व फॉर्म विक्रीपोटी र.रु.२१,७००/- एवढे उत्पन्न प्राप्त झालेले आहे.

- महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियमांतर्गत परवाना व आकाशचिन्ह विभागाच्या सर्व सेवा टप्याटप्प्याने ऑनलाईन करण्याचे काम सुरु करण्यात आले आहे. तसेच नागरिकांच्या सोयीसाठी ऑनलाईन पध्दतीने नवीन जाहिरात फलकाचे परवानगी करीता (एस.पी. ७) पुणे महानगरपालिकेच्या पोर्टलवर ऑनलाईन सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे.

### सन २०२२-२३

- सन २०२२-२३ चे जाहिरात फलकांबाबत मे. कोर्टाचा निकाल पुणे महानगरपालिकेच्या बाजूने लागल्यास दि. ०१/१०/२०१८ पासून र.रु. १०७ कोटी जाहिरात शुल्कापोटी उत्पन्न अपेक्षित आहे.

- परवाना व परमिटशुल्क दरवाढीबाबत मा. मुख्यसभा ठ. क्र. ६४२, दि. २२/११/२०२१ ने मान्यता मिळाली असून अंदाजे र. रू. १ कोटी व फॉर्म विक्री पोटी र.रू. १५ हजार उत्पन्न अपेक्षित आहे.

- सन २०२२-२३ मध्ये पुणे महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर पूर्ण ऑनलाईन सेवा सुरु करणेत येणार आहे.

**<u>सन २०२१-२२ या आर्थिक वर्षातील जमेचा गोषवारा खालीलप्रमाणे आहे.</u>**

***(आकडे रुपये कोटीत)***

| **जमा बाजू** | | |
|---|---|---|
| **अर्थशिर्षक** | **२०२१-२२ साठीचे जमेचे उद्दीष्ट** | **माहे जानेवारी २०२२ अखेर प्रत्यक्ष जमा** |
| सुरवातीची शिल्लक | ०.०२ | - |
| स्थानिक संस्था कर/मुद्रांक शुल्क | १७०.५७ | १३०.३६ |
| वस्तु आणि सेवा कर (GST) | १९८५.८८ | १७३१.५२ |
| मिळकतकर | २६५६.६७ | ११५४.२८ |
| पाणीपट्टी | ६६२.०० | २३५.६७ |
| बांधकाम परवानगी व विकास शुल्क | ११८५.०० | १५७१.५० |
| इतर जमा | ९२६.२१ | ४२७.२९ |
| अमृत व स्मार्ट सिटी अभियान अनुदान | १.३७ | - |
| शासकीय अनुदान | २९७.२८ | १४७.९३ |
| प्रधानमंत्री आवास योजना | १८५.०० | ४५.११ |
| कर्ज/कर्जरोखे | ३००.०० | - |
| **एकुण रक्कम रुपये** | **८३७०.००** | **५४४३.६६** |

## *(ब) <u>दृष्टीक्षेपात सन २०२२-२३ आर्थिक वर्षासाठी जमाखर्चाचा अंदाज-</u>*

**सन २०२२-२३ या आर्थिक वर्षाच्या जमाखर्चाचा अंदाज पुढीलप्रमाणे सादर करण्यात येत आहे.**

***(आकडे रूपये कोटीत)***

| **जमा बाजू** | | **खर्च बाजू** | |
|---|---|---|---|
| आरंभीची शिल्लक | ०.०२ | सेवकवर्ग खर्च | २६३४.८४ |
| स्थानिक संस्था कर | ३३०.९७ | वीज खर्च व दुरूस्ती | २८३.१७ |
| वस्तू आणि सेवा कर (GST) | २१४४.७५ | पाणी खर्च | १०६.९२ |
| मिळकतकर | २१६०.५४ | कर्ज परतफेड, व्याज व घसारा | १४९.४७ |
| विकास शुल्क | १४००.०१ | औषधे, पेट्रोल/डिझेल | १८५.३९ |
| पाणीपट्टी | ५०६.०० | देखभाल दुरूस्ती व इतर खर्च | १४०६.९३ |
| शासकीय अनुदान | ५१६.३७ | वॉर्डस्तरीय | ३४.८० |
| इतर जमा | ८३३.३४ | क्षेत्रीय कार्यालयाने करावयाची कामे | ८०.०२ |
| कर्ज/कर्जरोखे | ५००.०० | (नॉन प्लॅन) | |
| प्रधानमंत्री आवास योजना | २००.०० | भांडवली व विकासाची कामे | ३६००.८९ |
| | | अमृत व स्मार्ट सिटी अभियान | १०९.५५ |
| | | वर्षाअखेरची शिल्लक | ०.०२ |
| **एकुण** | **८५९२.००** | **एकुण** | **८५९२.००** |

सदरचे अंदाजपत्रक तयार करताना सकारात्मक दृष्टीकोन डोळयासमोर ठेऊन शासनाच्या कल्याणकारी योजना राबविणे व अंदाजपत्रकात नमूद केलेल्या विकास कामांचे उद्दिष्ट पूर्ण करण्यासाठी आपण सर्व बांधील आहोत.

अंदाजपत्रक सादर करताना मा. महापौर, मा. उपमहापौर, मा. अध्यक्ष, स्थायी समिती, मा.सभागृह नेते, मा. विरोधी पक्षनेते, मा. सर्व पक्षनेते, मा. सर्व पदाधिकारी, मा. प्रभाग समिती अध्यक्ष, मा. वृक्ष संवर्धन समिती सदस्य, मा. सर्व सभासद, अधिकारी व कर्मचारी वर्ग, कामगार संघटना, स्वयंसेवी संस्था व सर्व प्रिंट मिडीया व इलेक्ट्रॉनिक माध्यमांचे प्रतिनिधी या सर्वांचे मी मन:पूर्वक आभार व्यक्त करतो !

मा. केंद्रातील व राज्यातील सर्व माननीय मंत्री महोदय, मा. संसद सदस्य, मा.राज्यसभा सदस्य, मा. विधानसभा व मा. विधानपरिषद सदस्य, शासनाच्या विविध महामंडळावरील सदस्य, केंद्र व राज्य शासनाचे सर्व वरिष्ठ अधिकारी यांचेही वेळोवेळी सहकार्य मिळाले, त्या सर्वांचे मी मनापासून आभार मानतो. प्रस्ताविक अर्थसंकल्पास मूर्तरुप देतांनाही सर्व घटकांचे सहकार्य लाभेल, या विश्वासासह मी सन २०२२-२०२३ चे अंदाजपत्रक आज दिनांक ०७/०३/२०२२ रोजी पुणे मा. स्थायी समितीस सादर करीत आहे.

**(विक्रम कुमार)**
महापालिका आयुक्त,
पुणे महानगरपालिका.

दिनांक : ०७.०३.२०२२